
अल्पावधीत लोकप्रिय ठरलेले
ग्रंथप्रसाराला वाहिलेले दर्जेदार मासिक



# मेहता मराठी ग्रंथजगत


मे २०१३ । किंमत १५ रुपये
















समस्त जीवित आणि नामशेष प्राणिसृष्टीतील प्राणी, पक्षी, जलचर आणि उभयचर प्राण्यांच्या उत्क्रांतीचा मागोवा घेणारी चित्रमय सफर...


## 'आपली सृष्टी' १० पुस्तकांची मालिका

**किंमत प्रत्येकी ₹ ११०**








जलसम्राट मासे
अजब सर्पसृष्टी
उभयचरांचे अनोखे विश्व
आकाशसम्राट पक्षी
पाणथळीतले पक्षी
मनोरंजक सस्तन प्राणी
डायनोसॉरचे अद्भुत विश्व
अनोखी मत्स्यसृष्टी
अनोखे सस्तन प्राणी
सरपटणाऱ्या प्राण्यांचे जग





**प्राचार्य डॉ. किशोर पवार**
**प्रा. सौ. नलिनी पवार**









# मेहता मराठी ग्रंथजगत

◆ मे २०१३ ◆ वर्ष तेरावे ◆ अंक पाचवा


— *अनुक्रमणिका* —


| | |
|---|---|
| **संपादकीय** | **४** |
| **फाईन्ड अस ऑन फेसबुक** | **११** |
| **साहित्यवार्ता** | **१२** |
| **पुरस्कार** | **४७** |
| **दखल** | **६३** |
| **पुस्तक परिचय** | **६८** |
| **इंग्रजी पुस्तक परिचय** | **१००** |
| **स्मृतींची चाळता पाने** | **१०३** |
| **श्रद्धांजली** | **१०५** |
| **बालनगरी** | **१०९** |



संपादक :
सुनील मेहता

कार्यकारी संपादक :
शंकर सारडा

संपादन साहाय्य :
पल्लवी धामणे-रेखी

अंकाची किंमत १५ रु.

वार्षिक वर्गणी
मनीऑर्डरने पाठवावी.

प्रसिद्धी
दरमहा ११ तारखेस

मांडणी-अक्षरजुळणी
*मेहता*
*पब्लिशिंग*
*हाऊस*



संपादक-मुद्रक-प्रकाशक : सुनील मेहता,
१९४१ सदाशिव पेठ, माडीवाले कॉलनी,
बाजीराव रोड, टेलिफोनभवनसमोर, पुणे-४११ ०३०
फोन : ०२०-२४४७६९२४/२४४७५४६२
Extension **(ग्रंथजगत विभाग) - २२७/२४३**
E-mail : info@mehtapublishinghouse.com


**वार्षिक वर्गणी १५० रु. तीन वर्षांची ३५०रु. पाच वर्षांची ५००रु.**
**३ किंवा ५ वर्षांसाठी वर्गणीदार झाल्यास पुस्तक भेट !**


***या अंकातील लेखांतील मते ही त्या त्या लेखकांची असून त्यांच्याशी संपादक सहमत असतीलच असे नाही.***




# गुडरीड्स : वाचन संस्कृतीच्या अभिवृद्धीची ग्वाही देणारे ऑनलाइन संकेतस्थळ

आपल्याला आवडलेल्या (किंवा न आवडलेल्या) पुस्तकांबद्दल ग्रंथप्रेमी वाचकांना परस्परांशी अनौपचारिकपणे, मुक्तपणे चर्चा करता यासाठी ऑनलाईन व्यासपीठ म्हणून विकसित झालेली गुडरीड्स ही संस्था ॲमेझॉनने एप्रिल २०१३ मध्ये विकत घेतली.

गुडरीड्स या वेबसाईटची स्थापना ओटिस चँडलर याने डिसेंबर २००६मध्ये कॅलिफोर्नियातील सांता मोनिका येथे केली.

त्याआधी त्याने तरुण-तरुणींना डेटिंग करणे सुलभ जावे यासाठी टिकल डॉट कॉम ही बेवसाइटही सुरू केली होती; आणि तिची सदस्यसंख्या झपाट्याने वाढत गेल्याने मॉन्स्टर वर्ल्डवाइड या संस्थेने २००४ मध्ये लक्षावधी डॉलर्स ती देऊन विकत घेतली होती. गुडरीड्सने वर्षाच्या आतच एक लाख ग्रंथप्रेमी वाचक मिळवले. डिसेंबर २००९ मध्ये कॅलिफोर्नियातील पालो आल्टोच्या एका कंपनीने गुडरीड्सला व्हेंचर कॅपिटल म्हणून २० लाख डॉलर्सची घवघवीत रक्कम दिली. त्यामुळे ओटिस चँडलरने ग्रंथप्रसाराच्या वेगवेगळ्या कल्पना उत्साहाने राबविण्यास आरंभ केला.

गुडरीड्स या ऑनलाईन ग्रंथप्रसार संस्थेने ॲमेझॉनप्रमाणे ग्रंथविक्रीचे केंद्र म्हणून काम न करता, ग्रंथविषयक माहिती देण्यावर भर दिला. पुस्तकांच्या विक्रीपेक्षा जाहिरातींमधून मिळणारे उत्पन्न हे महत्त्वाचे मानले. हार्पर कॉलिन्स, रँडम हाऊस, पेंग्विन, सायमन ॲण्ड शूस्टर, मॅकमिलन आणि हॅचेट बुक ग्रुप या सहा प्रमुख प्रकाशन संस्थांशी संपर्क साधून पुस्तकांचे प्रभावी पण तुलनात्मक दृष्ट्या अल्पखर्चात मार्केटिंग करण्याबाबत

काही योजना आखल्या. एकेका पुस्तकाची स्वतंत्रपणे जाहिरात करणे वा प्रसिद्धी करणे हे खूप खर्चिक ठरते. त्याऐवजी पुस्तकांचे काही संच करून त्यांची एकत्रित जाहिरात केली तर वाचकांचे त्याकडे जास्त लक्ष जाते आणि त्या संचाला मागणी येते हा त्यातला एक ठोकताळा.

गुडरीड्सने पुस्तकांचे उत्तम, वेधक परिचय करून देण्यावरही भर दिला. हे परिचय वाचून गुडरीड्सचे सदस्य त्याबद्दलच्या प्रतिक्रियांची मोकळेपणाने चर्चा करतात. त्यामुळे आपल्या पुस्तकांच्या प्रसाराला आणि विक्रीला चालना मिळते असा प्रकाशकांना एकूण अनुभव आला. गुडरीड्सने केवळ मोठ्या प्रकाशन संस्थांनाच सोयीस्कर पॅकेजेस दिली असे नाही. लहान, नवीन प्रकाशकांना तसेच स्वयंप्रकाशन करणाऱ्या लेखकानांही सोयीस्कर व परवडणाऱ्या खर्चात प्रसिद्धीची संधी दिली. जेम्स पॅटरसन, मार्गारेट अॅटवुड यांच्यासारखे बेस्टसेलर लेखकही गुडरीड्सवर आपल्या पुस्तकांच्या जाहिराती देतात. सतरा हजारावर लेखक गुडरीड्सद्वारे आपल्या वाचकांशी संपर्क, संवाद साधत असतात. त्या लेखकांचे परिचय, मुलाखती, पुस्तकांची यादी, त्या पुस्तकांचे परिचय, वाचकांची मते हे सर्व गुडरीड्सद्वारे बघता येते. जास्तीत जास्त वाचकांपर्यंत कसे पोचावे याबद्दल एक खास विभागही या संकेतस्थळावर उपलब्ध आहे. वाचकांची संख्या जितकी जास्त, तितकी त्या ऑनलाइन संस्थेची प्रभावक्षमता जास्त.

गुडरीड्सची वाचक सदस्य संख्या आजमितीला एक कोटी आहे; हे सदस्य दरमहिन्याला दोन कोटी वेळा या संकेतस्थळाचा वापर करतात. दरमहिन्याला एक लाख नवे सदस्य होतात. दररोज दीड लाख पुस्तकांवर क्लिक केले जाते. त्यातील एक तृतीयांश क्लिक्स नवीन वाचनीय पुस्तकांच्या संदर्भात असतात. दोन कोटी पुस्तकांची माहिती या संकेत स्थळावर मिळू शकते. या माहितीचे विश्लेषण व वर्गीकरण करून ते प्रकाशन संस्थांना काही शुल्क घेऊन उपलब्ध केले जाते. ऑनलाइन पुस्तके विकणाऱ्या संस्थेशी गुडरीड्सच्या संकेत स्थळावरून संपर्क साधून विक्री होते, तेव्हा त्याबद्दल गुडरीड्सला थोडेसे कमिशन मिळते. वाचकांकडून कुठल्या पुस्तकांना जास्त प्रतिसाद मिळतो याचा तपशील गोळा करण्यासाठी गुडरीड्सने २०११साली डिस्कव्हररीड्स हे पुस्तकांची शिफारस करणारे एंजिन विकसित केले. पंचतारांकित श्रेणीच्या

२० पुस्तकांवर वाचक सदस्याने क्लिक केले तर हे एंजिन त्या पुस्तकाची शिफारस करण्यास प्रारंभ करते. ॲमेझॉनच्या शिफारशीपेक्षा ही पद्धत जास्त वस्तुनिष्ठ व व्यावहारिक असल्याचा चँडलरचा दावा आहे. या एंजिनच्या आधारे आपल्या ५० लाख नोंदणीकृत सदस्यांना गुडरीड्सने त्या पुस्तकांची शिफारस केल्यानंतर विक्रीत लक्षणीय वाढ होते. याचा पडताळा प्रकाशकांना येत राहिल्याने ॲमेझॉनला ही कंपनी आपल्या व्यवहार वृद्धीसाठी आणि आपले ग्रंथविक्री क्षेत्रातील वर्चस्व टिकवण्यासाठी आपल्या ताब्यात घेण्याची निकड वाटली.

३ एप्रिल रोजी त्याप्रमाणे ॲमेझॉनने या कंपनीला आपल्या छत्राखाली आणले.

गुडरीड्सच्या कॅटलॉगमध्ये आता ३९ कोटी ५० लाख पुस्तकांचा समावेश आहे.

गुडरीड्सच्या वाचक सदस्यांनी २० हजार ऑनलाईन बुक क्लब्ज चालवले आहेत.

गुडरीड्सचा सदस्य आपल्या वैयक्तिक संग्रहामधील पुस्तकांची नोंद गुडरीड्सच्या यादीत करू शकतो. त्या पुस्तकाबद्दलचे मत नोंदवू शकतो. अभिप्राय वा परीक्षण देऊ शकतो. पुस्तकावरील चर्चेत भाग घेऊ शकतो. एखाद्या नव्या व्यक्तीचे नाव सदस्यत्वासाठी सुचवू शकतो. आपले वा आपल्या मित्राचे प्रोफाईल देऊ शकतो. पुस्तकाला एक ते पंचतारांकित दर्जा देऊ शकतो. त्या दर्जाचे समर्थन करण्यासाठी अभिप्रायही देऊ शकतो. लेखकाला शंका व स्पष्टीकरणे विचारू शकतो. सातत्याने सदस्याचे, लेखकांचे वा पुस्तकाचे प्रोफाइल या संकेतस्थळावर अपडेट करण्याची सोय असते.

वाचनसंस्कृती जिवंत आहे याची ग्वाही देणारे गुडरीड्स हे संकेतस्थळ आहे; त्या धर्तीवर मराठीत एखादे संकेतस्थळ विकसित होण्याची गरज आहे. ॲमेझॉन सारख्या संस्था ग्रंथव्यवहारातील अशा उपक्रमांच्या उपयुक्ततेचा अंदाज घेऊन त्या भरपूर आर्थिक मोबदला देऊन आपल्या छत्राखाली घेण्यास टपून बसल्या आहेत.






ग्रंथजगत वाचा हवा तेव्हा आणि हवा तिथे
आणि सवलतीत पुस्तके मिळवा.

अधिक माहितीसाठी www.mehtapublishighouse.com या संकेतस्थळाला भेट द्या.


**'मेहता पब्लिशिंग हाऊस'ची वाचकांसाठी सुवर्णसंधी...**

पुणे आणि कोल्हापूर कार्यालयापासून ७ कि. मी. पर्यंतच्या अंतरावर कॅश ऑन डिलिव्हरीची सुविधा!

**५००/- रुपये किंवा अधिकच्या खरेदीवरील पुस्तके कॅश ऑन डिलिव्हरीच्या माध्यमातून आपल्याला घरपोच मिळू शकतात. त्यासाठी वर्गणी मनीऑर्डर/डिमांड ड्राफ्टद्वारा कार्यलयाच्या पत्त्यावर पाठवावी. अथवा एस. बी. आयच्या खात्यातही पैसे भरू शकता.**

STATE BANK OF INDIA
SBIN0000455 A/C NO 32749992008

**आगामी**




# उगवतीच्या दिशेला

मूळ लेखिका

**ज्युलिया ग्रेगसन**

अनुवाद

**श्यामल कुलकर्णी**

१९२८ तीन तरुणी भारतात यायला निघतात. प्रत्येकीचे येण्याचे कारण वेगवेगळे असते. नव्या आयुष्याबद्दलच्या अपेक्षा, इच्छा आणि आकांक्षा भिन्न असतात.

रोझचं लग्न बॉम्बेला एका इंग्रज अधिकाऱ्याशी होणार असतं, पण सोबत आई-वडील नसल्याने एका अनोळखी माणसाशी अनोळखी प्रदेशात लग्न करायचा ताण तिच्या मनावर येतो.

इंग्लंडमध्ये लग्न जमत नाही म्हणून व्हिक्टोरियाची आई जोडीदार शोधण्यासाठी तिला रोझसोबत भारतात पाठवते,

तर लेखिका होण्याची महत्त्वाकांक्षा बाळगणारी विवा आपल्या भूतकाळाची मुळे शोधायला भारतात येते.

बॉम्बेमधील उच्चभ्रू समाज, गरीब वस्त्या, भारतातले इंग्रज, त्यांची भारताबद्दलची मते, तत्कालीन भारतीय समाजाची इंग्रजांबद्दलची मते, भारतीय स्वातंत्र्यलढा अशा व्यापक पार्श्वभूमीवर विणलेला कादंबरीचा विशालपट खिळवून ठेवतो.

## आगामी




# पॉपी

मूळ लेखक
**ग्रेगॉर सेमन**
अनुवाद
**डॉ. प्रमोद जोगळेकर**

अफगाणिस्तानात सर्वांत जास्त 'पॉपी'चे – अफूचे उत्पादन केले जाते. मुख्यत: अफूचा वापर नशा करण्यासाठी होतो. ऑस्ट्रेलियन पत्रकार ग्रेगॉर सेमन यांनी अफू या एकाच विषयाचा पाठपुरावा करून प्रत्यक्ष अफगाणिस्तानात आलेले अनुभव या पुस्तकात कथन केले आहेत.

जगभरात फोफावणाऱ्या दहशतवादामागे अफूचा पैसा कसा आहे, अफूच्या व्यवहारातून मिळणारा नफा कोणाला होतो आणि त्याची किंमत कोणाला मोजावी लागते, या प्रश्नांचा शोध घेताना सेमन यांना अफूच्या व्यवहाराशी निगडित शेतकरी, डॉक्टर, तस्कर, व्यसनाधीन माणसं, राजकारणी, पोलीस अशी विविध माणसं भेटतात. इतकंच नाही, तर इंग्रजी पॉप गाणी आवडणारा तालिबानी कमांडरही भेटतो!

हा प्रवास एक वेगळेच जग आपल्या समोर उभे करतो, आपल्या कल्पनेपलीकडचे; पण वास्तववादी!

....

ग्रेगॉर सेमन

सेमन हे सिडनीस्थित लेखक आणि पत्रकार असून त्यांनी आजवर वेगवेगळ्या विषयांवर पुस्तके लिहिली आहेत.इंटरनेट साइट्स, तसेच मासिके यांसाठीही लेखन. तसेच संपादन केले आहे. वेगवेगळ्या टीव्ही कार्यक्रमांतही त्यांचा सहभाग आहे.

## आगामी




# हे सर्व आपल्याला कोठे नेणार?

मूळ लेखक- **अरुण शौरी**

अनुवाद - **अशोक पाथरकर**

''आग लागलेल्या घरात गडबड व गोंधळ माजतो. चौकीदार आणि इतर लोक आग विझवण्यात गुंतलेले असताना घरातील वस्तू चोरण्याची संधी चोर साधू शकतो... युद्धकाळात संकटाला तोंड देणारा किंवा घसरणीला लागलेला देश अगदी त्या आग लागलेल्या घरासारखा असतो. अशा स्थितीतील देशावर हल्ला केल्यास अर्ध्या प्रयत्नात दुप्पट यश मिळते....'' 'The Wiles of War'

''जेव्हा अधिकाऱ्यांमध्ये गटबाजी होते, प्रत्येक जण आपल्या मित्राला वर आणण्याच्या प्रयत्नात असतो, चांगल्या व हुशार लोकांना डावलून बदमाश लोकांच्या नियुक्त्या करतो, स्वत:च्या फायद्यासाठी लोकांकडे पाठ फिरवतो, सहकाऱ्यांना बदनाम करतो – ह्याला अंदाधुंदीचा 'उगम' म्हणतात.

''जेव्हा कारस्थानी दुष्ट लोकांना शक्तिशाली घराणी गोळा करतात, तेव्हा ते कोणतेही अधिकारपद नसतानासुद्धा प्रख्यात होतात आणि त्यांच्या ताकदीमुळे लोक चळाचळा कापतात. लोकांची बारीक-सारीक कामे करून ते झाडाला विळखा घालणाऱ्या वेलीप्रमाणे त्यांना कायमचे अंकित करून घेतात; अधिकारपदावरील लोकांचे अधिकार बळकावून सामान्य माणसाला नाडतात. देशात गदारोळ माजतो, पण सरकारी मंत्री तो झाकून ठेवतात आणि त्याची माहिती देत नाहीत – ह्याला अंदाधुंदीचे 'मूळ' म्हणतात.

''जेव्हा चांगल्या लोकांना 'चांगले' म्हणून मान्यता दिली जाते, पण त्यांना पदोन्नती दिली जात नाही; जेव्हा दुष्ट लोकांना ओळखूनसुद्धा बाहेर काढले जात नाही; जेव्हा भ्रष्टाचारी सत्तेत असतात आणि चांगल्या लोकांना देशोधडीला लावले जाते; तेव्हा देशाचे भयानक नुकसान होते.''

'The Book of Three Strategies'




खूप सुंदर पुस्तक

*- मनीषा जोशी*

मानवी मनाचे खरे चित्रण

*- वासुदेव देशपांडे*

**ययाति**

वि. स. खांडेकर

---



माझ्या लहानपणीच्या आठवणी म्हणजे हे पुस्तक. प्रत्येकाने संग्रही ठावावे असेच आहे. हे पुस्तक तुमच्या ह्रदयाला हात घालते.

*- मानसी जोशी*

पुस्तक संग्रही आहे. आवर्जुन विकत घेतले होते. अवश्य वाचा.

*- भाग्यश्री पेठकर*

माझे सर्वात आवडते पुस्तक

*- सोनाली सावंत दिघे*


पुस्तक मला आवडले. त्यातील जो ची व्यक्तिरेखा मला खूप सुरेख वाटते.

*- नम्रता कुलकर्णी*

**चारचौघी**

अनु : शान्ता शेळके

---



आत्ताच वाचले. मस्त आहे.

*- देवयानी गोडबोले*

मुखपृष्ठ अप्रतिम... पुस्तकही उत्तम.

*- आसावरी काकडे*

**टु सर, विथ लव्ह**

अनु : लीना सोहनी




★ **'ई-साहित्य संमेलन'**

साहित्य संमेलनाला वाईट अर्थ येऊ लागला, माध्यमांचे संतुलन ढासळत चालले, मराठी वृत्तपत्रांची कामगिरी असमाधानकारक होत आहे, अशावेळी ई-साहित्य संमेलनासारखे जे नवे समांतर मार्ग निर्माण होताहेत त्यांना प्रोत्साहन द्यायला हवे, असे मत तिसऱ्या ई-साहित्य संमेलनाचे अध्यक्ष भालचंद्र नेमाडे यांनी मांडले.

महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यातील तसेच जगभरातील सर्व मराठी वाचक, लेखक, प्रकाशक, अभ्यासक, समीक्षक यांना जोडण्याच्या उद्देशाने 'युनिक फीचर्स'तर्फे गेल्या दोन वर्षापासून 'ई-साहित्य' संमेलनाचा उपक्रम राबवला जातो. यंदाच्या तिसऱ्या 'ई-साहित्य' संमेलनाचे उद्‌घाटन मुंबई मराठी पत्रकार संघात नेमाडे यांच्या हस्ते करण्यात आले. 'ई'साहित्य' संमेलनांसारखे नवे उपक्रम आखले जाणे ही स्तुत्य बाब असून इथे आयोजनाचा भपका नाही, अवास्तव खर्च नाही की मानापानाची नाटकं नाहीत. म्हणूनच या उपक्रमांना उचलून धरले पाहिजे, असे ते म्हणाले.

प्रसारमाध्यमांवर टीका करताना नेमाडे यांनी वृत्तवाहिन्या त्यांच्या कॅमेऱ्यात मावेल तेवढेच दाखवत असल्याने सूज्ञ प्रेक्षकांनी ते खरे मानून चालू नये, असे सांगितले. वृत्तपत्रे 'बिटविन द लाइन्स' या पद्धतीने वाचावीत अशी सूचनाही त्यांनी केली. वाचक हाच शेवटी लेखकाचा तारणहार असतो, असे सांगून ई-तंत्रज्ञानाच्या माध्यमातून जास्तीत जास्त साहित्य लोकांपर्यंत पोहोचवले पाहिजे, अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली.

या ई-साहित्याच्या माध्यमातून मराठीतील दहा निवडक लेखकांचे दस्तऐवजीकरण अर्थात वेब डॉक्युमेंटेशन, नियतकालिकांची ओळख, नव्या लेखकांची ओळख करून देणारे ब्लॉग शिफारस, ऑडिओ स्टोरी, दुर्गा भागवत आणि कमल देसाई

यांच्यावरील माहितीपट, लिहिते लेखक आणि झाडाझडती वाचनसंस्कृतीची हे उपक्रम राबविण्यात येणार आहेत. www.uniquefeatures.in या संकेतस्थळावर हे संमेलन बघता येते.

### ★ प्रबोधनकार ठाकरे विचार साहित्य संमेलन

संगीत, चित्र शिल्प या कलांप्रमाणेच कवितेसाठी शब्दांचा रियाज महत्त्वाचा आहे, असे मत प्रसिद्ध कवी प्रा. फ. मुं. शिंदे यांनी व्यक्त केले. कविता हा माझा प्राण आहे, त्याच अधिष्ठानाने मी कविता लिहितो, अशी भूमिका त्यांनी मांडली.

बहुजन विकास महासंघातर्फे आयोजित प्रबोधनकार ठाकरे विचार साहित्य संमेलनाचे उद्घाटन शिवसेनेच्या प्रवक्त्या आमदार डॉ. नीलम गोऱ्हे यांच्या हस्ते झाले. परिवर्तनाचा विचार हादेखील परिवर्तनाच्या प्रक्रियेला चालना देणारा असला पाहिजे हे ध्यानात घेऊन कृती करणे हीच प्रबोधनकारांना खरी आदरांजली ठरेल असे त्यांनी उद्घाटनपर भाषणात सांगितले.

संमेलनाध्यक्ष संपत जाधव, स्वागताध्यक्ष बाळासाहेब भांडे या प्रसंगी उपस्थित होते. सुधीर गाडगीळ यांनी फ. मुं. शिंदे यांच्या घेतलेल्या मुलाखतीतून कवी, प्राध्यापक, मराठी रंगभूमी परिनिरीक्षण मंडळाचे अध्यक्ष आणि निवडणुकीच्या माध्यमातून राजकारणात प्रवेश करण्याचा अयशस्वी प्रयत्न वगैरे त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचे पैलू उलगडले.

कविता हा उत्स्फूर्त आविष्कार आहे. या उत्स्फूर्ततेमध्ये विचार आणि संवेदनशीलता महत्त्वाची असते. व्यक्त झाले नाही तर माझे बिघडणार आहे अशी जाणीव होत असेल तरच कविता लिहा, असा सल्ला देत फ. मुं. शिंदे म्हणाले, ''कवी बी. रघुनाथ आणि नारायण सुर्वे यांच्या कवितेचा माझ्यावर संस्कार आहे. पण प्रेमकविता मी माझीच लिहिली. याचे कारण प्रेम स्वत:लाच करावे लागते. कविता हेच कवीचे आत्मचरित्र असते. त्यासाठी विविध अनुभवांतून आयुष्य समजून घेणे महत्त्वाचे आहे.''

### ★ 'छावा', 'मृत्युंजय'चे अधिकार

साहित्यिक शिवाजी सावंत यांच्या 'छावा' आणि 'मृत्युंजय' या गाजलेल्या कादंबऱ्यांच्या प्रकाशनाचे हक्क 'मेहता पब्लिशिंग हाऊस'ला असल्याचा निकाल न्यायालयाने दिला.

शिवाजी सावंत यांनी कॉन्टिनेन्टल प्रकाशनास २००० मध्ये या कादंबऱ्यांच्या प्रकाशनाचे अधिकार दिले होते; परंतू त्यांच्या मृत्यूनंतर त्यांच्या कुटुंबीयांनी हे अधिकार मेहता पब्लिशिंग हाऊसला दिले. त्यामुळे कॉन्टिनेन्टल आणि मेहता

प्रकाशन यांच्यात वाद निर्माण झाला. सावंत यांचे संपूर्ण साहित्य प्रकाशित करण्याचा अधिकार कॉन्टिनेन्टलला असून त्यांच्या मृत्यूनंतर त्यांच्या कुटुंबियांचा त्यावर कोणताही स्वामित्वहक्क नसल्याचा दावा कॉन्टिनेन्टलतर्फे करण्यात आला, परंतु न्यायालयाने हा दावा फेटाळून लावला.

सावंत यांनी केलेला करार अस्तित्वात नसल्यामुळे दोन्ही पक्षांनी लवादापुढे जाण्याचा प्रश्नच उद्‌भवत नसल्याची बाजू सावंत यांच्या कुटुंबियांकडून मांडण्यात आली. ती न्यायालयाने ग्राह्य धरली.

## ★ दादरमध्ये 'वपु-एक अमृतानुभव'

सोशल नेटवर्किंग साईटमध्ये आघाडीवर असलेल्या 'फेसबुक'वर ज्येष्ठ साहित्यिक-कथाकथनकार व. पु. काळे यांनी लिहिलेल्या कथांमधील काही चांगली सुभाषितवजा वाक्ये 'शेअर' केली जातात तर महाविद्यालयीन किंवा अन्य एकांकिका स्पर्धेतून आजही 'वपुं'च्या कथांवर नाटके सादर केली जातात. त्यामुळे आजच्या तरुण पिढीसाठी 'वपुं'ची पुस्तके 'प्लेझर बॉक्स' ठरली आहेत.

आज इतक्या वर्षांनंतरही तरुण आणि महाविद्यालयीन विद्यार्थी मोठ्या प्रमाणात वपुंच्या पुस्तकांचे चाहते आहेत, यावरून त्यांचे लेखन हे समयोचित ठरते.

'वपुं'च्या ८१व्या जयंतीनिमित्त २५ मार्च रोजी 'वपु-एक अमृतानुभव' कार्यक्रमाचे आयोजन 'वपुं'च्या कन्या स्वाती चांदोरकर यांनी 'स्वर्णमध्य'च्या सहकार्याने केले होते.

कार्यक्रमात संपदा कुलकर्णी-जोगळेकर, मिलिंद सफई, रेखा मुंदडा आणि ज्येष्ठ अभिनेते श्रीकांत मोघे यांचा सहभाग होता. कथाकथन, पत्रसंवाद, अनुभव कथन, ध्वनिपट सादरीकरण असे या कार्यक्रमाचे स्वरूप होते.

वपुंच्या सर्व छापील पुस्तकांचे अधिकार मेहता पब्लिशिंग हाऊसकडे असून त्यांच्या जयंतीनिमित्त पुस्तक संचावर खास सवलत जाहीर केली होती. ५८०० रुपये मूळ किंमतीचा हा संच सवलतीमध्ये ३८०० रुपयांना देण्यात आला.

## ★ नाट्य परिषदेच्या अध्यक्षपदी मोहन जोशी

अखिल भारतीय मराठी नाट्य परिषदेच्या अध्यक्षपदी पुन्हा एकदा मोहन जोशी विराजमान झाले. अनेक वादविवादांमुळे यंदाची नाट्य परिषदेची निवडणूक चांगली गाजली. मोहन जोशी यांना २८, तर विनय आपटे यांना १५ मते मिळाल्याची माहिती दीपक करंजीकर यांनी दिली. आवाजी मतदानाने अध्यक्षांची निवड करण्यात आली. दरम्यान अध्यक्षपदासाठी झालेल्या निवडणुकीत आश्वासनांची सौदेबाजी झाल्याचा आरोप विनय आपटे यांनी केला आहे. नाट्य परिषदेच्या

उपाध्यक्षपदी नागपूरचे प्रमोद भुसारी, प्रमुख कार्यवाहपदी दीपक करंजीकर, कोषाध्यक्षपदी लता नार्वेकर, सहकार्यवाहपदी भाऊसाहेब भोईर आणि सुनील वणजू यांची निवड करण्यात आली.

## ★ पितृसत्ताक कुटुंबपद्धती बदला

'पितृसत्ताक कुटुंबपद्धती बदलल्यास जगांतील हिंसा, आक्रमण, असहिष्णुता या विनाशकारी प्रवृत्ती नष्ट होऊन खऱ्या अर्थाने नवीन सत्ययुग अस्तित्वात येईल,' असे प्रतिपादन दादा जे. पी. वासवानी यांनी केले.

वासवानी यांनी 'महिलांशिवाय या जगाचे काय झाले असते' या इंग्रजी पुस्तकात महिलेचे कुटुंबातील स्थान, तिच्या समस्या आणि उद्योगधंद्यात तिने मिळविलेले यश याबाबत अभ्यासपूर्ण विवेचन केले आहे.

वासवानी म्हणाले, ''महिलाच शक्तीचे खऱ्या अर्थाने प्रतीक आहेत. संस्कृतीचा ऱ्हास तसेच जीवनमूल्यांची घसरण थांबवण्याची, समाज बदलण्याची ताकद केवळ महिलांमध्येच आहे. या ताकदीचा योग्य उपयोग केल्यास, जगात शांतता, सौहार्द आणि सौंदर्य निर्माण झाल्याशिवाय राहणार नाही.''

महिलांची ताकद आपण खऱ्या अर्थाने आजपर्यंत ओळखू शकलेलो नाही. अशी खंत त्यांनी व्यक्त केली.

## ★ 'विनोदमूर्ती वसंत शिंदे' पुस्तकाचे प्रकाशन

मंगल थिएटर्स आणि अखिल भारतीय मराठी नाट्य परिषदेतर्फे (पुणे शाखा) वसंत शिंदे यांच्या जन्मशताब्दीनिमित्त मधू पोतदार लिखित 'विनोदमूर्ती वसंत शिंदे' या पुस्तकाचे प्रकाशन डॉ. आनंद यादव यांच्या हस्ते झाले. अभिनेत्री आशा काळे, अभिनेते भालचंद्र कुलकर्णी या वेळी उपस्थित होते. लीला गांधी, ज्योती चांदेकर, मधू कांबीकर, सुहासिनी देशपांडे आणि राघवेंद्र कडकोळ या ज्येष्ठ कलाकारांचा सत्कार करण्यात आला. दादा पासलकर यांनी सूत्रसंचालन केले.

## ★ बाळासाहेबांची व्यंगचित्रे

'शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे हे जेवढे उत्तम राजकारणी होते तेवढेच उत्तम राजकीय व्यंगचित्रकार होते. ''अचानक वीज चमकावी त्याप्रमाणे बाळासाहेबांना व्यंगचित्रांचे विषय सुचत असत. त्यांचे प्रत्येक व्यंगचित्र हे मार्मिकच होते. ते रसिकांच्या मनाला स्पर्शून जाणारे होते. चुकीच्या गोष्टींना फटकारे मारणारे होते,'' असे मत साहित्यिक ह. मो. मराठे यांनी व्यक्त केले.

किस्त्रीम, विशाखा आणि साहित्य चपराक यांच्या वतीने आयोजित व्याख्यानमालेत

‘बाळासाहेबांची राजकीय व्यंगचित्रे’ या विषयावर मराठे यांनी संवाद साधला. यंदाच्या साहित्य संमेलनाच्या व्यासपीठाला बाळासाहेबांचे नाव देण्यावरून वाद झाला होता. या पार्श्वभूमीवर ते म्हणाले, ‘‘बाळासाहेबांची व्यंगचित्रे समजून न घेता त्यांना कमी लेखण्याचा प्रयत्न चुकीचा आहे. आधीच त्यांना मान-सन्मान देण्यातही आपण करंटेपणाच केला आहे.’’ ह. ल. निपुणगे यांनी आभार मानले.

### ★ पुस्तकावर बंदी घालण्याची मागणी

एकीकडे स्त्री-भ्रूणहत्या रोखण्यासाठी सर्व थरांतून प्रयत्न होत असतानाच वि. वा. चौधरी यांनी ‘मुलगाच कसा होईल’ असे पुस्तक लिहून नवा वाद निर्माण केला आहे. हे पुस्तक स्त्री-भ्रूणहत्येला खतपाणी घालणारे या पुस्तकावर बंदी घालावी, अशी मागणी विधानसभेत औचित्याच्या मुद्द्याद्वारे विवेक पंडित यांनी केली.

### ★ केळकर यांना तुषार सिंचनप्रणालीचे पेटंट


तुषार सिंचनप्रणालीचा वापर वाढत आहे. मात्र, त्यासाठी दरवेळी तुषार संचाची जागा बदलण्याची आवश्यकता असते. हे टाळण्यासाठी पुण्यातील अभियंता पद्माकर केळकर यांनी स्वयंचलित फिरती तुषार सिंचनप्रणाली विकसित केली आहे. ही प्रणाली सौरऊर्जेवर चालते, त्यामुळे विजेच्या भारनियमनाच्या काळातही पिकाला पाणी देणे शक्य होते. या संशोधनाला नुकतेच पेटंट मिळाले आहे. याबाबत केळकर म्हणाले, परदेशांत पाणी व्यवस्थापनासाठी फिरती तुषार सिंचन प्रणाली वापरली जाते. त्यामुळे मोठ्या क्षेत्रावर एकावेळी सिंचन व्यवस्थापन करता येते. सध्याची विजेची टंचाई लक्षात घेऊन सौरऊर्जेवर चालणारी स्वयंचलित तुषार सिंचन प्रणाली विकसित केली आहे. या तंत्रज्ञानामुळे दिवसा तसेच रात्रीही पिकाला पाणी देता येईल. ही प्रणाली शेतात अन्य तुषार प्रणालींप्रमाणे नागमोडी न फिरता एकाच सरळ रेषेत फिरते, त्यामुळे यंत्रणेचे आयुर्मान वाढते; तसेच पिकाला समान प्रमाणात पाणी मिळाल्याने उत्पादन वाढते. सौरऊर्जेवर चालणारी ही एकमेव प्रणाली आहे. त्यामुळे या तंत्रज्ञानाला पेटंट मिळाले आहे.

### ★ साहित्य व वृत्तपत्रक्षेत्राचा संकोच

‘‘सत्ताधारी माणसांचे शिक्षणापासून व्यापारापर्यंत सर्वच क्षेत्रांमध्ये आक्रमण झाल्याने सामान्य माणसाची कोंडी झाली आहे. त्यातून निर्माण झालेल्या भयप्रद अवस्थेमुळे साहित्य व वृत्तपत्रसृष्टीचा खूप मोठा संकोच होतो आहे. बौद्धिक विश्वाचा असा संकोच होणे, ही समाजाला भूषणावह गोष्ट नाही,’’ असे मत साहित्य संमेलनाचे अध्यक्ष डॉ. नागनाथ कोत्तापल्ले यांनी व्यक्त केले.

पुणे श्रमिक पत्रकार संघाच्या वतीने ज. स. करंदीकर यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ ‘भारतीय समाज, साहित्य आणि प्रसारमाध्यमे’ या विषयावर त्यांचे व्याख्यान झाले. पत्रकार प्रतिष्ठानचे अध्यक्ष उमेश घोंगडे, पत्रकार संघाचे सरचिटणीस राजेंद्र बडे, उपाध्यक्ष शैलेश काळे या वेळी उपस्थित होते.

ते म्हणाले, देशाचे स्वातंत्र्य ही जागतिक पातळीवरील महत्त्वाची गोष्ट होती. पण, या स्वातंत्र्याचे प्रतिबिंब साहित्यात फारसे पडले नाही. १९७० नंतर दलित,




**आगामी**

# सेंड देम टू हेल

मूळ लेखक : **सेबॅस्टियन विल्यम्स**

अनुवाद : **अभिजित पेंढारकर**

‘सेंड देम टू हेल’ हे बँकॉकच्या कुप्रसिद्ध तुरुंग व्यवस्थेत गेली दोन दशके ज्या प्रकारचे आयुष्य परदेशी कैद्यांच्या वाट्याला आले आहे, त्याची थरकाप उडविणारी वस्तुनिष्ठ कहाणी सांगणारे इतिवृत्त आहे.

....

खून, मानवी हक्कांची विटंबना, अमली पदार्थ, ब्लॅकमेलिंग, खंडणी, क्रूर हिंसाचार, वैद्यकीय गैरप्रकार आणि मृत्युदंड देण्याचे असमर्थनीय प्रकार या बँगवँग आणि क्लोंग प्रेम तुरुंगातील नित्याच्या गोष्टी आहेत.

...

थायलंडमधील कायदेव्यवस्था ज्यावर आधारित आहे, ती कल्पनेच्याही पलीकडची अमानवी दु:स्वप्ने एका पाश्चिमात्य कैद्याच्या वाट्याला आली. त्याच्याच नजरेतून सेबॅस्टियन विल्यम्स यांनी हे धक्कादायक वास्तव या पुस्तकातून सर्वांसमोर मांडले आहे.

ग्रामीण, स्त्री साहित्याच्या चळवळी आल्या. त्यातून मानवतावादी दृष्टिकोन स्वीकारण्याचा आग्रह झाला. पण, एकूण साहित्यात स्वातंत्र्य, समता, बंधुता आदी मूल्ये मोठ्या प्रमाणावर लेखकांच्या विचारांच्या केंद्रस्थानी आली नाहीत. काही अपवाद वगळता मराठी लेखकांना वैयक्तिक जीवनातील भूतकाळ महत्त्वाचा वाटतो. राजकारणावर मोठ्या प्रमाणावर लेखन होत नाही. अरुण साधू, भानू काळे आदी अपवाद सोडले, तर राजकीय जाणीव तीव्रपणे व्यक्त करणारे लेखन झाले नाही.

पत्रकारितेबाबत ते म्हणाले, ध्येयवादी प्रवृत्ती व समाजागृती वृत्तपत्राने स्वीकारल्या, पण १९ व्या शतकातील मूळ प्रेरणा क्षीण झाल्या. सन १९७० नंतर सत्ताधारी माणसांचा जीवनाच्या सर्व क्षेत्रात हस्तक्षेप सुरू झाला. सत्ताधारी शिक्षणक्षेत्रात आले. त्यांनी वर्तमानपत्रेही काढली. व्यापारातही ही मंडळी आली. सर्वच क्षेत्रांमध्ये सत्ताधाऱ्यांना सत्ता हवी असून, हे चित्र गंभीर आहे. त्यामुळे तुम्ही काय बोललात, लिहिलेत व कितीही पळण्याचा प्रयत्न केला, तरी सत्ताधारी डोक्यावर असतोच. त्यातून निर्माण झालेल्या भयप्रद अवस्थेमुळे साहित्य व वृत्तपत्रसृष्टीचा संकोच होत आहे. हे निकोप समाजाचे लक्षण नाही.

## ★ पुणे भारत गायन समाजाच्या अध्यक्षपदी शैला दातार


शताब्दी साजरी करणाऱ्या पुणे भारत गायन समाज संस्थेच्या अध्यक्षपदी प्रसिद्ध गायिका शैला दातार यांची निवड झाली आहे. संस्थेचे संस्थापक गायनाचार्य भास्करबुवा वखले यांच्या त्या नातसून असून 'देवगंधर्व' या चरित्रग्रंथाच्या लेखिका आहेत.

ज्येष्ठ शिक्षिका कुसुम सोहनी यांची उपाध्यक्षपदी तर शिल्पा पुणतांबेकर, मंदार वैद्य यांची कार्यकारिणीवर निवड झाली.

## ★ महाराष्ट्रात १० कोटी मोबाईलधारक

११ कोटी २४ लाख लोकसंख्येच्या महाराष्ट्रात १० कोटी ७० लाख मोबाईलधारक आहेत. जर्मनी, इराण, तैवान, नेदरलॅण्ड, संयुक्त अरब अमिरात, हाँगकाँग, सिंगापूर, स्वीडन अशा प्रगत देशांत लोकसंख्येपेक्षाही अधिक मोबाईल वापरले जातात. भारतात १०० लोकसंख्येमागे ७० मोबाईलधारक असताना महाराष्ट्राने मात्र राष्ट्रीय सरासरी ओलांडून ९२ टक्के मोबाईलचे लक्ष्य गाठले आहे. अमेरिकेत मोबाईलचे प्रमाण लोकसंख्येच्या १०३ टक्के झाले असून, महाराष्ट्रातील मोबाईल जोडण्यांचा वेग लक्षात घेता आपण अमेरिकेची लवकरच बरोबरी करू, असे दिसते.

महाराष्ट्रात लँडलाइन वापराचे प्रमाण मात्र कमी होत असून २०१०-११ मध्ये असलेल्या ५८.४५ लाख जोडण्यांची संख्या ११-१२ अखेरीस ५५.६२




## आगामी

# प्रेमाची परिभाषा

मूळ लेखक : **अँड्रो लिंकलेटर**

अनुवाद : **मेघना जोशी**

पामेला किराज नावाची अतिशय चंचल, हेकेखोर आणि सुंदर तरुणी डोनाल्ड हिल नावाच्या रॉयल एअरफोर्समधील एका रुबाबदार आणि देखण्या पायलटला १९३९ च्या वसंतऋतूमध्ये भेटली आणि ते दोघे एकमेकांच्या प्रेमामध्ये पडले. इतर जोडप्यांप्रमाणेच त्यांना त्यांचा विवाह लांबणीवर टाकावा लागला, कारण दुसरे महायुद्ध अगदी उंबरठ्यावर येऊन ठेपलेले आणि डोनाल्ड हिलची हाँगकाँगला नेमणूक झाली होती. तेथे भविष्यामधील संभाव्य धोका लक्षात घेऊन डोनाल्डने सांकेतिक भाषेमध्ये डायरी लिहायला आरंभ केला.होता. त्याचे शब्द आकड्यांमध्ये रहस्यमयरीत्या बांधले गेले. युद्धाहून परत आलेला डोनाल्ड हा विलक्षण बदललेला होता. तो युद्धकैदी म्हणून जपानी सैन्याच्या युद्धछावणीत असताना त्याचा अतोनात शारीरिक आणि मानसिक छळ झाला. त्याला हॉस्पिटलमध्ये दाखल करण्यात आले. त्याची प्रेयसी आणि पत्नी पामेला हिने त्याच्या डायरीतील रहस्याची उकल करण्याचे ठरवले. डायरीमध्ये असणाऱ्या त्या आकड्यांत नक्कीच काही तरी संदेश असणार. आपण ज्या माणसावर अतोनात प्रेम केले, त्या माणसाला संपूर्णपणे जाणून घ्यायचे असेल; तर डायरीमधील रहस्य उलगडलेच पाहिजे म्हणून ती एका गणितज्ञाला भेटते.

त्याने त्या डायरीचा रहस्यभेद केला का?

लाखांवर आली आहे.

### ★ 'ऐसी कळवळ्याची जाती'चे प्रकाशन

''अनेक लेखकांना उत्तम लिहिता येते, पण तितक्या उत्तमरीत्या त्यांना बोलता येत नाही. आपले मत जाहीरपणे व्यक्त करता येत नाही. ज्या लेखकाला या दोन्ही कला साध्य होतात, तो खऱ्या अर्थाने नावारुपाला येतो. जीवनातील मोठमोठ्या गोष्टी त्याला सहज मिळतात.'' असे साहित्यिक प्रा. द. मा. मिरासदार यांनी सांगितले.

प्रा. मिलिंद जोशी लिखित 'ऐसी कळवळ्याची जाती' या पुस्तकाचे प्रकाशन 'अंतर्नाद'चे संपादक भानू काळे यांच्या हस्ते झाले.

प्रा. मिरासदार म्हणाले, ''वक्तृत्व ही एक महत्त्वाची कला आहे. श्रोत्यांचे लक्ष वेधून घेत आपले वक्तृत्व गाजवणे, हे सोपे काम नाही. त्यासाठी अभ्यास आणि धैर्य या दोन्ही गोष्टींची आवश्यकता आहे. पण अनेक श्रोत्यांना कायम वक्त्यांचे दोषच दिसतात. त्यांचे गुणही पाहिले जावेत. त्यांना दादही दिली जावी.''


प्रा. जोशी म्हणाले, ''वक्त्यांकडे प्रतिष्ठित नजरेने पाहायची सवय अद्याप आपल्याकडे विकसित झालेली नाही. ती व्हायला हवी.''

### ★ प्रा. फक्रुद्दीन बेन्नूर यांच्या पुस्तकाचे प्रकाशन

'काहीही घडले तरी मुस्लिम समाजाकडे बोट दाखवणे ही जगाची गरज बनली आहे. अत्याधुनिक शस्त्रास्त्रांच्या व्यापारावर अवलंबून असलेल्या अमेरिकी अर्थव्यवस्थेला देशोदेशात संघर्ष व स्पर्धा असणे गरजेचे आहे. अर्थात जगाने अशा प्रकारे मुस्लिमांची प्रतिमा बनण्याला काही मुस्लिमांनीच वाव दिला आहे, असे मत ज्येष्ठ विचारवंत डॉ. जहीर अली यांनी व्यक्त केले.

प्रा. फक्रुद्दीन बेन्नूर यांनी लिहिलेल्या 'भारतीय मुसलमानांची समाजरचना आणि मानसिकता' या पुस्तकाचे प्रकाशन डॉ. अली यांच्या हस्ते झाले. 'पसमंदा मुस्लिम महाज'चे नेते खलिद अन्सारी, मुस्लिम ओबीसी चळवळीचे नेते विलास सोनावणे आदी या वेळी उपस्थित होते. प्रतिमा प्रकाशनने हे पुस्तक प्रकाशित केले आहे.

'मुस्लिम समाज एकसंध असल्याचे भासवले जात असले, तरी वस्तुस्थिती तशी नाही. मुल्ला आणि मौलवी धर्माचा खरा अर्थ न सांगता सर्वांना जहाल बनण्याचेच शिक्षण देत आहेत. हंटर कमिशनपासून सच्चर कमिटीपर्यंत सर्वांनी विशिष्ट क्षेत्राचीच पाहणी करून अहवाल दिल्याने ही परिस्थिती निर्माण झाली आहे.' असे अन्सारी यांनी सांगितले.




आगामी

# जीव जिथे असे गुंतलेला...

मूळ लेखक : **अतुल गवांदे**

अनुवाद : **नीला चांदोरकर**

डॉ. गवांदे यांच्या भाषेला एक प्रकारचा धारदारपणा आहे. शस्त्रक्रियेच्यावेळी ज्या अचूकपणे, काटेकोरपणे ते सुरीने छेद देतात, त्याच अचूकतेने ते तिचे वर्णन करतात. त्यांच्या शब्दांमधून त्यांच्या स्वभावातला धाडसीपणा प्रतिबिंबित होतो, पण ते कधीही बेदरकारपणे विधाने करत नाहीत. खरं सांगायचे, तर आपले अंतरंग त्यांनी उघडं केल्यानंतरच त्यांच्यातल्या अंगभूत देणगीची आपल्याला पुरेपूर कल्पना येते... जॉर्ज ऑर्वेलची पुस्तकं वाचताना जो अनुभव येतो, ज्ञानात भर पडल्याचीच प्रचीती येते, शिवाय मनोरंजन झाल्याचेही जाणवते. आपण बदललो आहोत असे समाधान लाभते.

– अब्राहम वर्गीज,
'माय ओन कन्ट्री' आणि 'द टेनिस पार्टनर या पुस्तकांचे लेखक

भारतीय टपाल खात्याच्या नवीन अधिनियमानुसार मासिकाचे वितरण करताना पिनकोड सहित संपूर्ण पत्ता टाकणे अनिवार्य झाले आहे. आपला अंक नियमित वितरित होण्यासाठी कृपया पिनकोडसह आपला संपूर्ण पत्ता पोस्टकार्डद्वारे अथवा ई-मेलद्वारे कळवावा.
ई-मेल - info@mehtapublishinghouse.com

'भारतात मुस्लिमांच्या सर्व गोष्टींकडे धर्माच्या चौकटीतच पाहिले जाते. मुस्लिमांचे समाजशास्त्रीय सर्वेक्षणच झालेले नाही. मुस्लिमांमध्येही जातीयवाद प्रखर आहे. आजवर इस्लामबाबत मोठ्या प्रमाणावर लिखाण झाले असले, तरी मुस्लिमांच्या समाजरचनेबाबत वा मानसिकतेबाबत लिखाण झालेले नाही.' असे प्रा. बेन्नूर यांनी सांगितले.

### ★ तमीळ अस्मितेसाठी विद्यार्थी आंदोलन

द्रविड मुन्नेत्र कळहमने श्रीलंकेतील मानवी अधिकाराच्या मुद्यांवर केंद्रातील संयुक्त पुरोगामी आघाडी सरकारचा पाठिंबा काढून घेण्याचे पाऊल उचलल्याने देशभर खळबळ उडाली. त्यामुळे केवळ राजकीय पक्षांशी आणि आघाड्यांशी संबंधित हा प्रश्न आहे असा समज होऊ शकतो; परंतु तमीळ अस्मितेचा अंगार फुलविण्याचे काम राज्यात मोठ्या प्रमाणावर होत असून विद्यार्थीही या प्रश्नावर आक्रमक झाल्याने केवळ राजकारणापुरता हा प्रश्न सीमित राहिलेला नाही. १९९१ मध्ये लिबरेशन टायगर्स ऑफ तमीळ ईलमने राजीव गांधी यांची हत्या केल्यानंतर तमीळ अस्मितेवर आधारित भाषिक व भावनिक विषयांपासून विद्यार्थीवर्ग काहीसा बाजूलाच होता. एलटीटीईने सहानुभूती गमावली होती. श्रीलंकेतील युद्धात एलटीटीईचा प्रमुख प्रभाकरन ठार झाल्यानंतरही या परिस्थितीत काही फरक पडला नव्हता. त्या पार्श्वभूमीवर आता बदललेले चित्र निश्चितच काळजी करायला लावणारे आहे.

तामिळनाडूतील वातावरण कमालीचे तापले आहे. संयुक्त राष्ट्रसंघाच्या मानवी हक्क परिषदेत श्रीलंकेतील तमीळ नागरिकांवरील अत्याचारांबाबत अमेरिकेच्या वतीने मांडण्यात येणाऱ्या ठरावावर भारताने श्रीलंकेच्या विरोधात मतदान करावे, तसेच या अत्याचारांची आंतरराष्ट्रीय आयोगामार्फत चौकशी करावी, अशी मागणी द्रमुकने केली आहे. पण त्याआधीच विद्यार्थ्यांनी श्रीलंकेच्या विरोधात कोणत्याही राजकीय व्यासपीठाचा वापर न करता उत्स्फूर्तपणे आंदोलन सुरू केले आहे. यामुळे कला, वाणिज्य, विज्ञान आणि अभियांत्रिकी महाविद्यालये बंद पडली आहेत. हिंदीविरोधातील १९६०च्या आंदोलनानंतर पाच दशकांनंतर एवढ्या मोठ्या प्रमाणात विद्यार्थी प्रथमच रस्त्यावर उतरले आहेत. लॉयला महाविद्यालयातील आठ विद्यार्थ्यांनी चेन्नईत सुरू केलेल्या उपोषणाने या आंदोलनाची ठिणगी पडली. प्रभाकरन याचा मुलगा बालचंद्रन याच्या क्रूर हत्येचा निषेध करून विद्यार्थ्यांनी महाविद्यालयांवर बहिष्कार टाकला आहे. तमिळनाडूच्या बाहेरही त्याचे लोण 'फेसबुक', 'ट्विटर' आणि इंटरनेटच्या माध्यमातून पसरू लागले आहे.

सरकारने हे आंदोलन शमविण्यासाठी महाविद्यालये तसेच वसतिगृहे बंद केली. श्रीलंकेतील तमीळ नागरिकांवरील अत्याचारांच्या मुद्द्यांवर विद्यार्थी रस्त्यावर

उतरण्याची ही पहिलीच वेळ आहे.

## ★ लघुसंदेश पाठवा, अन् मोबाइल चार्ज करा

मोबाइलची बॅटरी संपली असेल आणि वीजही नसेल तर काय करायचे असा प्रश्न पडतो. पण आता तुम्ही चक्क टेक्स्ट मेसेज पाठवून तुमचा मोबाईल चार्ज करू शकता. ही भन्नाट कल्पना आहे लंडनच्या बफेलो ग्रीड या कंपनीची. तिने सौरऊर्जेवर आधारित सेलफोन चार्जिंग केंद्र सुरू केले आहे. हे स्टेशन टेक्स्ट मेसेजमुळे कार्यान्वित होते.

आपल्या देशात शहरी भाग वगळता ग्रामीण वीज पुरवठ्याची स्थिती बिकटची आहे. अशा स्थितीत अशा सोलर चार्जिंगची सुविधा निश्चितच लाभदायी ठरू शकते.

बफेलो ग्रीडच्या मोबाईल चार्जिंग तंत्रज्ञानाचा युगांडाला चांगला फायदा झाला आहे. यात बॅटरी सोलर पॅनेलमधून वीज घेते, त्यासाठी मॅक्सिमम पॉवर पॉइंट ट्रॅकिंग (एमपीपीटी) हे तंत्र वापरले जाते. साठ वॉटच्या सोलर पॅनेलने (सौर पट्टिका) बॅटरी चार्ज करता येते.

सोलर पॅनेलचे विजेचे आउटपुट हे पर्यावरणीय स्थितीशी निगडित असते, त्यात तापमान, सूर्यप्रकाश तसेच त्यातील सर्किट म्हणजे मंडलातील प्रतिरोध यांचा समावेश असतो. एमपीपीटीच्या मदतीने या सर्व घटकांवर तसेच प्रतिरोधातील बदलांवर नजर ठेवून साठवणूक केलेल्या विजेच्या मदतीने फोन चार्ज करता येते.

बफेलो ग्रीडच्या निर्मात्यांना सेलफोन नेटवर्क ऑपरेटर्सच्या सहकार्याने अल्प दरात चार्जिंग सेवा द्यायची आहे. कालांतराने मोफत सुविधा पुरवण्याचाही विचार आहे. चार्जिंगसाठी पैसे घेण्यापेक्षा लोकल फोन कॉलद्वारे जास्त उत्पन्न मिळेल.

## ★ अकबरने लिहून घेतलेले 'रामायण'

मुघल सम्राट अकबराने सुमारे ४५० वर्षांपूर्वी तयार करून घेतलेल्या रामायणाची सचित्र हस्तलिखिताची दुर्मिळ छापील प्रत भांडारकर प्राच्यविद्या संस्थेला प्राप्त झाली आहे. चित्र आणि पर्शियन भाषेत मजकूर असे या पुस्तकाचे स्वरूप आहे. 'भांडारकर'चे तत्कालीन ग्रंथपाल वा. ल. मंजुळ म्हणाले, ''अकबर बादशहा हा सर्व धर्मांच्या प्रती आस्था बाळगणारा होता. त्याने स्वत: अनेक धर्मियांचा अभ्यास करून 'ऐन-ए-अकबरी' हा ग्रंथ लिहिला. एकतिसाव्या वर्षी १५७३मध्ये अकबराने महाप्रभू चैतन्य यांचे अनुयायी रूपगोस्वामी आणि सनातन गोस्वामी यांची भेट घेऊन आपला आदर व्यक्त केला. त्याच्या दरबारात पन्नासहून अधिक चित्रकार होते. त्यांच्याकडून तो भारतीय प्राचीन धर्मग्रंथांच्या सचित्र आवृत्त्या हस्तलिखित स्वरूपात तयार करून घेत असे. आपला एक सरदार अल् अशरद याच्या वाढदिवसानिमित्त

अकबराने त्या काळात एक सचित्र रामायण तयार करून घेतले आणि ते त्याला भेट दिले. अल् अशरद यांच्या पुढच्या पिढ्यांच्या हातून हे पुस्तक अमेरिकेच्या 'स्मिथसोनियन' ग्रंथालयात पोचले. अगदी अलीकडे 'इंटरनॅशनल सेंटर फॉर कृष्णा काँशसनेस इस्कॉन' या संस्थेच्या सदस्यांनी ही प्रत मिळवून तिची छपाई करून दिल्लीत प्रसिद्ध केली.''

या ग्रंथातील पर्शियन भाषेतील मजकुरासह सीतेने रामाकडे हरणाच्या कातडीची मागणी केल्याचा एक प्रसंग दिसत आहे. अकबराने आपल्या दरबारातील चित्रकारांच्या मदतीने तयार केलेले बरेच ग्रंथ 'आग्रा फोर्ट'मध्ये जतन केले होते. आजही पुण्यातील चार-पाच ग्रंथालयांमध्ये मुघलकालीन हजारभर पर्शियन हस्तलिखिते आहेत.

## ★ 'आयसीएसई'च्या आठवीच्या पुस्तकातला घोळ

रमाबाई महादेव रानडे आणि पंडिता रमाबाई या दोन वेगवेगळ्या विदुषी असल्या तरी आयसीएसई बोर्डाच्या इतिहासतज्ज्ञांना मात्र त्या एकच वाटत असल्याचे दिसते. कारण आयसीएसई बोर्डाच्या इयत्ता आठवीसाठीच्या एका अधिकृत संदर्भ पुस्तकात रमाबाई रानडे यांच्या नावाने पंडिता रमाबाईंचा फोटो छापला आहे.

चुकीची कल्पना संबंधित अधिकाऱ्यांना दिली असतानाही बोर्डाने त्या विषयाच्या नव्या आवृत्तीमध्येही दुरुस्ती केली गेली नाही. ही बाब नीलिमा भुपटकर यांनी निर्दशनास आणून दिली.

## ★ आमीरखानला चित्रपटासाठी चांगली कथा हवी

भूमिका निवडण्यात आणि निभावण्यात चोख असणारा आमीर खान सिनेमा निर्मितीतही कोणती कसर सोडत नाही. गेल्या वर्षभरात त्याने तब्बल २०० कथा नाकारल्या असून, यात विशाल भारद्वाज, प्रदीप सरकार, रोहित शेट्टी, प्रियदर्शन अशा दिग्गज दिग्दर्शकांच्या कथांचा समावेश आहे. त्यामुळे येत्या वर्षात 'तलाश' नंतर आमीर खान प्रॉडक्शन हाऊस अंतर्गत एकही सिनेमा येणार नाही.

आमीरला पूर्णत: नवीन अशी पटकथा हवी आहे. ती कोठल्याही सिनेमावरून प्रेरित वगैरे नको. म्हणूनच कथा निवडताना बारकाईने पाहिले जाते.

## ★ सॅमसंगचा महत्त्वाकांक्षी 'गॅलक्सी एस फोर'

ॲपलच्या 'आयफोन ५'ला टक्कर देण्यासाठी आणि जागतिक स्मार्टफोनची बाजारपेठ काबीज करण्यासाठी सॅमसंगने 'गॅलक्सी एस फोर'हा नवा अँड्रॉइड फोन न्यूयॉर्कमध्ये लाँच केला. त्यात अँड्रॉइडची सुधारित आवृत्ती असणाऱ्या 'जेली बीन'चा आणि नेक्स्ट जनरेशन हार्डवेअरचा वापर करण्यात आला आहे.

बाजारात सध्या उपलब्ध असणाऱ्या ॲपल आयफोन, एचटीसी वन, नोकिया ल्युमिया ९२०, सोनी एक्स्प्रेरिया झेड आणि अन्य हाय एंड स्मार्टफोनशी स्पर्धा करेल, असा नवीनतम तंत्रज्ञान आणि संकल्पना यांचे अनोखे मिश्रण असलेला हा फोन भारतीय बाजारपेठेत १६,३२ आणि ६४ जीबी या तीन प्रकारांमध्ये उपलब्ध होणार आहे. केवळ १३० ग्रॅम वजन असलेल्या या स्मार्टफोनची बॅटरी २६०० मिलीॲम्पिअर तास असणार आहे.

- १३ मेगापिक्सलचा बॅक कॅमेरा आणि २ मेगापिक्सलचा फ्रंट कॅमेरा
- अवघ्या ४ सेकंदात या हॅण्डसेटमधून १०० छायाचित्रे शकतात.
- एस ४ रियल टाइम ट्रान्सलेटरच्या माध्यमातून हॅण्डसेटमध्ये भाषांतराची सोय.
- आंतरराष्ट्रीय भाषांचे भाषांतर करणे शक्य.
- आय ट्रॅकिंग फिचरमुळे कॅमऱ्यावरून आपले लक्ष हटल्यास आपोआप व्हिडिओ पॉझ होईल.
- ग्रुप प्लेमुळे सॅमसंगच्या इतर हॅण्डसेटमध्ये एकच गाणे एकाचवेळी वाजवले जाऊ शकते.
- ग्लोव्हज घालूनही या हॅण्डसेटमधील टचस्क्रिन वापरता येईल.
- १०८० पिक्सलची हाय डेफिनेशनची स्क्रिन
- ८ कोअर प्रोसेसर

## ★ शाळांची प्रतवारी

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाच्या आवाहनानुसार यंदा ऑनलाइन ग्रेडेशनसाठी १८ हजार ३६२ शाळांनी प्रतिसाद दिला. शाळांना स्वयंमूल्यमापनाच्या आधारे प्रतवारी ठरवायची होती. भौतिक सुविधांसाठी २०० गुण, शालेय व्यवस्थापन २०० गुण, विद्यार्थ्यांचा सर्वांगीण व्यक्तिमत्त्व विकास ५०० गुण आणि माहिती व संपर्क तंत्रज्ञान १०० गुण अशा एकूण १ हजार गुणांच्या आधारे ए प्लस, ए बी प्लस, बी, सी प्लस, सी आणि डी अशी प्रतवारी ठरवली गेली.

चांगली प्रतवारी मिळवायची असेल तर विद्यालयात जनरेटर, इन्व्हर्टर, सौर ऊर्जा, क्रीडांगण, पिण्याच्या पाण्यासाठी वॉटर प्युरिफायर, बगीचा आणि त्यात फुलझाडांसह औषधी वनस्पती, संगणक आणि त्यासाठी वातानुकूलित वर्ग, टीव्ही, रेडिओ, टेपरेकॉर्डर, प्रत्येक खोलीत स्पीकर, वाहनतळ, मुख्य प्रवेशद्वाराजवळ सुरक्षा रक्षक अशा सुविधा आवश्यक मानल्या गेल्या आहेत. या सुविधा पुरवण्यात बहुतांश शाळा अपयशी ठरल्या आहेत. ए प्लस दर्जा प्राप्त करणाऱ्या ६० शाळांखेरीज १११९ शाळांना ए, १५८२ शाळांना बी प्लस, २१९५ शाळांना बी,

२४७० शाळांना सी प्लस, १० हजार ८२१ शाळांना सी तर ११५ शाळांना सर्वांत तळाची डी ही श्रेणी मिळाली आहे. डी श्रेणीच्या ५४ शाळा मुंबई विभागात आहेत, तर सर्वोत्तम ए प्लस हा दर्जा प्राप्त करणाऱ्या १९ शाळादेखील मुंबई विभागातच आहेत. सी श्रेणीच्या नाशिक विभागात १ हजार ७३४ शाळा अमरावती विभागात १६४४, कोल्हापूर विभागात १५६० तर पुणे विभागात १३९७ शाळा आढळून आल्या. शहरी भागात तर शाळांसाठी मैदानेच नाहीत, क्रीडागंणे, धावपट्ट्या, बगीचा आणि औषधी वनस्पती हे निकष बहुतांश शाळांसाठी स्वप्नवत ठरले आहेत. दुसरीकडे कायम विनाअनुदानित मधील कायम शब्द वगळून शासनाने खासगी शाळांना दिलासा दिला. पण प्रतवारीने अनुदान मिळवण्याचा मार्गही खडतर बनवून टाकला आहे.

### ★ दादासाहेब फाळके यांच्या गौरवासाठी चार दिग्गजांचा 'बॉम्बे टॉकीज'

भारतीय सिनेमाचे शतसांवत्सरिक वर्ष सरकारने तसेच विविध संस्थांनी निरनिराळ्या कार्यक्रमांद्वारे साजरे केले. आता बॉलीवूडचे चार दिग्दर्शक सिनेमा शताब्दी अनोख्या पद्धतीने साजरी करणार आहेत. करण जोहर, अनुराग कश्यप, झोया अख्तर आणि दिबाकर बॅनर्जी हे चार दिग्दर्शक चार कथापटांचा 'बॉम्बे टॉकीज' हा चित्रपट प्रदर्शित करणार आहेत. विशेष म्हणजे दिबाकर बॅनर्जीचा आपला लघुपट ऑस्करविजेते दिग्दर्शक सत्यजित राय यांच्या लघुकथेवर बेतला आहे.

### ★ वाङ्मयशोभा डिजिटल स्वरूपात

संपादक मनोहर महादेव केळकर यांनी १९३९ मध्ये वाङ्मयशोभा मासिक सुरू केले. १९९४ मध्ये त्यांचे निधन झाले आणि ते बंद पडले.

पंडित महादेवशास्त्री जोशी, कवी माधव ज्युलियन, वि. म. कुलकर्णी, गंगाधर गाडगीळ, भानू शिरधनकर, नारायण धारप, शांताराम आठवले, जी. ए. कुलकर्णी, स्वातंत्र्यवीर विनायक दामोदर सावरकर अशा अनेक दिग्गजांनी 'वाङ्मयशोभा'तून लेखन केले आहे.

साहित्यसम्राट न. चिं. केळकर हे 'ममं'चे चुलते. त्यांच्यासह मातुःश्री गिरिजाबाई केळकर, काका प्रा. द. के. केळकर अशांचा साहित्यिक वारसा त्यांना लाभला होता.

साहित्याच्या दालनात प्रवेश करू इच्छिणाऱ्या अनेक लेखकांना केळकर यांनी मार्गदर्शन केले. त्यातले अनेकजण पुढे प्रकाशात आले. 'मनोहर ग्रंथमाला' या प्रकाशन संस्थेद्वारे २५० पुस्तकेही त्यांनी प्रकाशित केली.

आता ‘वाङ्मयशोभा’चे सर्व अंक ‘डीव्हीडी’ संचाद्वारे वाचकांना बघता येतील अशी माहिती चिरंजीव अविनाश केळकर यांनी दिली.

संपादक मनोहर महादेव केळकर यांच्या जन्मशताब्दीनिमित्त त्यांच्या कुटुंबीयांनी २४ मार्च रोजी डिजिटल स्वरूपातील अंकांचे लोकार्पण केले.

## ★ पंडित शामराव कुलकर्णी यांचे संगीतावरील ग्रंथ

पंडित शामराव कुलकर्णी उर्फ स्वामी धर्मव्रत हे मूळचे इचलकरंजीचे. ग्वाल्हेर घराण्याबरोबरच अल्लादिया खाँ आणि गोखले घराण्याची गायकी त्यांनी आत्मसात केली असून त्यांची ३० पुस्तके प्रकाशित झाली आहेत.

सध्या ते अमेरिकेत कॅलिफोर्निया मध्ये हिंदुस्थानी शास्त्रीय संगीत शिकवितात. त्यांनी रागांचे गती व मूल्य जाणून नव्याने वर्गीकरण केले आहे.

शामराव घराणा रिडिफाईनिंग हिंदुस्थानी म्युझिक - ए व्होकल बेसड् क्लासिफिकेशन सिस्टिम, बांदिश अँड बढत या तीन ग्रंथांतून त्यांनी ७५ रागांचा शास्त्रशुद्ध अभ्यास मांडला आहे.

या ग्रंथांच्या संपादक डॉ. उषा अरुणाचलम असून प्रिझम बुक्स, बेंगलोर हे प्रकाशक आहेत.

## ★ ग्रेस यांचा प्रथम स्मृतिदिन

‘ग्रेसच्या कवितेवर दुर्बोधतेचा शिक्का बसला; पण प्रत्येक कविता कळलीच पाहिजे असे नाही. कारण गायकाप्रमाणे वाचकाचाही रियाज असतो. क्लासिकल, शुद्धतेपर्यंत पोहोचण्यासाठी वाचकानेही स्वत: काहीतरी तयारी केली पाहिजे.’ अशी भावना ज्येष्ठ नाटककार महेश एलकुंचवार यांनी व्यक्त केली.

कवी ग्रेस यांच्या पहिल्या स्मृतिदिनानिमित्त स्वरभारती या संस्थेने ‘मैत्र जीवांचे’ हा कार्यक्रम आयोजित केला होता. यावेळी ज्येष्ठ संगीतकार पं. हृदयनाथ मंगेशकर उपस्थित होते.

एलकुंचवार आणि ग्रेस यांची कॉलेजपासूनची मैत्री होती. कॉलेजमध्ये असताना ग्रेस म्हणजे धडकी भरवणारे व्यक्तिमत्त्व वाटे. वेदनेच्या धाकाचे वर्तुळ त्यांच्याभोवती असल्याचे सतत जाणवायचे. कॉलेजमध्ये असतानाच प्रसिद्ध झालेल्या त्यांच्या कवितांमुळे कवी अनिल यांच्यासारखे मोठे कवीही त्यांच्या प्रतिभेला वचकून असत. त्यांनी लिहिलेल्या कविता वाचल्यानंतर पुढचे दिवस झपाटल्यासारखे, चेटूक केल्यासारखे वाटले होते, अशा अनेक आठवणी एलकुंचवार यांनी ग्रेस यांची नक्कल करीत सांगितल्या.

‘ग्रेसच्या कविता म्हणजे शब्दांच्या पलीकडचा अनुभव असतो. त्याच्या

शब्दांत अर्थ शोधू नये. त्याच्या इतके सर्वोत्तम मराठी साहित्यात कुणी लिहिलेले नाही. थोर कलाकृती एकार्थ नसते. कवितेचा बुद्धिगम्य अर्थ लावणे हे धोक्याचे असते. त्यामुळे आस्वादकतेला वेगळे वळण मिळते. ग्रेसच्या कविता कळण्यासाठी संवेदना जागृत असाव्या लागतात. गायकाप्रमाणे वाचकाचीही तयारी असावी लागते. वाचकाचीही रियाज असतो. ग्रेसच्या दंतकथा, त्याने लिहून ठेवलेल्या कविता, साहित्य यातून कोणी लेखकानं वा माणसानं ग्रेस कळल्याचा 'क्लेम' करू नये. कारण तो आवाक्याबाहेरचा आहे. आपण काय गमावले हे गमावल्यानंतरच कळते. ग्रेस हे कोडे तसेच राहिल्याचे एलकुंचवार म्हणाले. ग्रेसच्या स्वभावापलीकडे निखळ असे काही होते. प्रत्येक कविता कळलीच पाहिजे असे नाही. मग त्याच्या कवितेवर दुर्बोध म्हणून अन्याय का करायचा,' असा सवाल त्यांनी उपस्थित केला.

## ★ गुगल अँड्रॉइडच्या प्रमुखपदी सुंदर पिचाई

आयआयटी खरगपूरचे माजी विद्यार्थी सुंदर पिचाई यांची गुगल कंपनीच्या अँड्रॉइड विभागाच्या प्रमुखपदी निवड करण्यात आली आहे.

सुंदर पिचाई हे यापुढे सध्याच्या क्रोम ॲप्स या दोन विभागांव्यतिरिक्त गुगल अँड्रॉइड हा विभाग सांभाळतील असे गुगलचे मुख्य कार्यकारी अधिकारी लॅरी पेज यांनी सांगितले. पिचाई हे अतिशय बुद्धिमान असून त्यांनी कंपनीला तांत्रिकदृष्ट्या सरस व वापरायला सोपी अशी चांगली उत्पादने दिली आहेत, असे पेज यांनी ब्लॉगवर घोषणा करताना म्हटले आहे.


वेगवान, साधे व सुरक्षित हे गुगल क्रोम ब्राऊझर पिचाई यांनी विकसित केले आहे. २००८ मध्ये जगाला नवीन ब्राऊजरची गरज आहे का, असा प्रश्न गुगल क्रोमबाबत विचारला गेला होता. पण आज क्रोमचा वापर लाखो लोक करीत आहेत.

## ★ कम्प्युटर विज्ञानात संशोधन

कोल्हापूरच्या छत्रपती शाहू इन्स्टिट्यूट ऑफ बिझनेस एज्युकेशन ॲन्ड रिसर्च (सायबर) या संस्थेतून अध्यापन करणारे राजेंद्र अकेरकर नार्वेतील वेस्टर्न नॉर्वे रिसर्च इन्टिट्यूटमध्ये प्रोफेसर आणि वरिष्ठ संशोधक म्हणून कार्यरत आहेत.

अप्लाईड मॅथेमॅटिक्स आणि कम्प्युटरमध्ये पदवीधर असून ते सध्या भाषा आणि अध्ययन यावर संशोधन करीत आहेत. अकेरकर हे 'इंटरनॅशनल जर्नल ऑफ कम्प्युटर सायन्स आणि ॲप्लिकेशन्स'चे मुख्य संपादक तसेच 'जर्नल ऑफ मेटाडाटा, सिमॅन्टिक आणि ॲन्टॉलॉजिस' या आंतरराष्ट्रीय जर्नलचे सहसंपादक आहेत. ई कॉमर्स, सिमॅन्टीक टेक्नॉलॉजिस, कॉग्निटिव्ह टेक्नॉलॉजी आणि डाटा मायनिंग विषयक विविध आंतरराष्ट्रीय परिषदांत त्यांचा सक्रिय सहभाग असतो.

**६वी आवृत्ती**




# चिकन सूप फॉर द वुमन्स सोल

लेखन व संकलन :
**जॅक कॅनफिल्ड । मार्क व्हिक्टर हॅन्सन**
**जेनिफर रीड हॉथॉर्न । मार्सी शिमॉफ**
अनुवाद : **श्यामला घारपुरे**

स्त्रीची व्याख्या अनेक प्रकारांनी करता येईल.
विद्यार्थिनी, कन्या, मैत्रीण, पत्नी, आई, गृहिणी, व्यावसायी!
प्रत्येक रूप हे खास व अलौकिक असे असते. तरी त्यांतही एक असा सामान्य धागा असतो. तो प्रत्येकीच्या स्वभावात असतो.
प्रेमाचे बंध हळुवारपणे जपणारी, आजीवन मैत्री किंवा नाते निभावणारी, निवडलेल्या क्षेत्रांशी बांधिलकी घट्ट करणारी ही स्त्री! कौटुंबिक जीवनात फुलोरा फुलवणारी,
त्याचबरोबर सामाजिक जीवनही सुसह्य करणारी!
न्यूयॉर्क टाइम्सच्या 'Chicken Soup for the Soul' ह्या मालिकेत वेगवेगळ्या शीर्षकांखाली भावभावनांचे खास मिश्रण आहे!
या पुस्तकामध्ये स्त्रीशी निगडित असलेल्या साऱ्या गुणवैशिष्ट्यांचे मार्मिक चित्रण आढळते.
स्त्रीच्या आत्म्याची मंगलता व सौंदर्य इथे प्रगट होते!
व्यावसायिक असो की गृहिणी, बालिकेपासून वृद्ध स्त्रीपर्यंत
सगळ्यांना हे अनुभव भावतील. ह्यातून त्यांना स्फूर्ती, आनंद मिळेल. इतकेच नव्हे; तर स्वत:चीही ओळख होऊ शकेल.
ह्या अनुभवांची सोबत दीर्घकालपर्यंत स्त्रियांना मिळू शकेल.

यांचे १०० हून अधिक शोधनिबंध आंतरराष्ट्रीय जर्नल्समधून प्रसिद्ध झाले आहेत. इन्टेलिजन्ट टेक्नॉलॉजिस फॉर वेब ॲप्लिकेशन, नॉलेज बेस्ड सिस्टिम फाऊंडेशन ऑफ द सिमॅन्टिक वेब, डिस्क्रिट मॅथॅमेटिक्स आदी ११ पुस्तकेही त्यांनी लिहिली आहेत. 'नॉलेज बेस्ड सिस्टीम' पुस्तकात मानवी निर्णयक्षमता अध्ययन आणि क्रिया (ॲक्शन) यासंबंधी मूलभूत स्वरूपाचे संशोधन मांडले आहे. अकेरकर हे भारत सरकारच्या विज्ञान आणि तंत्रज्ञान खात्यातर्फे देण्यात येणाऱ्या युवा संशोधक पुरस्काराचेही मानकरी ठरले आहेत. १९९७ ते २००५ या काळात १८५ विद्यार्थ्यांनी त्यांच्या मार्गदर्शनाखाली मास्टर्स प्रोजेक्ट तर ६२ विद्यार्थ्यांनी कम्प्युटर ॲप्लिकेशन्स क्षेत्रात पोस्ट ग्रॅज्युएट डिप्लोमा प्रोजेक्ट पूर्ण केले आहेत. १९९७ मध्ये टेक्नोमॅथेमॅटिक्स रिसर्च फाऊंडेशनची स्थापना करून त्यांनी नवसंशोधकांसाठी एक व्यासपीठ निर्माण करून दिले आहे.

## ★ मराठी साहित्य : काही संकेतस्थळे

http://www.marathipustake.org/ या साइटवर ज्ञानेश्वरीपासून, कोशवाङ्मय, ऐतिहासिक साहित्य, संगीत नाटकं, कथा कादंबऱ्या आदी साहित्य मोफत डाउनलोडिंगसाठी उपलब्ध आहे. 'डिजिटल लायब्ररी ऑफ इंडिया' हा केंद्र सरकारचा उपक्रम आहे. त्यामध्ये विविध भाषांतील जुनी पुस्तके स्कॅन करून त्याची पीडीएफ फाइल जतन केली जाते. अनेक भारतीय भाषांतील (मराठीसह) पुस्तकं http://www.new.dli.ernet.in/ या साइटवर उपलब्ध आहेत. साहित्यचिंतन (sahityachintan.com) या साइटवर काही पुस्तकं ई-बुक स्वरूपात; तर काही अँड्रॉइड मोबाइलवर डाउनलोड करण्याच्या स्वरूपात उपलब्ध आहेत. उदा. 'श्यामची आई', 'काळे पाणी', ज्ञानेश्वर महाराज कृत हरिपाठ इ.

महाराष्ट्राचे शिल्पकार यशवंतराव चव्हाण यांच्या जन्मशताब्दीनिमित्त मुंबईतील यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठानने त्यांचे साहित्य, त्यांची विधिमंडळातील भाषणे आदी संदर्भ साहित्य या वेबसाईटवर संकलित केले आहे. मराठीतील अभिजात वाङ्मयासाठी 'मराठी पुस्तके' या साइटने ई-बुकचा उपक्रम सुरू केला आहे. प्रबोधनकार ठाकरे यांचे साहित्य या साइटवर उपलब्ध आहे.

## ★ विज्ञानाची ४ हजार पुस्तके रावत नेटर ॲकॅडमीमध्ये

विज्ञानविषयक सहज उपलब्ध न होणारी जागतिक दर्जाची पुस्तके, इंटरनेटद्वारे ई–बुक्स आणि जर्नल्सचा ॲक्सेस, प्राण्यांपासून वनस्पतींची माहिती, प्रसिद्ध शास्त्रज्ञांची 'लाइव्ह' व्याख्याने आणि मराठीतील विज्ञान पुस्तके सातारा रस्त्यावरील पेंटागॉन संकुलात (पंचमी हॉटेलजवळ) 'रावत नेटर ॲकॅडमी' (आरएनए) मध्ये मिळणार

# व. पु. काळे यांची साहित्यसंपदा

**रंग मनाचे**

किंमत : २००/-रु. । पोस्टेज : २५/-रु.

१३ वी आवृत्ती

**वपु सांगे वडिलांची कीर्ती**

किंमत : १००/-रु. । पोस्टेज : २५/-रु.

९ वी आवृत्ती

**कथाकथनाची कथा**

किंमत : १३०/-रु. । पोस्टेज : २५/-रु.

६ वी आवृत्ती

**मोडेन पण वाकणार नाही**

किंमत : १००/-रु. । पोस्टेज : २५/-रु.

१५ वी आवृत्ती

**इन्टिमेट**

किंमत : १२०/-रु. । पोस्टेज : २५/-रु.

१२ वी आवृत्ती

**हुंकार**

किंमत : १२०/-रु. । पोस्टेज : २५/-रु.

११ वी आवृत्ती

**भुलभुलैय्या**

किंमत : १२०/-रु. । पोस्टेज : २५/-रु.

१० वी आवृत्ती

**सखी**

किंमत : १४०/-रु. । पोस्टेज : २५/-रु.

१४ वी आवृत्ती

आहेत.

आरएनएचे उद्‌घाटन शास्त्रज्ञ व राष्ट्रीय सल्लागार मंडळाचे सदस्य प्रा. माधव गाडगीळ, पुणे विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. वासुदेव गाडे आणि आयसरचे शास्त्रज्ञ प्रा. एल. एस. शशिधर यांच्या हस्ते ता. १४ एप्रिल रोजी झाले.

''विज्ञानविषयक चार हजार पुस्तके नागरिकांसाठी उपलब्ध आहेत त्याचा फायदा विद्यार्थ्यांसह शिक्षकांना व शैक्षणिक संस्थांना होणार आहे. जीवविज्ञानाची लोकजाणीव वाढविणे व ती अधिक प्रगल्भ करणे हा अॅकॅडमीचा उद्देश आहे.''

''तसेच येत्या वर्षभरात 'डिस्टन्स लर्निंग'च्या माध्यमातून शिक्षकांच्या प्रशिक्षणाचे उपक्रम राबविण्यात येतील,'' असेही संस्थापक प्रदीप रावत यांनी सांगितले.

## ★ बेंद्रे लिखित पुस्तकांचे प्रकाशन

छत्रपती शिवाजी महाराजांनी हिंदू-मुस्लिम धर्मीयांमध्ये एकोपा ठेवून समाज जोडला. ही एकात्मतेची परंपरा सुरू करण्याचा पहिला मान मालोजीराजे भोसले यांना जातो. इतक्या सूक्ष्म पद्धतीने शिवकालीन संशोधन करून, खरा इतिहास समाजासमोर मांडण्याचे महत्त्वपूर्ण काम वा. सी. बेंद्रे यांनी केले, असे मत डॉ. सदानंद मोरे ८ एप्रिल रोजी यांनी व्यक्त केले.

वा. सी. बेंद्रे लिखित 'मालोजीराजे आणि शहाजी महाराज', 'छत्रपती शिवाजी महाराज','शिवराज्याभिषेक प्रयोग' आणि 'छत्रपती संभाजी महाराज' या पुस्तकांचे प्रकाशन इतिहासाचे अभ्यासक निनाद बेडेकर यांच्या हस्ते झाले. या वेळी इतिहास अभ्यासक पांडुरंग बलकवडे व राहुल मेहता उपस्थित होते.


डॉ. मोरे म्हणाले, '' मालोजीराजे यांच्यापासून ते छत्रपती राजाराम यांच्यापर्यंतच्या संपूर्ण शिवकालाचे बेंद्रे यांनी शास्त्रीय पद्धतीने संशोधन केले आहे. तसेच, संत तुकारामांवरील त्यांचे लेखनही तितकेच महत्त्वपूर्ण आहे. बेंद्रेंच्या लेखनाचा आधार घेऊनच अनेक लेखकांनी कथा-कादंबऱ्या लिहून नाव मिळवले.''

बेडेकर म्हणाले, ''इतिहास संशोधन ही एक विरक्ती व त्याग आहे. अशा त्यागाची मोठी परंपरा महाराष्ट्राला लाभली आहे. त्यामुळेच, देशामध्ये सर्वाधिक इतिहास संशोधक आपल्याकडे आहेत. अशा संशोधकांमध्ये बेंद्रे अग्रभागी आहेत.''

बलकवडे म्हणाले, ''आपल्या इतिहासात व साहित्यात संभाजी महाराजांना बंडखोर व व्यसनाधीन दाखवून त्यांच्यावर अन्याय केला आहे. बेंद्रे यांनी मात्र संभाजी महाराजांचा खरा इतिहास समाजासमोर आणला.''

## ★ राजा परांजपे महोत्सव

कविता हा कवीचा उत्स्फूर्त उद्‌गार असतो. कविता सुचते तेव्हा ती आशय




**आगामी**

# ॲन्ड देअरबाय हँग्ज अ टेल

मूळ लेखक

**जेफ्री आर्चर**

अनुवाद- **डॉ. देवदत्त केतकर**

दिल्लीच्या एका ट्रॅफिक सिग्नलजवळ थांबलेले असताना जामवाल आणि निशा प्रेमात पडतात...

या पंधरा कथांपैकी एकीची ही सुरुवात. जेफ्री आर्चर यांना त्यांच्या जगभराच्या भ्रमंतीतून मिळालेल्या गोष्टींचा हा सहावा लघुकथासंग्रह

'अ गुड आय' ही गोष्ट जर्मनीत घडते. एक अमूल्य तैलचित्र एका कुटुंबात दोनशे वर्षं असतं. पण एके दिवशी...

'मेंबर्स ओन्ली' या खाडीतल्या बेटावरच्या एका तरुणाला नाताळच्या पोतडीत गोल्फ बॉल मिळतो, आणि त्याचं आयुष्यच बदलून जातं.

इटलीत, 'नो रूम ॲट द इन'अशा स्थितीत हॉटेलात खोली घ्यायला गेलेला एक तरुण थेट तिथल्या रिसेप्शनिस्टच्या बिछान्यात पोचतो. इंग्लंडमध्ये घडणारी 'हाय हील्स' बुटांचे जोड सहजासहजी का जळून जाऊ शकत नाहीत, हे एक स्त्री तिच्या नवऱ्याला सांगते.

काही गोष्टींनी तुम्हाला हसू येईल... काहींनी डोळ्यांत पाणी येईल... पण त्या तुम्हाला खिळवून ठेवतील, हे नक्की.

आणि आकृतिबंध घेऊनच येते. हा पाऊस ओंजळीत वेचणे एवढेच कवीच्या हाती असते, असे मत प्रसिद्ध कवी–गीतकार संदीप खरे यांनी व्यक्त केले.

राजा परांजपे महोत्सवाचे उद्घाटन सकाळ माध्यम समूहाचे अध्यक्ष प्रतापराव पवार यांच्या हस्ते झाले.

संदीप खरे, अभिनेत्री उषा जाधव, दिग्दर्शक रवी जाधव, पार्श्वगायिका बेला शेंडे आणी छायालेखक संजय जाधव यांना प्रतापराव पवार यांच्या हस्ते तरुणाई सन्मान प्रदान करण्यात आला.

हा पुरस्कार म्हणजे राजाभाऊंचा आशीर्वाद अशी भावना सर्व कलाकारांनी व्यक्त केली. उषा जाधव म्हणाल्या, नोकरी करण्यासाठी मी मुंबईला गेले. मैत्रिणीने सांगितले म्हणून मधुर भांडारकर यांच्याकडे ऑडिशन दिली. 'ट्रॅफिल सिग्नल' चित्रपटामुळे अभिनयाचे दालन खुले झाले. जाहिरातीसाठी काम केले. 'कौन बनेगा करोडपती'च्या जाहिरातीसाठी अमिताभ बच्चन यांच्याबरोबर काम केल्यामुळे घरच्यांचा विरोध मावळला आणि त्यांनाही आपल्या मुलीचा अभिमान वाटला.

जाहिरात कंपनीतील मोठ्या अधिकाराची नोकरी सोडून चित्रपटासारख्या अशाश्वत जगामध्ये प्रवेश केलेले रवी जाधव म्हणाले, ''तमाशा आणि नाच्या या विषयाला न्याय देणारा चित्रपट हा विषय हाताळण्याचे ठरवून 'नटरंग'ची निर्मिती केली. युवा प्रेक्षक हाच 'टार्गेट ऑडियन्स' असल्याने 'बालगंधर्व' आणि 'बालक–पालक' या चित्रपटांची निर्मिती केली. आता 'टाईम–पास या चित्रपटांचे काम सुरू आहे.''

अभिनयासाठी ऑफर्स आल्या असल्या तरी गायन हेच आपले पहिले प्रेम आहे अशी भावना बेला शेंडे यांनी व्यक्त केली. गाणं हे गाणंच असतं, गाण्याला भाषेचे बंधन नसते, असेही त्यांनी सांगितले.

### ★ दमा : नाबाद ८६

'अक्षरधारा' तर्फे प्रा. द. मा. मिरासदार यांच्या ८६व्या वाढदिवसानिमित्त शिवशाहीर बाबासाहेब पुरंदरे यांच्या हस्ते पुणेरी पगडी आणि उपरणे प्रदान करून सत्कार करण्यात आला.

पंढरपुरमधील वैविध्यपूर्ण माणसांनी विनोदासाठी पुरविलेले खाद्य.... लग्नात नाही, पण कथाकथनासाठी मराठवाड्यामध्ये घोड्यावरून प्रवास करताना खोगीर घसरल्यामुळे झालेली फजिती... निर्माते आणि अभिनेत्री यांच्यातील भांडणामुळे चित्रपटासाठी पटकथालेखनामध्ये करावी लागलेली कसरत... अशा धमाल किश्श्यांची पेरणी करीत दमांनी विनोदाच्या आख्याना'तून हास्यकल्लोळ केला.

द. मां.ची ग्रंथतुला करण्यात आली. या ग्रंथतुलेतील पुस्तके नाशिक येथील कुसुमाग्रज प्रतिष्ठान आणि सातारा जिल्ह्यातील कोरेगावच्या शाळेला भेट देण्यात

आली. **यावेळी ८६ भाग्यवान ग्राहकांना द. मा. मिरासदार यांची ८६ पुस्तके 'मेहता पब्लिशिंग हाऊस'तर्फे भेट देण्यात आली.** उत्तरार्धात प्रा. मिलिंद जोशी यांनी द. मा. मिरासदार यांच्याशी संवाद साधला. त्यापूर्वी अप्पा बळवंत चौकातील अक्षरधारा बुक डेपोचे उद्घाटन मिरासदार यांच्या हस्ते झाले. रसिका राठिवडेकर, डॉ. संजीवनी देवरे आणि डॉ. संजयकुमार देवरे याप्रसंगी उपस्थित होते.

बाबासाहेबांनी माझा केलेला गौरव म्हणजे 'तेजाने केलेली ज्योतीची आरती' आहे, अशी कृतज्ञतापूर्व भावना व्यक्त करून द. मा. मिरासदार म्हणाले, मराठीच्या सध्याच्या अवस्थेला काही प्रमाणात शिक्षक कारणीभूत असून त्यांनी वाचन केले पाहिजे. आचार्य अत्रे आणि चिं. वि. जोशी यांच्या विनोदाचा संस्कार माझ्यावर आहे. अत्रेंचा रासवट विनोद पुलंनी सुसंस्कृत केला. अभिजात विनोदाने माणसाला हसू यावे आणि आनंद मिळावा.

## ★ 'देवाशपथ खरे सांगेन' चे प्रकाशन

''वकिली व्यवसायात प्रत्येकाला अनेक गमतीदार अनुभव येतात. मात्र, या अनुभवांचे टिपण कोणीही करीत नसल्याने हे अनुभव स्वत:पुरते मर्यादित राहतात. परंतु, ॲड. रेणू देव यांनी 'देवाशपथ खरं सांगेन' या पुस्तकाच्या रूपाने वकिली व्यवसायातील अनुभव समाजासमोर आणले असे गौरवोद्गार मुख्य जिल्हा न्यायाधीश अनंत बदर यांनी पुस्तकाचे प्रकाशन करताना काढले.

लेखिका रेणू देव म्हणाल्या, ''व्यवसायात आलेल्या अनुभवांमुळे आयुष्य कसे जगावे, याचा धडा मिळावा. मालमत्तेच्या वादांना मान–अपमानाचा शाप असतो. त्यामुळे मान–अपमान दूर ठेवला आणि प्रामाणिक मनाने कायद्याचा विचार करून थेटपणे संवाद साधला, तर अनेक वाद मिटू शकतील. परंतु प्रत्यक्षात हे घडत नाही. पुस्तकातील सर्व अनुभव प्रत्यक्षात घडलेले असल्यामुळे पुस्तक अधिक जिव्हाळ्याचे झाले आहे.''

## ★ ८० लाख 'डिजिटल सिटिझन'

२००१ मध्ये स्थापन झालेल्या महाराष्ट्र ज्ञान महामंडळ (एमकेसीएल) या संस्थेने सर्वदूर संगणक प्रशिक्षण देण्याच्या उद्देशाने MS CIT हा संगणक कोर्स सुरू केला. खेड्यापाड्यातील तरुणांना संगणकाचे परिपूर्ण प्रशिक्षण देणारा हा कोर्स. आंतरराष्ट्रीय गुणवत्ता, मातृभाषेतून प्रशिक्षण, सोयीस्कर वेळा आणि माफक फी या चार वैशिष्ट्यांमुळे हा कोर्स केवळ ई– शिक्षणातला महत्त्वाचा टप्पा मानला जातो. डिजिटल सिटीझन घडवणे हे या कोर्सचे मुख्य वैशिष्ट्य आहे. कामातून ज्ञान

आणि ज्ञानातून फलदायी काम. संगणकावर काम करता करता संगणकाचे ज्ञान घ्यायचे आणि याच ज्ञानाचा दैनंदिन जीवानात उपयोग करून अनेक कामे करायची ही या मागची संकल्पना आहे. डिजिटल सिटीझन दैनंदिन जीवनात अनेक कामे संगणकावर लीलया करू शकतात. लाइटबिल भरणे, तिकीट आरक्षण, मोबाईल रिचार्ज करणे, मित्रमैत्रिणीशी, नातेवाईकांशी मनमुराद गप्पा मारणे, घरात बसून रस्ते शोधणे, आवडीच्या वस्तूंची खरेदी घरबसल्या करणे, हे सगळे डिजिटल सिटिझन सहजपणे करू शकतात. आतापर्यंत ८० लाख विद्यार्थी डिजिटल सिटिझन झाले आहेत.

## ★ 'संध्यासमयीच्या गुजगोष्टी'चे प्रकाशन

साधना ट्रस्टतर्फे प्रा. रा.ग. जाधव लिखित 'संध्यासमयीच्या गुजगोष्टी' या पुस्तकाचे प्रकाशन साहित्य महामंडळाच्या अध्यक्षा डॉ. माधवी वैद्य यांच्या हस्ते झाले. अर्थशास्त्राचे अभ्यासक डॉ. अभय टिळक यांनी जाधव यांच्याशी संवाद साधला. समाजाची आकलनक्षमता वाढवणे हे समीक्षकाचे काम आहे, असेही प्रा. जाधव म्हणाले. 'मराठी साहित्याचे प्राध्यापक वेतनवाढीसाठी आंदोलन करतात, परीक्षांवरही बहिष्कार घालतात. परंतु, त्यातील किती प्राध्यापक साहित्याचे सखोल वाचन करतात, हा प्रश्न आहे. शिक्षकांना पगार देण्याबरोबरच त्यांची जबाबदारीही समजावून देण्याची आवश्यकता आहे. केवळ पुस्तकी अभ्यास शिकवणे हे प्राध्यापकांचे काम नाही, तर पुस्तकापलीकडे जात संस्कृतीचे शिक्षण देणे हे शिक्षकांचे काम आहे.' असे परखड मत प्रा. जाधव यांनी व्यक्त केले.

## ★ विश्वकोश हा सरकारी पैशाचा अपव्यय

विश्वकोश ही उत्तम संकल्पना असली, तरीही राज्यातील विद्वानांनी चुकीच्या वेळी विश्वकोशाचा घाट घातला. समाजातील ५० टक्क्यांहून अधिक जनता अशिक्षित असताना विश्वकोशाची निर्मिती करणे हा चुकीचा निर्णय होता. छोटीछोटी पुस्तके काढून जनतेचे प्रबोधन करणे त्यावेळी आवश्यक होते. परिणामी, विश्वकोश हा सरकारी पैशाचा अपव्यय ठरतो आहे, अशी टीका प्रा. जाधव यांनी केली.

## ★ की चेनमध्ये बाळगता येईल इतका छोटा 'चार्जर'

इंग्लंडच्या डेव्होटेक इंडस्ट्रीजने जगातील सर्वात छोटा आपत्कालीन फोन चार्जर तयार केला असून त्याचा आकार १.३ इंच इतका आहे. चावीच्या रिंगमध्येही तो सहजपणे बाळगता येतो. गिझमॅगने दिलेल्या वृत्तानुसार 'किकस्टार्टर' नावाच्या संकेतस्थळावर या चार्जरची छबीही झळकवली असून तो ०.९ इंच रुंद व ०.५ इंच

जाडीचा आहे. या मायक्रो फ्युएल चार्जरचा वापर बहुतांश कंपन्यांच्या फोन चार्जिंगसाठी करता येतो. मायक्रो युएसबी पोर्ट असेच त्याचे स्वरूप आहे. तो ॲल्युमिनियमचा बनवलेला आहे चांगला मजबूत आहे, त्याचे वजनही कमी आहे. यात लिथियम आयन रिचार्जेबल बॅटरी वापरलेली असून त्यामुळे २०– ३० मिनिटांचा अवांतर टॉक – टाइम मिळतो तसेच काही तास तो स्टँडबाय मोडवर राहू शकतो. तीन महिने हा चार्जर चार्ज राहू शकतो. त्याला पॉवर स्विच असून त्यामुळे विनाकारण होणारे डिसचार्जिंग टळते.

सध्या आपल्याकडे बॅटरी केसेस, बॅटरी पॅक्स, सोलर चार्जर व इतर अनेक प्रकारचे चार्जर आहेत, पण त्यांचे वैगुण्य आहे ते म्हणजे त्यांचा आकार व वजन फ्युएल फोन चार्जर हे कारच्या चावीसारखे बाळगता येतात. हा चार्जर छोट्या गॅस कॉनिस्टरसारखा दिसतो. त्यात २२० मिलीॲंपीयरची बॅटरी आहे. या फोनला एक मायक्रो यूएसबी पोर्ट आहे. कुठलाही फोन त्याला लावता येतो, फक्त आयफोनसाठी ॲडॉप्टर गरजेचा असतो.

## ★ 'बुकर'ला आव्हान

साहित्यक्षेत्रातील ऑस्कर असं संबोधल्या जाणाऱ्या 'मॅन बुकर' पारितोषिकाला आव्हान देणाऱ्या ४० हजार पौंडाच्या 'फोलिओ पारितोषिका'चा पहिला मानकरी पुढील वर्षीच्या मार्च महिन्यात जाहीर केला जाईल. 'बुकर'ने आपली झेप राष्ट्रकुलातील देश आणि आयर्लंडपुरती मर्यादित ठेवली आहे. पण फोलिओने कोणत्याही साहित्यिकाच्या ब्रिटनमध्ये प्रसिद्ध झालेल्या कादंबरीसाठी हा पुरस्कार ठेवला आहे. नव्या गुणवंत लेखकांचा शोध घेण्याची बुकरची प्रक्रिया सीमित झाली आहे. उच्चभ्रू बुकर संस्कृती कालबाह्य झाली आहे अशी टीका बुकरवर केली जात आहे.

दुय्यम दर्जाचे सेलिब्रिटी परीक्षक आणि कलात्मक यशापेक्षा वाचनीयता हा निकष साहित्य निवडताना प्रभावी ठरत असल्याच्या वादाने गेल्या दोन वर्षात जोर धरला आहे. या पार्श्वभूमीवर सलमान रश्दी, झादी स्मिथ, सबॅस्टिअन फॉक्स यांच्यासारख्या प्रसिद्ध लेखकांकडे फोलिओने महत्त्वाची भूमिका सोपविली आहे. तरीही कोस्टा बुक ॲवॉर्ड, विमेन्स प्राइझ फॉर फिक्शन, सॅम्युएल जॉन्सन प्राइझ किंवा प्रत्येक साहित्यप्रकारासाठी ठेवलेल्या विविध पारितोषिकांच्या भाऊगर्दीत आणखी एका फोलिओची गरज आहे का, हा प्रश्न विचारला जात आहे. हा प्रश्न एकट्या ब्रिटनपुरता मर्यादित नाही. आपल्याकडेही असे डझनावारी पुरस्कार जाहीर होत असतात. या पुरस्कारांचे नेमके प्रयोजन काय या प्रश्नाची लेखकाचा हुरूप वाढावा, प्रोत्साहन मिळावं, प्रसिद्धी मिळावी, त्याच्या पुढच्या पुस्तकांना मोकळी वाट मिळावी अशी काही ठराविक उत्तरे देता येतील.

ब्रिटनमध्ये मर्यादित लेखकांसाठी दिल्या जाणाऱ्या सॉमरसेट मॉमसारख्या पुरस्कारांप्रमाणे आपल्याकडे मिळणाऱ्या पुरस्कारांनी नव्या लेखकांना ओळख मिळते. मात्र अमेरिकेत मानाच्या समजल्या जाणाऱ्या पुलित्झर पारितोषकाला पुरस्कारार्थी मिळत नाहीत, असे चित्र आहे. गेली १० वर्षे अंतिम यादीतील एकही पुस्तक या पुरस्काराला पात्र ठरलेले नाही. अमेरिकेत दर्जेदार पुस्तकेच प्रसिद्ध होत नाहीत की परीक्षकांचे एकमत होत नाही? 'बुकर पारितोषिक मिळवा आणि करोडपती व्हा' किंवा 'कोस्टा मिळवा आणि केट अ‍ॅटकिन्सन अन् मार्क हेडनसारखं करियर सेट करा,' अशा टीकेला पुरस्कार देणाऱ्या आणि घेणाऱ्या दोघांनाही सामोरं जावं लागतं. गटतटांच्या राजकारणात दुय्यम लेखक, लेखिकांनाही मानाच्या रांगेत येऊन बसवलं जातं. लेखक आणि लेखनाचा गौरव करण्यासाठी, नव्या लेखकांना प्रोत्साहन देण्यासाठी आणि लेखकाला वाचकांपर्यंत पाहोचविण्यासाठी पुरस्कार हाच मानदंड आणि मापदंड समजला जाऊ नये, हे मात्र खरे.

### ★ विश्व काव्य संमेलन


आंतरराष्ट्रीय मानवी हक्क न्याय संघटनेतर्फे आयोजित पहिल्या विश्व काव्य संमेलनाला कवी आणि रसिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. अध्यक्षस्थानी डॉ. मधुसूदन घाणेकर होते. अ‍ॅड. प्रमोद आडकर यांनी संमेलनाचे उद्‌घाटन केले. गझलकार प्रदीप निफाडकर, नायजेरियन कवी बशर उस्मान, कवयित्री स्वाती दीक्षित आदी या वेळी उपस्थित होते. निफाडकर यांना 'फैज अहमद फैज' पुरस्कारांने गौरविण्यात आले. 'डहाळी' या विशेषांकाचे प्रकाशन यावेळी झाले. डॉ. तृप्ती आवदे यांनी प्रस्ताविक केले. मंदा नाईक यांनी आभार मानले.

### ★ निवृत्त लष्करप्रमुखांच्या आत्मचरित्राचे प्रकाशन

भारताचे निवृत्त लष्करप्रमुख जे. जे. सिंग यांच्या 'माझे सैनिक... माझा लढा... या आत्मचरित्राच्या मराठी आवृत्तीचे प्रकाशन अरुणाचल प्रदेशचे मुख्यमंत्री नाबम तुकी यांच्या हस्ते झाले. जे. जे. सिंग, यांच्या पत्नी अनुपमा सिंग, अरुणाचलचे मंत्री, अधिकारी, प्रकाशक उल्हास लाटकर आदी या वेळी उपस्थित होते. अश्विनी लाटकर आणि एस. आर. डोंगरे यांनी पुस्तकातील निवडक भागांचे वाचन केले.

### ★ 'गुगल रीडर'ला पर्याय

१ जुलैपासून गुगल रीडर ही फीड सुविधा बंद करणार आहे. त्यामुळे फीडली या कंपनीने गुगलसारखी हुबेहुब वाटणारी रीडर सर्व्हिस देण्यासाठी तयारी सुरू केली आहे. त्यामुळे युजर्सना काहीही न बदलता या नव्या पर्यायाचा विचार करता येईल.




## आगामी

# ओल्ड सिटी हॉल

**मूळ लेखक - रॉबर्ट रोटेनबर्ग**

**अनुवाद- अनिल काळे**

....हे काय? मि. केव्हिनच्या हातात आज सिगारेट कशी नाही? आणि चहाचा मग कुठे गेला? केव्हिन आपल्या हातांकडे बघत बोटं चोळत होता. त्याच्या बोटांवर मि. सिंगना कसला तरी लालभडक डाग दिसला.

क्षणभर त्यांना वाटलं, आज बहुतेक आपल्याला तांबडं संत्रं मिळणार. त्यांना ती संत्री फार आवडायची. भारतातही ती मिळायची आणि या दिवसांत ती कॅनडातही मिळतात असं नुकतंच त्यांना कळलं होतं, मि. केव्हिननंही तसलंच एक तांबडं संत्रं कापलेलं दिसतंय.

केव्हिननं आपले दोन्ही हात प्रकाशासमोर धरले. त्याच्या हाताला लागलेलं तांबडं द्रव मि. सिंगना आता स्पष्ट दिसू लागलं, पण ते चांगलं घट्ट वाटत होतं, संत्र्याच्या रसासारखं पातळ दिसत नव्हतं.

मि. सिंगच्या हृदयात धडधडू लागलं.

ते रक्त होतं.

त्यांनी काहीतरी बोलायला तोंड उघडलं, पण तेवढ्यात केव्हिनच त्यांच्यापाशी आला. ''मी मारलं तिला, मि. सिंग.'' त्यानं हळूच म्हटलं.

सध्या फीडली हे गुगलमार्फत ॲक्सेस करता येते आणि सर्व रीडर सबस्क्रिप्शन पाहाता येतात. स्टार रीडरऐवजी ते सेव्ह करता येते. त्यामुळे सोशल नेटवर्किंग साइटवर म्हणजे फेसबुक, ट्विटरवर ते शेअर करता येते. युजर इंटरफेसही अधिक आकर्षक असून, यात लेआउटसाठी अनेक पर्याय आहेत.

युवर सोशल मॅगझिनचे मोबाइल ॲपही चांगल आहे. या ॲपच्या माध्यमातून ट्विटर, फेसबुक आणि गुगल रीडरचे फीड वाचता येतात. या ॲपमुळे वेब पेज वेगाने डाऊनलोड होते आणि सहजपणे पेज पुढे ढकलता येऊ शकते. गुगल रीडरची सवय असलेल्यांना न्यूजब्लर या ॲपचा फॉरमॅट नक्की आवडेल.

### ★ मोबाइलची चाळिशी

मार्टिन कूपर (वय ८५) यांना मोबाइलचे जनक म्हणून ओळखले जाते. १९७३ मध्ये मोबाइलची संकल्पना विकसित करून त्यांनी तिचे प्रारूप सादर केले, तो बाजारपेठेत येण्यासाठी दहा वर्षाचा कालावधी लागला. १९८३ मध्ये आलेल्या Dyna Tax 8000x या हँडसेटची किंमत ३५०० डॉलर्स असल्याने हे उपकरण लोकप्रिय होण्याची शक्यता नव्हती. ''मोबाइलची निर्मिती झाली त्यावेळी त्याचा आकार आणि वजन खूपच होते. पण आता मुठीत मावणारे मोबाइलही बाजारात आले आहेत. ते पाहून डोळे भरून येतात,'' अशी भावपूर्ण प्रतिक्रिया कूपरनी व्यक्त केली. १९६०मध्ये 'एटी ॲंड टी' ने कार टेलिफोन तयार केला तो पाहून आपल्याला मोबाइलची कल्पना सुचली, असेही कूपर म्हणाले.

मोबाईलने तंत्रज्ञान आणि दूरसंचार क्षेत्रात 'न भूतो न भविष्यति' क्रांती घडवून आणली. जिनिव्हास्थित 'इंटरनॅशनल टेलिकम्युनिकेशन युनियन'च्या अहवालानुसार आज ६ अब्जांपेक्षा अधिक मोबाइल आहेत. आजच्या घडीला जगाची लोकसंख्या ७ अब्ज आहे. पूर्वी केवळ हौस आणि चैनीसाठीच मोबाइल मिरविण्याचा ट्रेंड होता. आता मात्र मोबाइल ही चैन नसून गरजेची वस्तू बनली आहे.

### ★ ऑनलाइन शब्दकोश

ऑक्सफर्ड, केंब्रिज, मेरिअम, वेब्स्टर्स यांसारख्या उत्तम ऑनलाइन डिक्शनऱ्यांनी अवघे शब्दभांडारच जणू एका क्लिकवर आणून ठेवलं आहे. केवळ शब्दांचे अर्थ देऊन त्या थांबत नाहीत, तर त्या शब्दांची विविध रूपे, वेगवेगळ्या भाषांतले प्रतिशब्द, त्यांचे वाक्यात उपयोग, संदर्भ असा कित्येक गोष्टी सुलभ करतात.

http://oxforddiction aries.com ही ऑक्सफर्ड डिक्शनरीची वेबसाइट आहे. शब्द सर्च बॉक्समध्ये टाकायचा अवकाश, त्यांच्या अर्थांची जंत्री क्षणार्धात आपल्यासमोर उभी राहते. आपल्याला ब्रिटिश इंग्लिशमधला अर्थ हवाय, की

अमेरिकन इंग्लिश, नुसता अर्थच हवाय की भाषेसंदर्भातील माहितीचे स्रोतही हवे आहेत, याचा विचार करून आपण या साइटवर शब्दाचा अर्थ शोधू शकतो. शाळकरी मुलांना, तसंच इंग्रजी भाषा शिकू इच्छिणाऱ्या कोणालाही उपयोगी पडेल असं विपुल साहित्य या साइटवर उपलब्ध आहे. 'वर्ल्ड ऑफ वर्ड्स' हा शब्दजगताची माहिती देणारा ब्लॉगही तिथं कायम अपडेट केला जातो. उत्तम इंग्रजी लिहिण्यासाठी व्याकरण शिकवणारा स्वतंत्र विभागही साइटवर आहे. शब्दसंग्रह वाढवणाऱ्या स्पर्धा, खेळही त्यावर आहेत.

http://www.merriam.webster.com ही मॅरिअम वेब्स्टर्स डिक्शनरीची साइट आहे. त्यावर ऑक्सफर्डप्रमाणे सगळ्या सुविधा आहेतच. शिवाय दोन सारख्या शब्दांतले फरक सांगणारे किंवा शब्दांविषयी माहिती देणारे तज्ज्ञांचे व्हिडिओही त्यावर आहेत. शब्दांचे उच्चारही या साइटवर ऐकून पाहता येतात. नव्याने भर पडलेले शब्द, एन्सायक्लोपीडिया, मेडिकल डिक्शनरी, थिसॉरस असे वेगवेगळे पर्यायही उपलब्ध आहेत. या साइटचं फ्री ॲप्लिकेशनही आपल्या अँड्रॉइड मोबाइलवर डाऊनलोड करता येतं.

त्याशिवाय htp:// dictionarycambridge.org/, htp:// www.thefreedictionary:com/, htp://www idoceonline.com/ htp://www.collinsdictionary.com/dictionary/english, htp:// www.english-dictionary.us/ या चांगल्या डिक्शनऱ्यांच्या साइट्स इंग्रजीच्या सेल्फ - स्टडीसाठी उत्तम मार्गदर्शक ठरतील.

## ★ दुसऱ्या क्रांतीच्या दारात?


पंतप्रधानांचे वैज्ञानिक सल्लागार सॅम पित्रोदा हे भारतातील पहिल्या टेलिकॉम क्रांतीचे जनक. राजीव गांधी यांच्या राजवटीमध्ये सुरू झालेल्या या क्रांतामुळे आज भारत जगाच्या पाठीवर ताठ उभा आहे.

मुंबईत इंडियन मर्चंट्स चेंबरच्या व्याख्यानमालेत बोलताना सॅम पित्रोदा यांनी ही पहिली क्रांती पुरी होत असून पुढच्या क्रांतीची म्हणजे देशातील २५ हजार पंचायती ब्रॉड ब्रँडने जोडण्याची तयारी सुरू आहे असा दिलासा दिला. या घोडदौडीची माहिती दिल्यानंतर पित्रोदा यांनी भारतीयांनी आपली वृत्ती, दृष्टी आणि कार्यपद्धती बदलायला हवी, असे म्हटले.

"इंटरनेटचा शोध हा भाषेच्या शोधानंतरचा गेल्या १५ हजार वर्षातला सर्वात विलक्षण शोध आहे. मात्र, या शोधाने माहितीची, ज्ञानाची आणि विश्वात्मक नजरेची गंगा धो धो वाहत असूनही तिचा उचित वापर आपण करत नाही." हे आपले दुर्दैव आहे असे पित्रोदा म्हणाले. खरेतर, ई-युगामध्ये शेकडो विद्यापीठे सुरू होऊ

शकतात.

दुसरे, नियोजन आयोगातील सगळी माहिती ‘पब्लिक’ असते. पण नेटवर टाकायची की नाही यावर वर्षानुवर्षे खल चालतो. भारतीयांच्या पठडीबाज, झापडबंद वृत्तीमुळे प्रतिभेचे उन्मेष कोळपून जातात. युगानुयुगे छळणाऱ्या समस्यांची छोटी उत्तरेही आम्हाला सापडत नाहीत. सापडली तर आम्ही ती झेलण्यास कचरतो. भारत चैतन्यशाली व्हायचा असेल तर ‘तिसऱ्या क्रांती’ची गरज आहे असे पित्रोदांना वाटते.




आगामी

# माणसं अशीही

लेखक
**महादेव मोरे**

मानवी व्यवहारांच्या तपशीलवार वास्तववादी चित्रणामुळे महादेव मोरे यांचा व्यक्तिचित्रणांचा हा संग्रह मराठी साहित्यात महत्त्वाचा ठरतो. बेळगाव-निपाणी या महाराष्ट्राच्या सीमाभागातली वैशिष्ट्यपूर्ण बोलीभाषा, हेही या संग्रहाचे वैशिष्ट्य आहे. या निमित्ताने मराठी वाचकांना या बोलीतल्या काही शब्दांचा परिचय होईल.

यात भेटणारी माणसं ही विविध जाती-जमातींची आहेत. ती गरीब, भोळीभाबडी आहेत, तशीच इरसालही आहेत; परिस्थितीने गांजलेली, पिचलेली, निराश झालेली आहेत, तशीच स्वप्नं पाहणारी, आशेच्या एके किरणामागे धावणारी आहेत. लेखकाच्या जीवनातले कडू-गोड प्रसंगही आहेत.

मराठी साहित्याच्या मुख्य परिघाबाहेरची ही माणसं कधी हसवतात; रडवतात, अचंबित करतात, मनात करुणभाव उत्पन्न करतात; तर कधी जीवनाबद्दलची अनोखी अंतर्दृष्टी देऊन जातात.

## ★ शशी थरूर यांचा यशमंत्र : इंग्रजी शिका आणि जगात टिका

''सध्याच्या जागतिकीकरणाच्या युगात टिकायचे असेल, तर इंग्रजी शिकलेच पाहिजे. इंग्रजी शिकणे हाच या प्रगत जगातील यशाचा मंत्र आहे.'' असा सल्ला केंद्रीय मनुष्यबळ विकास राज्यमंत्री शशी थरूर यांनी दिला. शालेय इंग्रजी शिकविण्याच्या पद्धतीशी संबंधित दोन दिवसांच्या कार्यशाळेत ते बोलत होते.

ते म्हणाले, ''आपल्या मुलांना इंग्रजी शिकण्याच्या संधीपासून वंचित ठेवणे म्हणजे आपणच त्यांच्या भविष्यावर कुऱ्हाड चालविल्यासारखे आहे. केरळच्या जनतेसाठी मल्याळम हीच प्रथम भाषा असली पाहिजे. पण दुसरी भाषा इंग्रजीच असली पाहिजे आणि इंग्रजी हीच यशाची गुरुकिल्ली आहे.''

## ★ माइलस्टोअर्स डॉट कॉम

''नावीन्याचा ध्यास घेऊन काम केले, तरच भविष्यात प्रगतिपथावर राहता येईल. त्यादृष्टीने विविध प्रकारच्या लोकोपयोगी सेवा पुरविणारी संकेतस्थळे महत्त्वाची ठरणार आहेत.'' असे प्रतिपादन ज्येष्ठ संगणकतज्ज्ञ डॉ. विजय भटकर यांनी 'माइलस्टोअर्स डॉट कॉम' या पुण्यातील पहिल्या ऑनलाइन हायपर मार्केटच्या उद्‌घाटन प्रसंगी केले. संकेतस्थळाचे उद्‌घाटन खासदार सुप्रिया सुळे यांच्या हस्ते झाले. महापौर वैशाली बनकर अध्यक्षस्थानी होत्या. 'एमकेसीएल'चे कार्यकारी संचालक विवेक सावंत, प्रमोद तलगेरी उपस्थित होते.

सुळे म्हणाल्या, 'महिलांच्या बचत गटांमार्फत असंख्य उत्पादने तयार केली जातात. मात्र ती खपविणे जड जाते. अशा ऑनलाइन हायपर मार्केटमुळे त्यांचा विपणनाचा प्रश्न सुटण्यास मदत होणार आहे. या पद्धतीने महिलांची उत्पादने अनेक ठिकाणी पोचू शकतील. जग बदलते आहे. हे ओळखून दुकानदारांनीही अशा पद्धतीचा वापर केला पाहिजे.''

माइलस्टोअर्सचे कार्यकारी अधिकारी झहीर इनामदार यांनी सांगितले. ''साठहून अधिक विक्रेत्यांच्या चार हजाराहून अधिक वस्तू पुणेकरांना या संकेतस्थळावर घरबसल्या होलसेल दरात खरेदी करता येतील.''

## ★ पहिली, दुसरीच्या अभ्यासक्रमात बदल

प्राथमिक शाळेचा 'श्रीगणेशा' आनंदाने व्हावा, यासाठी पहिली व दुसरीच्या अभ्यासक्रमात महत्त्वपूर्ण बदल करण्यात आला आहे. तसेच 'भाग एक व दोन' ही पद्धत बंद करून पाठ्यपुस्तकांची संख्याही निम्म्याने कमी करण्यात आली आहे.

सध्या पहिली व दुसरीला बालभारती, गणित, माय इंग्लिश बुक या विषयांचे भाग एक आणि भाग दोन, अशी सहा पुस्तके आणि प्रत्येक विषयात एक– एक

अशी सहा वर्कबुक आहेत. जूनपासून बालभारती, गणित, माय इंग्लिश बुक या तिन्ही विषयांचे एकच पाठ्यपुस्तक आणि सर्व विषय मिळून एकच वर्कबुक असणार आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांच्या पाठीवरचा भार हलका होणार आहे. प्राथमिक शिक्षण अभ्यासक्रम २०१२च्या मसुद्यानुसार हा बदल करण्यात आला आहे.

सजावट आणि सुटसुटीत मजकुरावर भर देण्यात आला आहे. 'परिसर अभ्यास' या विषयासाठी वेगळे पुस्तक असणार नाही. या विषयाचा पाठ्यपुस्तकातच समावेश करण्यात आला आहे. 'वर्कबुक' मध्ये एकाच विषयावर वेगवेगळ्या पद्धतींनी प्रश्न विचारण्यात येणार आहेत. त्यामुळे एकाच वेळी विद्यार्थ्यांचा गणित, भाषा या विषयांचा अभ्यास होणार आहे.

## ★ प्रायोगिक नाटकांसाठी रंगमंच उभारणी

''टीव्ही मालिका, महागाई आदी कारणांनी प्रेक्षक नाटकांपासून दुरावतो आहे. अशा परिस्थितीत नाटकांसाठी समीप (इंटिमेंट) रंगमंच महत्त्वाचे आहेत. समीप रंगमंचांचा राज्यभर प्रसार होणे आवश्यक वाटते.'' असे मत अखिल भारतीय नाट्यपरिषदेचे अध्यक्ष मोहन जोशी यांनी व्यक्त केले.

राष्ट्रसेवा दलाने सिंहगड रस्त्यावरील साने गुरुजी शाळेच्या प्रांगणात प्रायोगिक नाटकांना डोळ्यासमोर ठेवून उभारलेला बॅ. नाथ पै समीप रंगमंच जोशी यांच्या हस्ते घंटा वाजवून खुला करण्यात आला. डॉ. सतीश देसाई, सुरेश देशमुख, अभिजित वैद्य, अरविंद कपोले, राजा वसक, सिंधू काटे, धीरेश जोशी आदी उपस्थित होते. प्रदीप गिरी यांनी या नाट्यगृहाची रचना केली आहे.

जोशी म्हणाले, ''छोट्या नाट्यगृहांमुळे प्रेक्षक नाटकांना येतील आणि नाट्यकर्मींचांही उत्साह वाढेल.'' सामाजिक परिवर्तनामध्य कला-साहित्याची महत्वाची भूमिका असते. हॅवेल हा नाटककार झेकचा राष्ट्रपती होता. आपल्या देशात अशी घटना घडेल तेव्हा राजकारण परिपक्व होईल. हे व्यासपीठ सामाजिक परिवर्तनाचे केंद्र ठरावे,'' असे डॉ. वैद्य यांनी सांगितले.


## ★ सर्वात हलक्या वस्तूची निर्मिती

चिनी संशोधकांनी जगातील आतापर्यंतच्या वजनाने सर्वात हलक्या वस्तूचा शोध लावला आहे. 'कार्बन एरोजेल' असे या वस्तूचे नाव असून, तिची घनता हवेच्या एक षष्ठांश आहे.

चिएचांग विद्यापिठातील संशोधकांनी केवळ ०.१६ मिलीग्रॅम प्रति घनसेंटिमीटर आकाराच्या वस्तूचा शोध लावून या पूर्वी कमीत कमी घनता असलेल्या ग्राफाइट एरोजेलचा वस्तूचा विक्रम मोडीत काढला आहे.

ग्राफाइट एरोजेलची निर्मिती जर्मन संशोधकांनी गेल्या वर्षी केली होती. त्याची घनता ०.१८ मिलीग्रॅम प्रति घनसेंटिमीटर आहे. एरोजेल ही वस्तू अर्धवट घन अवस्थेतील जेल स्वरूपात असून, ती पूर्णपणे वाळलेली आहे. एरोजेलची निर्मिती होताना ते घन स्वरूपात असते. मात्र, त्यामध्ये असणाऱ्या असंख्य छिद्रांमध्ये हवा भरलेली असते. त्यामुळेच त्याला कमीत कमी घनता प्राप्त होते. प्रोफेसर गाओ चाओ यांच्या नेतृत्वाखाली हे संशोधन पूर्णत्वाला नेण्यात आले. एरोजेल प्रामुख्याने कार्बन नॅनोट्यूब आणि ग्राफीन यांचे गोठवून-वाळवून तयार केलेले मिश्रण आहे.

'कार्बन एरोजेलची रचना कार्बन स्पंजसारखी असून, एका भांड्यात ते टाकून पातळ गवताच्या थरावर ते ओतले असता, गवतही वाकत नसल्याचे दिसून आले आहे,' अशी माहिती गाओ चाओ यांनी दिली.


**४ थी आवृत्ती**

मी आणि माझा बाप

लेखक

**व्यंकटेश माडगूळकर**

**किंमत : ८०/-रु.**

**पोस्टेज : २५/-रु.**

'कार्लो बुलोसान' नावाच्या एका फिलिपिनो लेखकाचा परिचय मराठी वाचकांना करून द्यावा, म्हणून 'लाफ्टर वुइथ माय फादर' हे रूपांतर केले आहे.

'...बापलेकाचे इतके मोकळे नाते आपल्याकडे मंजूर नाही.' तरीपण ह्या पुस्तकातील बेरकीपणा, खट्याळपणा, गावरान विनोद आपल्यासारखाच आहे. वातावरणही फारसे परके नाही, काही चेहरेही वाचकांना ओळखीचे वाटतील.

सध्या अनेक उद्योगामध्ये ऑइल शोषून घेणारे पदार्थ त्यांच्या वजनाच्या दहा टक्के अधिक शोषून घेतात. मात्र, कार्बन एरोजेल आपल्या वजनाच्या ९०० पट अधिक ऑइल शोषून घेते. त्यामुळे प्रदूषण नियंत्रणात महत्त्वाची भूमिका बजावेल, असा विश्वास संशोधकांना वाटत आहे.

### ★ 'साहित्य दरबारातील दशरत्ने'

प्राचार्य श्याम भुर्के लिखित 'साहित्य दरबारातील दशरत्ने' या पुस्तकाचे प्रकाशन नुकतेच डॉ. संजय उपाध्ये यांच्या हस्ते झाले. प्रा. द. मा. मिरासदार कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी होते. या पुस्तकात स्वातंत्र्यवीर सावरकर, आचार्य अत्रे, वि. स. खांडेकर, पु. ल. देशपांडे, दुर्गाबाई भागवत, गो. नी. दांडेकर आदी दहा साहित्यिकांचे साहित्य व जीवन उलगडण्यात आले आहे. स्नेहल प्रकाशनचे रवींद्र घाटपांडे यांनी प्रास्ताविक केले. सुप्रिया अत्रे यांनी सूत्रसंचालन केले.

### ★ परदेशी विद्यार्थ्यांना भारतात उच्च शिक्षणासाठी पूर्वपरीक्षा?

जीआरई, टोफेलसारख्या पात्रता परीक्षांच्या धर्तीवर आता परदेशी विद्यार्थ्यांनाही भारतात उच्चशिक्षण प्रवेश पात्रता परीक्षा सुरू करण्याचा विचार पुढे आला आहे. भारतीय उच्चशिक्षणाच्या दर्जाविषयीचे प्रश्न सोडवितानाच, आंतरराष्ट्रीय समुदायामध्ये त्याविषयीची जाणीव व्हावी हा उद्देश यामागे आहे.

### ★ दर्जेदार पाठ्यपुस्तकांसाठी नॅशनल टेक्स्टबुक कौन्सिल?

शासकीय यंत्रणेबाहेरच्या शाळांची पाठ्यपुस्तके आणि त्याला पर्याय म्हणून उपलब्ध असणारी पुस्तके यावर नियंत्रण ठेवण्यासाठी 'नॅशनल टेक्स्टबुक कौन्सिल' ची निर्मिती करण्यात येणार आहे.

काही महिन्यांपूर्वी 'एनसीईआरटी'च्या अकरावीच्या पुस्तकामधील डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या चित्रावरून वाद निर्माण झाला होता. 'आयसीएसई' बोर्डाच्या आठवीच्या इतिहासाच्या पुस्तकात पंडिता रमाबाई आणि रमाबाई महादेव रानडे यांच्या छायाचित्रांमध्ये झालेला घोळही समोर आला. असे प्रसंग टाळत देशपातळीवरील शैक्षणिक अभ्यासक्रमांमध्ये सुधारणा करण्यासाठी 'नॅशनल करिक्युलम फ्रेमवर्क' (एनसीएफ) माध्यमातून प्रयत्न केले जात आहेत.

'सेंट्रल ॲडव्हायजरी बॉर्ड ऑफ एज्युकेशन'च्या (कॅबे) नुकत्याच झालेल्या ६१ व्या बैठकीत त्याविषयी चर्चा करण्यात आल्याची माहिती 'कॅब'चे सदस्य डॉ. पी.ए. इनामदार यांनी दिली.

◈ ◈ ◈




## ✤ डॉ. नारायण मूर्ती यांना चिरमुले पुरस्कार

''उद्योगक्षेत्राने व्यावसायिक उद्दिष्ट साध्य करण्याबरोबरच व्यापक विकासाचाही दृष्टिकोण ठेवला पाहिजे. सामाजिक उत्तरदायित्वाचे तत्त्व पाळताना सर्वसमावेशक विकासासाठी संघटितपणे लढा द्यावा. सरकार, उद्योग आणि सामान्य जनतेनेही ही जबाबदारी स्वीकारावी,'' असे आवाहन 'इन्फोसिस'चे संस्थापक डॉ. एन. आर. नारायण मूर्ती यांनी केले.

'अण्णासाहेब चिरमुले चॅरिटेबल ट्रस्ट, सातारा' या संस्थेतर्फे डॉ. नारायण मूर्ती यांना माहिती तंत्रज्ञान क्षेत्रातील योगदानाबद्दल ज्येष्ठ शास्त्रज्ञ डॉ. विजय भटकर यांच्या हस्ते पुरस्कार प्रदान करण्यात आला. एक लाख रुपये आणि सन्मानचिन्ह असे पुरस्काराचे स्वरूप आहे. याप्रसंगी सुधा मूर्ती, पत्रकार कुमार केतकर, संस्थेचे विश्वस्त अरुण गोडबोले, पी. एन. जोशी, श्रीकांत जोशी उपस्थित होते. या वेळी डॉ. नारायण मूर्ती यांनी 'उद्योगांचे सामाजिक उत्तरदायित्व' या विषयावर विचार मांडले. डॉ. मूर्ती म्हणाले. ''देशातील ४०कोटी जनतेचे दररोज उत्पन्न ५० रुपयांपेक्षा कमी आहे. प्राथमिक आरोग्यसेवा समाधानकारक नाही. ग्रामीण भागात असंख्य शाळा एकशिक्षकी असून मानवी विकास निर्देशांकात अन्य देशांच्या तुलनेत भारत खूप मागे आहे. ही परिस्थिती बदलण्याची जबाबदारी सरकारबरोबर उद्योग (कॉर्पोरेट) क्षेत्राचीही आहे. अमेरिकेत उत्पन्नाच्या ९.१ टक्के रक्कम दान केली जाते. भारतात मात्र हे प्रमाण ३.१ टक्केच आहे. हे चित्र बदलले पाहिजे.''

डॉ. भटकर म्हणाले, ''एकविसावे शतक भारताचे असेल, असे भाकीत अमेरिकेतील एका संस्थेने केले आहे. २०३० मध्ये चीन अमेरिकेवर तर २०४० मध्ये भारत चीनवर मात करेल. जागतिक दर्जाचे नेते, विद्यापीठे, संशोधन, तंत्रज्ञान निर्माण झाले, तर हे घडू शकेल.''

'सूर्य पाहिलेला माणूस' अशा शब्दांत केतकर यांनी डॉ. मूर्ती यांचा गौरव केला. मूर्ती दांपत्य म्हणजे विनयशीलता आणि मानवतावादाचा आदर्श.

सुधा मूर्ती यांनी डॉ. नारायण मूर्ती यांना पुरस्कार दिल्याबद्दल मराठीतून आभार मानले. त्या म्हणाल्या, ''माझे पैलवान मराठी आहे, कारण मी कोल्हापुरात शिकले. पुणेरी मराठी बोलण्याची भीती वाटते. पुणे विचारात आघाडीवर राहिले असून, पुण्याने महिलांना सन्मान दिला आहे. पण आज ते खूप बदललेले आहे.

## ❖ 'दर्पण जीवन गौरव' पुरस्कार

महाराष्ट्र पत्रकार कल्याण निधी संस्थेतर्फे पत्रकारितेत उल्लेखनीय कामगिरी केल्याबद्दल आठ मराठी पत्रकारांना 'दर्पण जीवन गौरव' पुरस्कार ६ एप्रिल रोजी केंद्रीय कृषीमंत्री शरद पवार यांच्या हस्ते देण्यात आले.

पंढरीनाथ जाधव, मधुकर भावे (मुंबई), राजाभाऊ लिमये (रत्नागिरी), सुधाकर डोईफोडे (नांदेड), प्रतापसिंह जाधव (कोल्हापूर), चंदुलाल शहा (नाशिक), उत्तम कांबळे, सुधीर गाडगीळ (पुणे) या पत्रकारांचा आणि संपादकांचा गौरव करण्यात आला.

तसेच, पत्रकार कल्याण निधी आणि एलिमेन्ट्स ऑफ नेचर कॉन्झरवेशन असोसिएशन (एन्का) यांच्यातर्फे हाती घेण्यात आलेल्या 'पश्चिम घाटमाथा– एक सुवर्णठेवा' या प्रकल्पाचा शुभारंभ या वेळी करण्यात आला. या कार्यक्रमासाठी वनमंत्री डॉ. पतंगराव कदम, उद्योगमंत्री नारायण राणे, जलसंपदामंत्री सुनील तटकरे आदी मान्यवर उपस्थित होते.

## ❖ अभिनेते प्राण यांना 'फाळके पुरस्कार'

शैलीदार अभिनयाने प्रेक्षकांच्या मनात स्थान मिळविणारे ज्येष्ठ अभिनेते प्राण (वय ९३) यांना यंदाचा 'दादासाहेब फाळके पुरस्कार' जाहीर करण्यात आला आहे. चित्रपट क्षेत्रातील हा सर्वोच्च पुरस्कार आहे.

प्राण सिकंद असे त्यांचे मूळ नाव पण प्राण या नावाने प्रेक्षकांना परिचित आहेत. भारतीय चित्रपटसृष्टीचे जनक असलेल्या दादासाहेब फाळके यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ हा पुरस्कार तीन मे रोजी त्यांना प्रदान केला. त्याच दिवशी भारतीय चित्रपटाला शंभर वर्षे होत आहेत.

आपल्या कसदार अभिनयाद्वारे सहा दशके गाजविणाऱ्या प्राण यांनी १९९८ पासून निवृत्ती स्वीकारली आहे. त्यांनी चारशेपेक्षा जास्त चित्रपटांत काम केले आहे. १९४० मध्ये आलेल्या 'यमला जट' या चित्रपटाद्वारे प्राण चित्रपटसृष्टीत आले. सुरुवातीला ते खलनायक रंगवीत असत.

'मिलन', 'मधुमती', आणि 'काश्मीर की कली' या चित्रपटांतील त्यांच्या व्यक्तिरेखा गाजल्या. त्या काळात लोक मुलांचे नाव 'प्राण' ठेवत नसत एवढी त्यांच्या खलनायकीची जादू होती. नंतर त्यांनी चरित्रभूमिका साकारल्या. दिलदार मित्र, प्रेमळ पिता आणि मिस्कील, करारी आजोबा अशा भूमिकांतही ते शोभून दिसले. अमिताभ बच्चन यांच्या कारकीर्दीला कलाटणी देणाऱ्या 'जंजीर' या चित्रपटात प्राण यांनी साकारलेला 'शेरखान' 'उपकार' आणि 'परिचय' या चित्रपटांतील त्यांच्या भूमिकाही लक्षात राहणाऱ्या ठरल्या.

''प्राण यांना पुरस्कार देण्यासाठी एवढा विलंब का? त्यांना पूर्वीच तो मिळावयास हवा होता. आम्ही त्यांना खलनायकाच्या रूपात पाहिले. पण, ते हीरो आहेत,'' असे अभिनेते ऋषी कपूर यांनी म्हटले.

## ✤ डॉ. विकास आमटे यांना 'सीओईपी गौरव' प्रदान

''आनंदवन पाहून तुम्हाला समाधान वाटत असेल, तर ती चुकीची बाब आहे. 'आनंदवन' वाढविणे, फुलविणे हे आमटे कुटुंबियांचे स्वप्न नाही आणि कधीही नव्हते. ते बंद करण्याच्या दिशेनेच आमची वाटचाल सुरू आहे,'' असे प्रतिपादन सामाजिक कार्यकर्ते डॉ. विकास आमटे यांनी केले.

शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालयातील शिक्षकेतर कर्मचारी संघटना आणि 'इग्नायटेड माइंडस्' यांच्यातर्फे आयोजित समारंभात आमटे यांना महाविद्यालयाचे संचालक डॉ. अनिल सहस्रबुद्धे यांच्या हस्ते 'सीओईपी गौरव' पुरस्कार प्रदान करण्यात आला. यावेळी संघटनेचे अध्यक्ष व्ही. माकर, डॉ. महेश शिंदीकर, दिलीप भांबरे उपस्थित होते.

## ✤ नामदेव ढसाळ यांना पुरस्कार

''दलित चळवळ आज मुख्य उद्दिष्टापासून बहकली आहे. त्यात नाना अंतर्विरोध निर्माण झाले आहेत. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे राजकीय शहाणपण या चळवळीने आज घेतलेले नाही.'' असे मत ज्येष्ठ कवी नामदेव ढसाळ यांनी व्यक्त केले.

पुणे महापालिकेतर्फे ढसाळ यांना महापौर वैशाली बनकर यांच्या हस्ते पहिला 'भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुरस्कार' प्रदान करण्यात आला. रामदास आठवले, निखिल वागळे, डॉ. शां. ब. मुजुमदार, लेखक अर्जुन डांगळे या वेळी उपस्थित होते.

ढसाळ म्हणाले, ''या पुरस्काराने माझ्या डोक्यावरील बोजा वाढला आहे. भौतिक अर्थाने जरी ही माझ्या आयुष्याची संध्याकाळ असली तरी मी घरी बसणारा प्राणी नव्हे! जोपर्यंत स्मृतिभ्रंश होत नाही तोपर्यंत मी मैदानातच राहणार आहे!

स्वातंत्र्याला ६५ वर्षे उलटली तरी आजही समाजात आठशे प्रमुख जाती आणि सहा हजार उपजाती आहेत. आपल्या संमिश्र समाजाला एकसंध करण्याची जबाबदारी सत्ताधाऱ्यांनी कायम टाळलेली आहे. बाबासाहेबांनी आपल्याला जिथपर्यंत आणून पोहोचविले होते तिथेच आपण आजही आहोत. आज राजकीय पक्षांना समाज अभिसरणाच्या उकळ्या फुटत आहेत. दलित चळवळ मुख्य उद्दिष्टापासून बहकली आहे. तिच्यात अंतर्विरोध निर्माण झालेले आहेत. केवळ दलितांनीच एकत्र येऊन भागणार नाही. सवर्णातील सद्विवेकी माणूसही त्यांत जोडला गेला पाहिजे. शोषित वर्गातील तरुणांनी कोणत्याही पक्षात जावे. मात्र आपल्या समाजाच्या उद्धारासाठी त्यांना पक्षप्रमुखांना वेठीस धरता आले पाहिजे.'' पुरस्काराच्या रकमेतील पन्नास हजार रुपये ढसाळ यांनी दुष्काळग्रस्तांच्या मदतीसाठी दिले.

वागळे म्हणाले, ''चाळीस वर्षांपूर्वी महाराष्ट्राने ढसाळ यांची उपेक्षा केली होती. मात्र ढसाळ यांनी मराठीला नवी शब्दकळा दिली आहे. त्यांना मी केवळ दलित कवी समजत नाही. मराठी कविता जगाच्या व्यासपीठावर पोहोचविणारा हा महाकवी आहे. १९७० पूर्वीचा आक्रोश आणि वेदना आजही त्यांच्या कवितेत दिसते.''

आठवले म्हणाले, ''ढसाळ यांच्या कवितेतील शब्द कोणत्याही शब्दकोशात सापडणार नाहीत. आमचा शब्दकोश गावाबाहेरचा आहे! सत्ता कुणाचीही असली तरी माणसाला माणूस म्हणून जगता येणे आवश्यक आहे. अजूनही समाजातील जातीवाद गेलेला नाही. जातीवाद नाहीसा करण्यासाठी आंतरजातीय विवाहांना पाठिंबा देणे आवश्यक आहे.''

## ✤ 'अक्षर'ला रत्नाकर पुरस्कार

महाराष्ट्र साहित्य परिषदेतर्फे घेण्यात आलेल्या दिवाळी अंक स्पर्धेचे पारितोषिक वितरण डॉ. सदानंद बोरसे यांच्या हस्ते झाले. डॉ. माधवी वैद्य, प्रा. मिलिंद जोशी, परीक्षक डॉ. मेधा सिधये आदी उपस्थित होते. या स्पर्धेत १२८ दिवाळी अंक सहभागी झाले होते. स्पर्धेतील प्रथम क्रमांकाचे अ. स. गोखले स्मृती रत्नाकर पारितोषिक 'अक्षर' दिवाळी अंकाने पटकावले. दिवाळी अंक स्पर्धेतील विजेते :

रत्नाकर पारितोषिक - अक्षर

चंद्रकांत शेवाळे पुरस्कृत मोरमकर पारितोषिक - आपले छंद


मासिक मनोरंजनकार का. र. मित्र पारितोषिक - कालनिर्णय

शं. वा. किर्लोस्कर पारितोषिक - वनराई

केळकर उत्कृष्ट बालसाहित्य विशेषांक - ऋग्वेद

उत्कृष्ट कथा दि. अ. सोनटक्के पारितोषिक - राजकुमार तांगडे यांची 'कातडी' कथा (अक्षर )

**आगामी**




# एक दिवा विझताना...

लेखक : **रत्नाकर मतकरी**

या संग्रहातल्या ‘एक दिवा विझताना’सारख्या कथा न आकळणारी गूढ रहस्ये या सूत्राभोवती फिरतात.
‘चौथी खिडकी’ ही एक अफलातून विज्ञानकथा ‘काळ’ या संकल्पनेभोवती रचली आहे, तर ‘पोरखेळ’सारख्या कथेमधून मानवाचे नियतीच्या हातातले बाहुले असणे हे सूत्र बाळाच्या कळसूत्री बाहुल्यांशी खेळण्याच्या प्रतीकातून सूचित केले आहे.

कलावंत आणि कला यांच्यातला तिढा मांडणारी ‘सुचेता चक्रपाणी आणि तिचा कोकिळकंठ’ ही एक उत्कृष्ट फँटसी; ती जादुई वास्तववादाची आठवण करून देते.

संधिप्रकाशातल्या धूसर वातावरणात एखाद्या अरण्यात शिरावे, तसे मतकरी यांच्या कथा वाचताना वाटते. वास्तव आणि कल्पना यांच्या सीमारेषेवर प्रवास सुरू होतो. वाचकांना या अरण्यातल्या कळलेल्या, न कळलेल्या वाटांकडे नेण्यासाठी मतकरी कथनाचे वेगवेगळे घाट, निवेदनशैली यांचा वापर करतात.
हा प्रवास विलक्षण आकर्षक असतोच; पण तो आत आत खोलातही नेतो.

उत्कृष्ट ललित लेख अनंत काणेकर पारितोषिक (विशाखा अंक) - हर्षदा सुनील पंडित यांच्या 'मी सखा मेघदूत' लेखाला मिळाले.

### ❖ डॉ. आ. ह. साळुंखे यांना महापालिकेतर्फे मानपत्र

'दहशतवाद आणि विघातक शक्तीला तोंड देण्यासाठी समाजात आंतरिक ऐक्य निर्माण करण्याची गरज आहे.'' असे मत ज्येष्ठ साहित्यिक डॉ. आ. ह. साळुंखे यांनी व्यक्त केले.

पुणे महापालिकेतर्फे मानपत्र देऊन डॉ. साळुंखे यांचा सत्कार करण्यात आला. वैशाली बनकर, भाई वैद्य, पुरुषोत्तम खेडेकर, सहआयुक्त ज्ञानेश्वर मोळक उपस्थित होते.

डॉ. साळुंखे म्हणाले, ''आंतरिक ऐक्य निर्माण करताना वर्चस्ववादाची भूमिका सोडून द्यायला हवी. काही लोकांनी समाजातील एका विशिष्ट वर्गाला सदैव गुलामीत ठेवण्यासाठी प्रयत्न केले आहेत. त्यामुळे समाज जात, धर्म यामध्ये विभागला आहे. ही विभागणी नष्ट होऊन समाज एकसंध होण्याची गरज आहे.''

वैद्य म्हणाले, ''संस्कृत वाङ्मयामुळे बहुजन समाजाची उपेक्षा होत राहिली. त्याचा शोध घेण्याचे काम साळुंखे यांनी केले. त्यांच्या साहित्याचे अन्य भाषांमध्ये भाषांतर व्हायला हवे.''

### ❖ राष्ट्रीय चित्रपट पुरस्कारांत मराठीचा झेंडा

सर्वोत्कृष्ट चित्रपटाचा मान तिमांशू धुलियादिग्दर्शित 'पानसिंग तोमर' या परिस्थितीमुळे धावपटू डाकू बनलेल्याचा खेळाडूची सत्यकथा सांगणाऱ्या चित्रपटाला मिळाला असून, याच चित्रपटातील भूमिकेसाठी सर्वोत्कृष्ट अभिनेत्याचा पुरस्कार इरफान खान याला विक्रम गोखले यांच्याबरोबर विभागून मिळाला. देशभरात प्रदर्शित १४ भाषांतील ३८ चित्रपटांमधून या चित्रपटांची निवड करण्यात आली.

छोट्याशा गावातील स्मशानात प्रेते जाळण्याचे काम करून उदरनिर्वाह करणाऱ्या कुटुंबाची ससेहोलपट परिणामकारकपणे मांडणाऱ्या या मराठी चित्रपटाने बाजी मारली आहे. संजय लोटन पाटील यांना दिग्दर्शकाचा पुरस्कार मिळाला. या कामाची संसाराला बसलेली धग यशस्वीपणे थोपविणाऱ्या पत्नीची भूमिका करणाऱ्या उषा जाधव यांना सर्वोत्कृष्ट अभिनेत्रीचा पुरस्कार मिळाला आहे.

'विकी डोनर' व मल्याळम चित्रपट 'उस्ताद हॉटेल' यांनी सर्वोत्कृष्ट मनोरंजक चित्रपटांचा पुरस्कार मिळवला असून, विकी डोनर मधील भूमिकेसाठी अन्नू कपूर यांना सर्वोत्कृष्ट सहायक अभिनेता व डॉली अहलुवालियाला सर्वोत्कृष्ट सहायक अभिनेत्रीचा पुरस्कार मिळाला. डॉलीला हा पुरस्कार कल्पना या मल्याळम अभिनेत्रीबरोबर


विभागून मिळाला आहे.

पदार्पणातील सर्वोत्कृष्ट चित्रपटाचा पुरस्कार हिंदी चित्रपट 'चितगाव' व मल्याळम चित्रपट १०१ चौडीयांगल यांना मिळाला आहे. सर्वोत्कृष्ट बालकलाकाराचा पुरस्कार वीरेंद्र प्रताप (देश इंडिया सर्कस) व मिनन (१०१ चोडीयांगल) यांना विभागून देण्यात आला. प्रादेशिक भाषेतील सर्वोत्कृष्ट चित्रपटासाठीचा पुरस्कार मराठीमध्ये रत्नाकर मतकरी यांनी लिहिलेल्या 'इनव्हेस्टमेंट' या चित्रपटाला मिळाला.

- नृत्यदिग्दर्शन : पंडित बिरजू महाराज (विश्वरूपम)
- गीत : प्रसून जोशी (बोलो ना, चित्रपट चितगाव)
- पटकथा : सुजय घोष (कहाणी)
- गायक (पुरुष) : शंकर महादेवन (चितगाव)
- आधारित पटकथा : भावेश मंडालिया व उमेश शुक्ला (ओ माय गॉड)
- सामाजिक चित्रपट : स्पिरीट (मल्याळम)
- पर्यावरण चित्रपट : ब्लॅक फॉरेस्ट (मल्याळम)
- बालचित्रपट : देख इंडिया सर्कस
- विशेष ज्युरी पुरस्कार : नवाजउद्दीन सिद्दीकी (अभिनय) ऋतूपर्ण घोष (दिग्दर्शन)

### ✤ 'एनईएस इनोव्हेशन २०१३' पुरस्कारांचे वितरण

''आधुनिक व्यवस्थेत शिक्षण म्हणजेच भविष्य हे यशाचे नवीन समीकरण तयार झाले आहे. शिक्षण नसल्यास कोणतीही व्यक्ती, समाज किंवा राष्ट्र यांना भविष्य उज्ज्वल रहात नाही. त्यामुळे वेगान विकसित होणाऱ्या भारताचा शिक्षण


१४ वी आवृत्ती

पावनखिंड

लेखक : **रणजित देसाई**

**किंमत : १२०/-रु. । पोस्टेज : २५/-रु.**

हाच पाया आहे.'' असे मत ज्येष्ठ शास्त्रज्ञ डॉ. रघुनाथ माशेलकर यांनी व्यक्त केले.

तंत्रज्ञानाचा प्रभावी वापर करून सामाजिक समस्यांवर उपाय सुचविणाऱ्यांना 'नटराजन एज्युकेशन सोसायटी'तर्फे (एनईएस) डॉ. माशेलकर यांच्या हस्ते 'एनईएस इनोव्हेशन २०१३' या पुरस्काराने गौरविण्यात आले. डॉ. अनिल सहस्रबुद्धे, डॉ. अरुण निगवेकर, पर्सिस्टंट सिस्टिमचे डॉ. आनंद देशपांडे या वेळी उपस्थित होते.

डॉ. माशेलकर म्हणाले, ''आधुनिक काळात विज्ञान, तंत्रज्ञान आणि नावीन्य अशी त्रिस्तरीय समाजरचना निर्माण होत आहे. नावीन्यामध्ये जगात भारताचा ६४ वा क्रमांक लागत असला तरीही ही नवीनता समाजातील सर्व स्तरापर्यंत पोचत आहे. मोबाईल फोन हे याचे सर्वोत्कृष्ट उदाहरण आहे. गरीब आणि अतिश्रीमंत व्यक्तीही आता मोबाईलवरून संवाद साधत आहेत. इतर देशांमध्ये तंत्रज्ञानामुळे समाज विभागला जात आहे. पण भारतामध्ये हे तंत्रज्ञान सामान्य लोकांना डोळ्यासमोर ठेवून विकसित केले जाते.''

'उच्च शिक्षणाची गुणवत्ता वाढ' या विषयावरील परिसंवादामध्ये बोलताना डॉ. निगवेकर म्हणाले, ''सध्याच्या शिक्षण व्यवस्थेमध्ये आमूलाग्र बदल केला पाहिजे. शिकविण्याची पद्धत आणि शिक्षकांची मानसिकता बदलण्याची गरज आहे. विद्यार्थ्यांचे मूल्यांकन करण्याची पद्धत वर्षानुवर्षापासून तीच आहे.''

डॉ. देशपांडे म्हणाले, ''नावीन्यता फक्त तंत्रज्ञानामध्येच येते असे नाही, तर ती समाजशास्त्रातही आवश्यक असते. त्यासाठी शैक्षणिक आणि उद्योग क्षेत्रांनी सातत्याने अद्ययावत होत राहणे आवश्यक आहे.''

## ✤ यशवंतराव चव्हाण साहित्य पुरस्कार

प्रकाश ढेरे चॅरिटेबल ट्रस्ट व गंगा लॉज मित्रमंडळातर्फे कविसंमेलन व 'यशवंतराव चव्हाण साहित्य' पुरस्कार प्रदान सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते. या वेळी महापौर वैशाली बनकर, वात्रटिकाकार रामदास फुटाणे, कवी फ. मुं. शिंदे, अशोक नायगावकर, किशोर कदम, प्रकाश घोडके आदी उपस्थित होते.

महापौर बनकर यांच्या हस्ते लेखक व कवी मधू जामकर यांना 'जीवनगौरव पुरस्कार' देऊन गौरविण्यात आले. तसेच लहू कानडे, भारत दौंडकर व अजय कांडर यांनाही पुरस्कार प्रदान करण्यात आले.

महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यातून आलेल्या कवींच्या कवितांमधून दुष्काळाचे चित्र उमटत होते. अजय कांडर यांनी बाया पाण्याशी बोलताना... तर प्रशांत मोरे यांच्या पाण्याची प्रार्थना... या कवितेमधील दे रे दे आभाळ दे पाणी... या कवितांनी उपस्थितांची मने हेलावली.

संभाजी भगत यांनी जिण्याची केली व्हळी रं दादा... बदलत्या जीवनशैलीमुळे

आई व मुलाच्या नातेसंबंधावर होणाऱ्या परिणामांवर भाष्य करणारी किशोर कदम यांची 'आईला वाटत असे...', बापाचे दु:ख व्यक्त करणारी लता अहिवळे यांची 'बाप...', स्त्रीत्व म्हणजे काय?...' यांसारख्या कवितांना दाद मिळाली. इंद्रजित घुले यांच्या प्रेयसीच्या लग्नातील जेवण... आणि शिवाजी सातपुते यांच्या 'बाई म्हणाल्या...' या कवितेने वातावरण प्रफुल्लित केले.

### ✤ वीणा आणि विजय देव यांना सार्थक पुरस्कार

बाळवृंद फाउंडेशनतर्फे शिक्षण व साहित्य क्षेत्रात दिलेल्या योगदानाबद्दल प्रा. विजय व वीणा देव यांना ज्येष्ठ साहित्यिक प्रा. द. मा. मिरासदार यांच्या हस्ते सार्थक पुरस्कार प्रदान करण्यात आला. फाउंडेशनच्या अध्यक्षा शुभांगी परदेशी, सचिव मुकुंद परदेशी, प्रकाश धारप या वेळी उपस्थित होते.

विवाह व कुटुंब यांचे समाजाशी घनिष्ठ नाते आहे. विवाहाचे स्वरूप बदलत असते. तरीही विवाहाकडे गांभीर्याने पाहण्याची गरज आहे. शैक्षणिक, सामाजिक, साहित्यिक पैलूंनी परिपूर्ण असलेले आमचे सहजीवन अत्यंत आनंदी आहे. असे विजय देव यांनी सांगितले. 'विजय यांच्या प्रोत्साहनमुळेच मी प्रध्यापक होऊ शकले. त्यामुळेच ग्रामीण विद्यार्थ्यांना शिकविण्याची, त्यांना मार्गदर्शन करण्याची संधी मला मिळाली,' असे वीणा देव यांनी सांगितले. मिरासदार यांनी देव दाम्पत्याचे अभिनंदन केले.

### ✤ पं. जयराम पोतदार यांना पुरस्कार

गानवर्धन संस्थेचा अण्णासाहेब जळगावकर संवादिनीवादन पुरस्कार यंदा पं. जयराम पोतदार यांना ९ एप्रिल रोजी सिंबायोसिस संस्थेचे अध्यक्ष डॉ. शं. बा. मुजुमदार यांच्या हस्ते हा प्रदान करण्यात आला. या प्रसंगी तळेगाव येथील दै. अंबरचे संपादक सुरेश साखळकर यांनी पोतदार यांची मुलाखत घेतली.

### ✤ डॉ. प्रतिमा इंगोले यांना 'नवरत्न' पुरस्कार

सह्याद्री वाहिनीतर्फे साहित्य क्षेत्रातील 'नवरत्न' पुरस्कार डॉ.प्रतिमा इंगोले यांना प्रदान करण्यात आला. हा पुरस्कार मिळालेल्या त्या पहिल्या महिला साहित्यिक आहेत. नक्षलवाद, शेतमजूर, पंचमहाभुते, बलुतेदारी यांसारखे विषय त्यांनी आपल्या साहित्यातून हाताळले आहेत. डॉ.इंगोले लोकसाहित्याच्या अभ्यासक आहेत. तसेच सहा वर्ष विदर्भामध्ये अभ्यास करून त्यांनी शेतकऱ्यांच्या प्रश्नांवरही लिखाण केले आहे.

## ✤ 'टॉयफा' मध्ये 'बर्फी'ची बाजी

लक्स कोझी टॉयफा पुरस्कार सोहळ्यात ५ पुरस्कारांसह बर्फी चित्रपटाने बाजी मारली. सर्वोत्कृष्ट चित्रपट, अभिनेता, अभिनेत्री, नवोदित अभिनेत्री आणि दिग्दर्शक हे सर्व मानाचे पुरस्कार या चित्रपटाने पटकाविले. तर सर्वोत्कृष्ट संगीतकाराचा पुरस्कार 'अग्निपथ'साठी अजय–अतुल यांना आणि क्रिटिक्सचा नवोदित दिग्दर्शिकेचा पुरस्कार गौरी शिंदेला देण्यात आला.

सर्वोत्कृष्ट चित्रपट – बर्फी
सर्वोत्कृष्ट अभिनेता – रणबीर कपूर (बर्फी)
सर्वोत्कृष्ट अभिनेत्री – प्रियांका चोप्रा (बर्फी)
सर्वोत्कृष्ट सहाय्यक अभिनेता – अन्नू कपूर (विकी डोनर)
सर्वोत्कृष्ट सहाय्यक अभिनेत्री – डॉली अहलुवालिया (विकी डोनर)
सर्वोत्कृष्ट खलनायक – ऋषी कपूर (अग्निपथ)
सर्वोत्कृष्ट विनोदी अभिनेता – अभिषेक बच्चन (बोल बच्चन)
सर्वोत्कृष्ट नवोदित अभिनेता – आयुषमान खुराना (विकी डोनर)
सर्वोत्कृष्ट नवोदित अभिनेत्री– इलियाना डिक्रूझ (बर्फी)
सर्वोत्कृष्ट दिग्दर्शक – अनुराग बासू (बर्फी)
सर्वोत्कृष्ट संगीतकार – अजय – अतुल (अग्निपथ)
सर्वोत्कृष्ट गीतकार – गुलजार (सांस, जब तक है जान)
सर्वोत्कृष्ट गायक – सोनू निगम (अभी मुझमें कहीं, अग्निपथ)
सर्वोत्कृष्ट गायिका – शाल्मली खोलगडे (परेशान, इश्कजादे)

**लक्स कोझी टॉयफा क्रिटिक्स ॲवॉर्ड**

सर्वोत्कृष्ट चित्रपट – गँग्ज ऑफ वासेपूर
सर्वोत्कृष्ट अभिनेता – इरफान खान (पानसिंग तोमर)
सर्वोत्कृष्ट अभिनेत्री – रिचा चड्ढा (गँग्ज ऑफ बासेपूर)
नवोदित दिग्दर्शक – गौरी शिंदे (इंग्लिश – विंग्लिश)

## ✤ विश्वशांती संगीत कला अकादमीचे उद्‌घाटन

माईर्स एमआयटी विश्वशांती केंद्रातर्फे लोणी येथे साकारण्यात आलेल्या विश्वशांती संगीत कला अकादमीचे उद्‌घाटन लता मंगेशकर यांच्या हस्ते गुढी पाडव्याला झाले. ज्येष्ठ संगणकतज्ज्ञ डॉ. विजय भटकर, शिवशाहीर बाबासाहेब पुरंदरे, ज्येष्ठ सरोदवादक उस्ताद अमजद अली खाँ, ज्येष्ठ ध्रुपदगायक उस्ताद झिया फरिदुद्दीन डागर, ज्येष्ठ गायिका उषा मंगेशकर, मीन खडीकर, पं. हृदयनाथ मंगेशकर, आदिनाथ मंगेशकर, श्री. विठ्ठल रुक्मिणी देवस्थानचे अध्यक्ष अण्णा

**आगामी**





# माझी ललाटरेषा

मूळ लेखक : **नफिसा हाजी**
अनुवाद : **शीला कारखानीस**

मी माझे डोळे मिटून घेते. आणि माझ्या लहानपणीच्या दु:स्वप्नांना पिटाळून लावून मला शांत करणारा माझ्या आईच्या हाताचा माझ्या कपाळावर होणारा स्पर्श आठवू पाहते.

स्वतंत्रवृत्तीची आणि बंडखोर अशी सायरा आपल्या सुंदर आणि आज्ञाधारक बहिणीबरोबर – अमिनाबरोबर, कॅलिफोर्नियात वाढली आहे. लहानपणापासून तिने आपली स्वातंत्र्याची इच्छा आणि आपल्या कुटुंबाच्या परंपरा यांना विभागणारी सीमारेषा ओलांडली आहे. विशेषत: मुंबईत वाढलेल्या तिच्या आईच्या मनात आपल्या मुलीने कसं वागावं याच्या ज्या कल्पना होत्या; त्या साऱ्या तिने मोडीत काढल्या होत्या. नवे-नवे अनुभव घेण्यासाठी आतूर असलेली आणि जगाबद्दल अपार कुतूहल असलेली सायरा एका लग्नाला हजर राहण्यासाठी कराचीला जाते आणि तिथे तिच्या कुटुंबातील काही रहस्यं तिच्यापुढे अचानक उभी ठाकतात – ती रहस्यं ज्यांनी तिच्या पुढच्या आयुष्याला एक वेगळाच आकार दिला.

मागच्या तीन पिढ्यांना समजून घेण्याचा आणि त्यांच्याशी जुळवून घेण्याचा जो सायराचा प्रवास होता; त्याची ही सुरुवात होती. सायराच्या लक्षात येतं की, प्रेमाची, काहीतरी मिळवण्याची, आपल्या इच्छांची परिपूर्ती करण्याची जी लढाई ती लढत होती, तीच लढाई तिच्या आधीच्या पिढीतील व्यक्तींनीही लढली होती आणि म्हणूनच तिला मिळालेला बहुआयामी वारसा तिने जपून ठेवला पाहिजे.




५ वी आवृत्ती

# दवबिंदू

## वि. स. खांडेकर

**किंमत : ९०/-रु.**


**पोस्टेज : २५/-रु.**

'...कथाबीजं दाही दिशांनी मनात येऊन पडतात – प्रत्यक्ष अनुभवलेल्या एखाद्या भावनेच्या छटेपासून तो सहजगत्या कानांवर पडलेल्या एखाद्या चार-दोन ओळींच्या घटनेपर्यंत.

अशा अनेक अनुभवांत कथाबीजं लपलेली असतात; पण ती सारीच फुलवण्याचं सामर्थ्य पुष्कळांच्या अंगी नसतं. मीही त्याला अपवाद नाही. झोपलेलं माणूस एकदम काही तरी टोचल्यामुळं जागं व्हावं, त्याप्रमाणं ज्या अनुभूतीनं संवेदना सचेतन होते आणि कल्पना, भावना आणि विचार यांच्या त्रिवेणी संगमानं न्हाऊ लागते, तीच पुढं स्वत:ला हवं तसं कथारूप धारण करू शकते.

गेली पन्नास वर्षं मी कथापंढरीचा वारकरी राहिलो आहे. पहिल्या दहा-वीस वर्षांत मी तरुण वारकरी होतो. चालण्यात काय किंवा अभंग आळवण्यात काय, माझ्या ठिकाणी दुर्दम्य उत्साह होता. आता त्या उत्साहाची अपेक्षा करणं सृष्टिक्रमाला धरून होणार नाही. तथापि,गेल्या काही वर्षांत ज्यांचा कथारूपानं माझ्या हातून आविष्कार झाला, असे काही अनुभव या संग्रहात प्रतिबिंबित झाले आहेत...

या संग्रहातील कथांनी कुणाचं थोडं सात्त्विक रंजन केलं, कुणाला थोडा वाङ्मयीन आनंद दिला, एखाद्याला त्यात दिलासा सापडला, तर त्या लिहिताना मला जो आनंद झाला, तो केवळ वैयक्तिक नव्हता, या जाणिवेनं माझं लेखन सफल झालं, असं मी मानेन.'



२ री आवृत्ती

# जन्मठेप

**गिरिजा कीर**

**किंमत : १५०/-रु.**

**पोस्टेज : २५/-रु.**

पैशामागे लागलेले आई-वडील मुलांपुढचे आदर्श नष्ट करतात. शरीर ही प्रदर्शनाची वस्तू समजून तिची किंमत वसूल करणाऱ्या मुली मानसिक प्रदूषणाला कारणीभूत आहेत.

उत्तान दृश्यं तरुण मनाला चाळवतात. आज सत्तेसाठी चालणारी साठमारी पाहिली की प्रश्न पडतो, नव्या पिढीपुढे आपण कोणती श्रद्धास्थानं ठेवणार आहोत?

ज्यांचा सूर्य मावळला आहे तीच आज प्रकाशाचा शोध घेताहेत; स्वतःची दिवली घेऊन मार्ग काढताहेत. शिक्षा भोगत असणाऱ्या कैद्यांकडून समाजाने अपेक्षा ठेवताना, शिक्षा भोगून तावूनसुलाखून निघालेले हे तरुणच मनातल्या श्रद्धांना झळ पोचू देत नाहीत. त्यांना चांगलं व्हायचंय. आपण आपला आश्वासक हात पुढे केला पाहिजे.

डांगे, डॉ. विश्वनाथ कराड या प्रसंगी उपस्थित होते.

बाबासाहेब पुरंदरे म्हणाले, ''लतादिदींची ओळख करून घ्यायची असेल तर ती केवळ गाण्यातून होणार नाही. तर, आपल्याला त्यांचे वागणं, बोलणं, शब्द यातून ती ओळख करून घ्यावी लागेल.''

ही संस्था संगीत जगतामध्ये मोठे योगदान देईल, अशी भावना उस्ताद अमजद अली खाँ यांनी व्यक्त केली. परदेशी विद्यार्थी येथील कला, संगीत आणि परंपरेचे शिक्षण घेण्यासाठी भारतीय विद्यापीठांमध्ये येतील तेव्हा खऱ्या अर्थाने आपला देश महान होईल, असे डॉ. विजय भटकर यांनी सांगितले. आदिनाथ मंगेशकर यांनी अकादमीची माहिती दिली. सुधीर गाडगीळ आणि पं. किशन शर्मा यांनी सूत्रसंचालन केले.

## ✤ दीनानाथ मंगेशकर पुरस्कार

दीनानाथ मंगेशकर स्मृति प्रतिष्ठानतर्फे मास्टर दीनानाथ यांच्या पुण्यतिथीनिमित्त दरवर्षी २४ एप्रिल रोजी विविध क्षेत्रात विशेष योगदान करणाऱ्या व्यक्तींना पुरस्कार दिले जातात.

अभिनेत्री जया बच्चन, गायक सुरेश वाडकर, अभिनेत्री वंदना गुप्ते, लेखक नाटककार रत्नाकर मतकरी, समाजसेवक गणपतराव पाटील, नीला श्रॉफ, सुनील बर्वे आदी यंदाच्या दीनानाथ मंगेशकर पुरस्कारांचे मानकरी ठरले आहेत. एक लाख एक हजार एक रुपये आणि स्मृतिचिन्ह असे या पुरस्काराचे स्वरूप आहे.

जुन्या नाटकांचे पुनरुज्जीवन करून ती रंगभूमीवर आणण्याचे अतुलनीय कार्य केल्याबद्दल अभिनेता व सुबक संस्थेचा प्रमुख सुनील बर्वे यांना यंदाचा मोहन वाघ पुरस्कार देण्यात आला.

साहित्य क्षेत्रातील योगदानाबद्दल ज्येष्ठ लेखक व नाटककार रत्नाकर मतकरी यांना वाग्विलासिनी पुरस्कार प्रदान केला गेला.

## ✤ मामासाहेब देशपांडे स्मृती पुरस्कार

श्रीपाद सेवा मंडळातर्फे मामासाहेब देशपांडे यांच्या २३व्या पुण्यतिथीनिमित्त राज्यस्तरीय पुरस्कारांचे वितरण संस्थेचे अध्यक्ष शिरीष कवडे यांच्या हस्ते करण्यात आले. श्रीमद वासुदेवानंद सरस्वती टेंब्ये स्वामी वेदमूर्ती पुरस्कार पुण्याच्या डॉ. देवदत्त पाटील यांना देण्यात आला. वा. द. गुळवणी महाराज संतसाहित्य पुरस्कार कोल्हापूर येथील विनायक गोविंद देसाई यांना, संत ज्ञानेश्वर विज्ञानाचार्य पुरस्कार पुण्याचे डॉ. वासुदेव पंचवाघ यांना, योगीराज मामासाहेब देशपांडे साहित्यिक पुरस्कार कोल्हापूरचे तुकाराम नारायण विप्र यांना देण्यात आला. सन्मानपत्र,

स्मृतिचिन्ह व २१ हजार रुपये रोख असे पुरस्काराचे स्वरूप आहे.

### ❖ कल्पना जावडेकरांना 'जिंदादिल पुरस्कार'

'रंगत संगत' प्रतिष्ठानचा 'जिंदादिल पुरस्कार' कल्पना जावडेकर यांना प्रदान करण्यात आला. पाच हजार रुपये, सन्मानचिन्ह, शाल, श्रीफळ, असे या पुरस्काराचे स्वरूप आहे. यावेळी विलास जावडेकर यांना आपले यकृत देणाऱ्या त्यांच्या पत्नी कल्पना जावडेकर यांनी यकृत प्रत्यारोपणाच्या दरम्यान आलेले अनुभवही सांगितले.

'पूर्वी अवयव प्रत्यारोपण करण्यास लोक तयार नसत. मात्र, आता हे चित्र बदलत आहे. पेशंटना त्याचा फायदा होत आहे.' असे डॉ. के. एच. संचेती म्हणाले.

### ❖ 'ग्रंथश्रेष्ठता पुरस्कार'

ग्रामीण साहित्यिक प्राचार्य रा. रं. बोराडे (एकदा असं झालं). संत साहित्याचे अभ्यासक डॉ. रामचंद्र देखणे (आषाढी), मोहन आपटे (प्राचीन भारतीय गणित), डॉ. रवींद्र ठाकूर (साहित्यिक आनंद यादव), पुष्पा फडके (मराठीसाठी लोकनागरी) यांच्यासह अनुबंध प्रकाशनाला (ब्रीद तुझे जगी दीनानाथा) 'ग्रंथश्रेष्ठता पुरस्कार' जाहीर झाला. स्नेहवर्धन प्रकाशनातर्फे दिल्या जाणाऱ्या या पुरस्कारांचे वितरण महाराष्ट्र साहित्य परिषदेचे अध्यक्ष डॉ. प्र. चिं. शेजवलकर आणि डॉ. गजानन एकबोटे यांच्या हस्ते ता. २३ एप्रिल रोजी झाले. यावेळी प्रा. राम शिंदे यांना 'कार्यश्रेष्ठता पुरस्कार' दिला गेला.

### ❖ लक्ष्मी वासुदेव पुरस्कार

आदित्य प्रतिष्ठानतर्फे यंदाचा 'लक्ष्मी-वासुदेव राष्ट्रभूषण पुरस्कार' शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांना जाहीर करण्यात आला होता. हा गुढीच्या रूपातील हा पुरस्कार उद्धव ठाकरे यांनी स्वीकारला. चैतन्याचे, मांगल्याचे प्रतीक म्हणून गुढी परिवर्तनासाठीही दिली आहे, असे मनोगत शंकर अभ्यंकर यांनी व्यक्त केले.

### ❖ डॉ. बंग दाम्पत्याचा अमेरिकेत गौरव

ज्येष्ठ समाजसेवक डॉ. अभय आणि डॉ. राणी बंग यांना अमेरिकेतील जॉन्स हॉपकिन्स विद्यापीठाकडून ॲल्युमनी पुरस्काराने गौरविण्यात येणार आहे. 'घरोघरी नवजात बाळाची काळजी' ही विकसित केलेली पद्धत, बालआरोग्याच्या कार्यासाठी हा सन्मान केला जाणार आहे.

◈ ◈ ◈

# वाचकांसाठी सुवर्णसंधी!

WORDPOWER

## बेळगाव / कोल्हापूर / औरंगाबाद

पुस्तके, खेळणी, स्टेशनरी, म्युझिक, मूव्ही, गेम्स अन्यही बरेच काही आता वर्डपॉवरच्या एकाच दालनात उपलब्ध आहे. सुट्टीचा आनंद पुरेपूर लुटण्यासाठी आवश्य भेट द्या.

**बेळगाव, कोल्हापूर, औरंगाबाद येथील वर्डपॉवरचा पत्ता पुढीलप्रमाणे**

पहिला मजला, भंडारी कॅपिटल, कॉसमॉस बँकेच्या वर, कानपूर रोड, टिळकवाडी, बेळगाव -५९०००६. टेलिफोन क्र.(०८३१)-४२००६७६

शॉप नं १, ग्राऊंड फ्लोअर, अथर्व एम्पाअर, ताराबाई पार्क, कोल्हापूर-४१६००३. टेलिफोन क्र.(०२३१)-६६१७६२५/२६

शॉप नं.- जी/१५, प्रोझन मॉल, चिखल ठाणा, एमआयडीसी, औरंगाबाद-४३१००६.

अधिक माहितीसाठी www.wordpowerbookshop@gmail.com येथे संपर्क साधा.


**सूचना**

‘मृत्युंजय’ आणि ‘छावा’ या पुस्तकांचे प्रकाशनाचे सर्व हक्क मेहता पब्लिशिंग हाऊसकडे आहेत. इतर प्रकाशकाने प्रकाशित केलेली ही पुस्तके विकणे बेकायदेशीर आहे. अशा पुस्तकांची विक्री त्वरीत थांबवावी. अशी पुस्तके आढळल्यास ती जप्त करण्यात येतील याची नोंद घ्यावी.




# रुथ झाबवाला : भारतीयत्वाचा शोध घेणारी लेखिका



३ एप्रिल २०१३ रोजी रुथ प्रावर झाबवाला या लेखिकेचे न्यूयॉर्कमध्ये निधन झाले. तिचे वय ८५ होते. तिच्या हीट अँड डस्ट या कादंबरीला बुकर प्राइझ हा पुरस्कार मिळाला होता. (१९७५) ए रुम वुईथ ए व्ह्यू (१९८६) आणि होवर्डस् एन्ड (१९९२) या तिच्या पटकथांना ॲकॅडमी ॲवॉर्डस् मिळाले होते. बुकर आणि ऑस्कर अशा दोन्ही पुरस्कारांची मानकरी ठरलेली ती एकमेव लेखिका होती.

१९५५ मध्ये तिची पहिली कादंबरी 'टू हूम शी वुईल' प्रसिद्ध झाली. त्यानंतरच्या काळात तिच्या बारा कादंबऱ्या आणि आठ कथासंग्रह प्रसिद्ध झाले. एकूण २३ चित्रपटांच्या पटकथा तिने लिहिल्या. ते सर्व चित्रपट निर्माता इस्माईल मर्चंट आणि दिग्दर्शक जेम्स आयव्हरी यांनी काढले. पटकथाकार, निर्माता आणि दिग्दर्शक यांचे त्रिकूट १९६३ ते २००८ या ४५ वर्षांच्या प्रदीर्घ कालखंडात टिकून राहिल्याचे हे एकमेव उदाहरण आहे. गिनेस बुकमध्ये मर्चंट-आयव्हरी या निर्माता-दिग्दर्शक जोडीची दीर्घकालीन सहकार्याबद्दल नोंद करण्यात आली आहे. खरे तर लेखिका रुथ झाबवालाचाही त्यात अंतर्भाव करून या त्रिकूटाची नोंद व्हायला हवी होती. या त्रिकूटातील मर्चंटचे २००९ मध्ये निधन झाले. रुथचे लेखन अखेरपर्यंत चालू होते. तिची दि जजेस् वुईल ही कथा दि न्यूयॉर्क मध्ये प्रकाशित झाली. ती मृत्यूपूर्वी दहा दिवस आधी म्हणजे २५ मार्च २०१३ रोजी.

या त्रिकूटाला इ.स. २००२ मध्ये बाफ्टाची संयुक्त फेलोशिपही देण्यात आली होती.

रुथ झाबवाला हिला १९९८ मध्ये कमांडर ऑफ ब्रिटिश एम्पायर (सीबीई) हा किताब देऊन ब्रिटनने तिचा गौरव केला.

रुथने आपल्या लग्नानंतर १९५१ पासून भारतात वास्तव्य केले. नवरा सायरस झाबवाला हा पारशी. त्यामुळे रुथने झाबवाला नावाने लेखन केले. त्यामुळे ती भारतीय असावी अशी आपली भावना होते. पण तिचा जन्म जर्मनीमध्ये ७ मे १९२७ रोजी ज्यू कुटुंबात झाला. तिचे वडील मार्कस हे मूळचे पोलंडचे रहिवासी. व्यवसायाने वकील. सैन्य भरतीची सक्ती टाळण्यासाठी ते जर्मनीला, पत्नीच्या माहेरी आले. तिची आई एलेनोरा प्रावर ही जर्मनीतील कोलोन येथे राहणारी. आईचे वडील हे कोलोनमधील सर्वांत मोठ्या सिनेगॉग प्रार्थनागृहाचे प्रमुख होते. त्यांच्यावर कम्युनिस्ट असल्याचा आरोप करून त्यांना तुरुंगात डांबून त्यांचा छळ करण्यात आला. नंतर त्यांची सुटका करण्यात आली. ज्यू विरोधी वातावरण जर्मनीत त्यावेळी फोफावत होते. त्यामुळे त्यांनी जर्मनी सोडून १९३९ मध्ये इंग्लंडमध्ये आश्रय घेतला.

दुसऱ्या महायुद्धाच्या काळात रुथचे सर्व कुटुंब लंडनमधील हेन्डन भागात राहत होते. रुथने यापुढे जर्मनीत जाता येणार नाही हे लक्षात घेऊन इंग्रजी भाषेचा अभ्यास सुरू केला. चार्ल्स डिकन्सच्या कादंबऱ्यांनी तिला वाचनाची गोडी लावली. गॉन वुइथ दि वुइंड या अमेरिकन कादंबरीने तिला झपाटून टाकले. लंडनवर बॉंब हल्ले होत असताना तळघरात राहत असताना कथा कादंबऱ्यांनी तिला बाहेरच्या विशाल जगाचे भान दिले. १९४८ मध्ये तिने ब्रिटिश नागरिकत्व स्वीकारले. इंग्लिश साहित्य हा विषय घेऊन ती १९५१ मध्ये एम. ए. झाली. त्याच वेळी तिची सायरस झाबवाला या आर्किटेक्ट तरुणाची गाठ पडली. तो भारतातील आहे, पारशी आहे याचे तिला अप्रूप वाटले. त्याच्या प्रेमात ती पडली. त्याच्याशी लग्न करून ती भारतात आली. दिल्ली-मुंबईतील पारशी आणि उच्चभ्रू वर्गात तिला प्रवेश मिळाला. राजसत्ता गेली असली तरी अनेक ब्रिटिश उच्चपदस्थ भारतात अजूनही राहत होते. त्यांच्या जीवनशैलीतला थाटमाट अजूनही कायम होता. त्यांच्या जीवनशैलीचे अनुकरण करण्यात भारतीय वरिष्ठ वर्ग धन्यता मानत होता. गरीब व कनिष्ठ वर्ग हलाखीचे कष्टाचे जिणे जगत होता. रुथला हे उच्चनीच भेदभावांमधले दांभिकपण खटकत असे. दिल्लीतील सिव्हिल लाइन्स भागात एक बंगला घेऊन झाबवाला कुटुंबाने संसार थाटला. पंचवीस वर्षे हे कुटुंब दिल्लीत राहिले. इंग्लिश कथाकादंबऱ्यांचे तिचे वाचन चालूच होते. त्यामुळे आपणही लिहायला हवे असे तिला वाटू लागले.

१९५५ मध्ये तिची पहिली कादंबरी (टू हूम शी वुइल) प्रसिद्ध झाली. तिचे चांगले स्वागत झाले. त्यावेळी इंग्रजीत कथाकादंबऱ्या लिहिणाऱ्या भारतीय व्यक्तींची संख्या तुरळकच होती. रुथ झाबवालाचे जर्मनीतले बालपण, युद्धकाळातील लंडनमधले

वास्तव्य, जर्मनीतील नाझी भस्मासुरांनी चालवलेले ज्यूंचे हत्याकांड, दोस्त राष्ट्रांची झालेली सरशी, भारतासारख्या देशांना द्यावे लागलेले स्वातंत्र्य, या सर्वांची ती साक्षीदार होती. सामाजिक, सांस्कृतिक भिन्नतेची तिची जाण तिला अस्वस्थ करीत होती. पारशी समाज हा ब्रिटिश सत्ताधाऱ्यांच्या जास्तीत जास्त जवळ जाणारा, त्यांच्या जीवनशैलीचा आदर्श गिरवणारा. त्यातील डामडौल, उथळपणा तिला खटकत होता. त्या घुसमटीतून बाहेर पडण्यासाठी लेखन हाच एक मार्ग तिला मोकळा वाटत होता. तशात पहिल्याच कादंबरीचे चांगले कौतुक झाल्याने तिच्या लेखनाचा वेग वाढला. एसमाँड इन इंडिया, दि हाऊसहोल्डर, गेट रेडी फॉर बॅटल या कादंबऱ्या १९६३ पर्यंत प्रसिद्ध झाल्या.

१९६३ मध्ये इस्माइल मर्चंट आणि जेम्स आयव्हरी या दोघांनी तिला भेटून तिच्या दि हाऊसहोल्डर या कादंबरीवर चित्रपट काढायची कल्पना तिच्या पुढे मांडली. तिला त्याची पटकथा लिहायची गळ घताली. तिने टोलवाटोलवीचा प्रयत्न केला. पण त्यांनी पिच्छा पुरवला. कारण निर्माता-दिग्दर्शक म्हणून त्या दोघांना चित्रपटसृष्टीत प्रवेश करायचा होता; त्यासाठी तीच कथा, तीच लेखिका यांना योग्य वाटत होती.

वर्षाच्या आतच हा चित्रपट निघाला. मुंबईत त्यावेळी हिंदी-मराठी-गुजराती पिक्चर निघत. इंग्रजीत पिक्चर काढण्याचे धाडस कोणी करीत नव्हते. इंग्लंड-अमेरिकतून येणाऱ्या पिक्चर्सना प्रेक्षक गर्दी करीत. त्यामुळे द हाऊसहोल्डरची निर्मिती ही एक अफलातून कल्पना ठरली. तो आर्थिकदृष्टीनेही यशस्वी ठरला. पटकथाकार रुथ प्रावर झाबवाला, निर्माता इस्माइल मर्चंट आणि दिग्दर्शक जेम्स आयव्हरी या त्रिकूटाने पुढच्या चाळीस वर्षांत २३ चित्रपट काढून एक विक्रमच केला.

१९६५ मध्ये शेक्सपियरवाला हा चित्रपट या त्रिकूटाने काढला. शशीकपूरला या चित्रपटाने आपली प्रेयसी-पत्नी मिळवून दिली.

१९७५ मध्ये हीट अँड डस्ट या रुथच्या कादंबरीला बुकर प्राइझ मिळाले. एका भारतीय लेखिकेला हा सन्मान प्रथमच मिळाला. रुथ प्रावर झाबवाला हे नाव भारतीयच नव्हे तर जागतिक पातळीवर प्रतिष्ठित झाले.

या कादंबरीवरील चित्रपटही त्याच वर्षी निघाला. तो चांगला चालला. परदेशातही गाजला.

याच वर्षी रुथ प्रावर झाबवाला हिने आपल्या तीन मुली आणि पती यांच्यासह न्यूयॉर्क गाठले. मॅनहॅटन भागात छोट्या मोठ्या अपार्टमेंटमध्ये त्यांचे वास्तव्य राहिले. गरजा बदलत राहिल्या, त्याप्रमाणे घरे बदलत राहिली. १९८६ मध्ये अमेरिकेचे नागरिकत्व घेतले तरी भारतात येण्याचा क्रमही जारी राहिला. लेखन चालू

होते. चित्रपटही निघत होते. मुलींची लग्ने झाली. जबाबदाऱ्या आटोक्यात आल्या. मानसन्मान मिळत राहिले.

आपल्या पूर्वायुष्याबद्दल फारसे बोलायला ती उत्सुक नसे. आत्मचरित्र लिहायचे नाही हा तिचा निर्धार होता. तिच्या वडिलांचे ४० कुटुंबीय दुसऱ्या महायुद्धाच्या काळात हिटलरच्या ज्यू विरोधी होलोकास्टमध्ये मारले गेले होते. युद्ध संपल्यानंतरच्या दोन-तीन वर्षांत हे हळूहळू स्पष्ट होत गेले. तेव्हा तिच्या वडिलांनी आत्महत्या केली. त्यानंतर तिने ब्रिटिश नागरिकत्व मिळवले. तिचा मोठा भाऊ क्वीन्स कॉलेजचा फेलो झाला आणि पुढे ऑक्सफर्डमध्ये जर्मन भाषा व साहित्य या विषयांचा प्राध्यापक झाला.

भारतातील अनुभव हे रुथ झाबवालाच्या संपूर्ण साहित्याचे व चिंतनाचे केंद्र आहे. आपल्या जीवनाबद्दल सारेच काही खरे लिहिणे शक्य नसते असे ती स्पष्ट करते.

'माय नाइन लाइव्हज् ' हे तिचे पुस्तक त्या दृष्टीने फार लक्षवेधक आहे.

आपल्या जीवनातील विविध घटनांची वेगवेगळ्या नऊ प्रकारांनी कशी संगती लावता येते हे तिने नऊ वेगवेगळ्या निवेदकांच्या मनोगतांद्वारे या पुस्तकात मांडले आहे. घटना त्याच; पण त्या वेगवेगळ्या संदर्भांशी जोडल्या गेल्या तर, त्यांचे भिन्न भिन्न अन्वयार्थ लावता येतात. लागतात. तीन खंड (थ्री कॉंटिनेंट्स), शार्डस ऑफ मेमरी, ईस्ट इन्टू अपर ईस्ट - प्लेन टेल्स फ्रॉम न्यू यॉर्क अँड न्यू देल्ही, आऊट ऑफ इंडिया वगैरे पुस्तकांतून भारतीय सामाजिक जीवनातील अनेक अंतर्विरोध समोर येतात.

**- शंकर सारडा**

मो. ९८२३२६१०२३

◈◈◈




**३ री आवृत्ती**

# झाडवाटा


लेखक : **आनंद यादव**

**किंमत : १४०/-रु. ।पोस्टेज : २५/-रु.**

आगामी

**'द चेकलिस्ट मॅनिफेस्टो'**

या इंग्रजी पुस्तकाचा अनुवाद




## यशप्राप्तीचा जाहीरनामा!

लेखक : **अतुल गवांदे**

अनुवाद : **सुनिती काणे**

चेकलिस्ट म्हणजे काय?

चेकलिस्ट म्हणजे कुठलेही काम नीटपणे पार पाडण्यासाठी ते सुरू करण्यापूर्वी खातरजमा करायच्या गोष्टींची तपशीलवार यादी!

कल्पना अगदी अळणी आणि सुमार वाटतेय का?

परंतु प्रत्येक व्यवसायात ती किती मोलाची ठरते,

ते पाहण्यासाठी डॉक्टरांच्या, वैमानिकांच्या, बिल्डर्सच्या,


आर्थिक गुंतवणूकदारांच्या, हॉटेल मॅनेजर्सच्या, स्टेज आर्टिस्टच्या जगात

फेरफटका मारू या आणि घेऊ या अनेक थरारक अनुभव!

## पुस्तक परिचय

# जे. आर. डी. टाटा यांची पत्रं

## टाटा उद्योगसमूहाचे कल्पक नेतृत्व आणि उच्च नीतिमूल्यांचे अधिष्ठान




संपादन- **अरविंद माम्ब्रो**

अनुवाद - **सुप्रिया वकील**

पृष्ठे **५३२।** ४५०रु. पोस्टेज ३०रु./ सभासदांना सवलतीत

# १

# जे. आर. डी. टाटा : एक उत्तुंग व्यक्तिमत्त्व

जेआरडींना आशिया आणि युरोप या दोन खंडांचा वारसा होता. त्यांचे वडिल पारशी होते आणि त्यांची आई फ्रेंच होती.

१९०४ साली पॅरिसमध्ये जन्मलेल्या जेआरडींचं शिक्षण पॅरिस, मुंबई आणि योकोहामा या ठिकाणी झालं. फ्रान्समध्ये जास्त झालं. केंब्रिजला जाण्यापूर्वी इंग्रजी सुधारावं, म्हणून त्यांना 'इंग्लिश ग्रामर स्कूल'मध्ये दाखल करण्यात आलं होतं.

त्यांची आई अतिशय हिकमती, बुद्धिमान आणि परिस्थितीशी सहज जुळवून घेणारी होती. त्यांना पाच मुलं होती. त्या स्वतःच्या हिमतीवर फ्रान्समधला सगळा पसारा आवरून, पतीसमवेत राहण्यासाठी भारतात आल्या. त्यांचे पती 'हाउस ऑफ टाटाज्'मध्ये राहत असत. त्या वर्षा-दोन वर्षांनी त्यांच्या मायदेशी जात असत, त्या वेळी जेआरडींच्या शिक्षणात नेहमी व्यत्यय येत असे. त्यांची आजी मोठी जबरदस्त स्त्री होती. जेआरडी म्हणतात, ''तिचा नवरा मिश्कील होता. तिच्यासमवेत काही काळ घालवल्यानंतर हे सद्‌गृहस्थ पळून गेले, माझ्या आजीशी लग्न करणाऱ्या कुणाही माणसानं जे केलं असतं, तेच त्यांनी केलं.''

जेआरडींमध्ये विनोदप्रियतेचा वारसा बहुधा त्यांच्या फ्रेंच आजोबांकडून आला असावा.

शालेय शिक्षणानंतर एका वर्षासाठी ते फ्रान्समधल्या 'Le Saphis' नामक पलटणीत दाखल झाले. त्यांचा तिथला कार्यकाल संपल्यानंतर त्यांना केंब्रिजमध्ये जायचं होतं. तिथं त्यांच्यासाठी जागा राखीव होती. पण त्यांच्या वडिलांनी त्यांना भारतात परत येऊन 'टाटाज्'मध्ये रुजू होण्याचं फर्मान काढलं. आपल्याला विद्यापीठात कधीच जाता आलं नाही, या गोष्टीचं शल्य त्यांना खुपत राहिलं, पण त्यांच्या वडिलांना नियतीच्या पावलांची चाहूल लागली असावी; कारण, त्यानंतर अवघ्या नऊ महिन्यांतच ते निवर्तले आणि जेआरडींनकडे 'टाटा सन्स' या भारतातील सर्वांत मोठ्या औद्योगिक समूहाच्या संचालकपदाची सूत्रं आली. त्यांची महाविद्यालयीन शिक्षणाची संधी हुकली असली, तरी त्यांनी कार्यालयीन वेळेनंतर स्व-अभ्यास सुरू केला. ते उद्योगाच्या विविध पैलूंविषयीच्या पुस्तकांचा अभ्यास करू लागले. ते विशीत असताना टायफॉइडमधून बरे होत होते, त्या वेळी ते ताजमधल्या त्यांच्या खोलीत बिछान्यावर पडून अभ्यास करत असत.

त्यांची बहीण रोडाबेह त्यांना आर्जवानं सांगायची, ''जेह, तू दमला आहेस,

तुला बरं नाही, तर तू विश्रांती का घेत नाहीस?''

त्यावर जेआरडी म्हणायचे, ''मला टाटांना साजेसा माणूस बनायचं आहे.''

विमानोड्डाण हे जेआरडींचं जणू वेडच होतं. सर्वप्रथम इंग्लिश खाडी पार करणारे लुईस ब्लेरीयट यांचं घर फ्रान्सच्या किनाऱ्यावर टाटांच्या कंट्री होमजवळ होतं. ब्लेरीयट यांचा वैमानिक समुद्रकिनाऱ्यावर छोटं विमान उतरवत असे. त्यानं एकदा जेआरडींना विमानसफर घडवली. त्या वेळी जेआरडी पंधरा वर्षांचे होते. त्याच दिवशी त्यांनी निश्चय केला की, आपणसुद्धा आकाशात भरारी घ्यायची. हे स्वप्न वास्तवात उतरण्यासाठी त्यांना दहा वर्षं प्रतीक्षा करावी लागली. पण हे जेव्हा घडलं, तेव्हा ते विमानोड्डाणास पात्र ठरणारे भारतातील पहिले वैमानिक ठरले. १० फेब्रुवारी १९२९ रोजी त्यांना परवाना मिळाला.

मी त्यांना एकदा विचारलं , ''तुमच्या आयुष्यातील सर्वांत मोठं साहस कोणतं?''

त्यावर ते उत्तरले , ''आकाशात भरारी घेण्याचा अनुभव. त्याची बरोबरी कशाशीही  होऊ शकत नाही.''

ते पुढे म्हणाले, ''तुम्ही जेव्हा त्या छोट्या विमानात एकटे असता, मार्गदर्शकाच्या मदतीविना स्वत: 'कन्ट्रोल' सांभाळत असता आणि विमान धावपट्टीवर वेग घेतं – अखेर आभाळात झेपावतं – त्या वेळी आपण एकटे आहोत – आपल्या-आपल्या भरवशावर, हेही जाणून असतो.''

१९३० साली इंग्लंड ते भारत अथवा भारत ते इंग्लंड हे हवाई अंतर एकट्यानं पार करणाऱ्या पहिल्या भारतीय व्यक्तीला आगाखान चषक देण्याचं जाहीर झालं होतं. जेआरडींनी या स्पर्धेत भाग घेतला होता. ते कराचीहून लंडनला निघाले. वाटेत इजिप्तमधल्या 'अबौकिर' उपसागराजवळ त्यांनी विमान उतरवलं, त्या वेळी लंडनहून कराचीकडे निघालेले दुसरे स्पर्धक ॲस्पी इंजिनिअर स्पार्क प्लगच्या शोधात वाळवंटात अडकून पडले होते. जेआरडींनी अत्यंत खिलाडू वृत्तीनं स्वत:कडचा स्पार्कप्लग त्यांना दिला आणि दोघांचाही विरुद्ध दिशांनी पुन्हा प्रवास सुरू झाला. ॲस्पींनी त्यांच्यावर अवघ्या काही तासांनी मात केली.

''ते जिंकले, याचा मला आनंद झाला,'' जेआरडी उद्गारले, ''कारण त्यांना या यशाची रॉयल इंडियन एअर फोर्समध्ये प्रवेश मिळण्यास मदत झाली.''

पुढे, भारतीय हवाईदल प्रमुख बनण्याचा मान मिळवणारे, ॲस्पी हे दुसरे भारतीय ठरले.

१९३२ साली जेआरडींना हा प्रसंग आठवला.

''ऑक्टोबर महिन्यातील एका सकाळी सूर्य पूर्व क्षितिजावर उगवत होता, त्या वेळी सिंगल इंजीन असलेलं 'पस मॉथ' विमान कराचीहून मुंबईकडे पत्रांचे गठ्ठे घेऊन

झेपावलं. विमानाची घरघर सुरू झाली, तेव्हा वैमानिकानं प्रार्थना म्हटली.''

आणि अशा प्रकारे भारतातील पहिली हवाई सेवा – 'टाटा एअरलाइन्स' सुरू झाली.

१९४८ साली जेआरडींनी 'एअर-इंडिया इन्टरनॅशनल' सुरू केली. अवघ्या दहा वर्षांत ते आंतरराष्ट्रीय हवाई वाहतूक संस्थेचे (IATA) अध्यक्ष बनले. १९५३ साली हवाईसेवेचं राष्ट्रीयीकरण झालं असलं, तरी ते १९७८ सालापर्यंत एअर-इंडियाची सूत्रं त्यांच्याकडे होती. त्यांनी या कंपनीला जगातील सर्वांत कार्यक्षम





**६ वी आवृत्ती**

# वावटळ

## व्यंकटेश माडगूळकर

**किंमत : ९०/-रु.**
**पोस्टेज : २५/-रु.**

आपल्या घरांना लागून असलेली घरे, अडीनडीला आपली मदत घेणारी, आपल्याला मदत करणारी, आपल्याच गावातील ही माणसे शत्रू होतील, असे त्यांना कधी वाटले नव्हते. त्यांच्यापासून आपल्याला धोका आहे, ही जाणीव त्यांना आज पहिल्याप्रथम होत होती.

हा धक्का अगदी अनपेक्षित होता. त्याने ही मंडळी मुळापासून कलली होती. कधी नव्हे ते त्यांना वाटत होते की, आपण अनाथ आहोत. आपले असे म्हणायला कोणी नाही. आता कशाची शाश्वती नाही. केव्हा काय होईल त्याचा नेम नाही!

एका 'वावटळी'मुळे हे सर्व घडले होते....

लेखकाच्या शब्दांत सांगायचं तर –

'वावटळ' ही कादंबरी नाही, इतिहास आहे.

इतिहास विज्ञानासारखा असतो.

काल्पनिक गोष्टींना तिथं वाव नसतो.

हवाईसेवांच्या पंक्तीत नेऊन ठेवलं होतं.

१९३८ साली वयाच्या अवघ्या चौतिसाव्या वर्षी ते भारतातील सर्वांत मोठ्या औद्योगिक समूहाचे अध्यक्ष बनले. त्यांनी या समूहाचं बावन्न वर्षं अतिशय उत्तम नेतृत्व केलं.

मी त्यांना विचारलं होतं, ''सर होमी मोदी आणि सर अर्देशिर दलाल अशा तुमच्यापेक्षा ज्येष्ठ आणि अधिक सुप्रसिद्ध व्यक्ती संचालक मंडळात असताना, तुमची इतक्या तरुण वयात टाटा सन्सच्या अध्यक्षपदी कशी निवड झाली?''

त्यावर ते माझा प्रश्न उडवून लावत ते म्हणाले, ''ती चूक होती.''

मी उत्तराचा आग्रह धरल्यावर ते म्हणाले, ''कदाचित मी खूप परिश्रम घेत असल्यामुळे असेल.''

त्यांच्या औपचारिक शिक्षणाला मर्यादा असूनही त्यांनी जबाबदाऱ्या कशा पार पाडल्या असतील?

''तंत्रविषयक ज्ञानाच्या अभावामुळे माझं व्यवस्थापनातील मोठं योगदान म्हणजे इतरांना प्रोत्साहित करणं.''

त्यांनी प्रत्येक माणसाशी त्यांच्या पद्धतीनं कसा संवाद साधला आणि लोकांमधील सर्वोत्तम गुण कसे बाहेर आणले, त्याविषयी तपशीलवार विवेचन त्यांनी केलं आहे.

''कधीकधी, या प्रक्रियेत स्वत:लासुद्धा दडपावं लागतं. हे यातनादायी पण गरजेचं असतं.... लोकाचं नेतृत्व करण्यासाठी, त्यांना आपुलकीनं मार्गदर्शन करावं लागतं.''

साठ वर्षांहून अधिक काळाच्या उच्चस्तरीय व्यवस्थापनातील अनुभवाच्या बळावर त्यांनी नेतृत्वविषयात स्वत:चं असं तत्त्वज्ञान आणि पद्धत विकसित केली होती.

''नेतृत्वासाठी आवश्यक असणारा एक गुण म्हणजे, संस्थेत सर्वोत्तम फलप्राप्ती घडवण्यासाठी आवश्यक असणाऱ्या गोष्टी उपलब्ध करणं. त्यासाठी जर अत्यंत सक्रिय कार्यकारी अध्यक्ष बनणं गरजेचं असेल, जसा मी एअर-इंडियामध्ये होतो, तर मी तेही बनलो. त्याच वेळी दुसऱ्या बाजूला, आमच्या इतर कंपन्यांपैकी एका कंपनीतील व्यवस्थापकीय संचालकाला एकट्यानं काम करणं आवडतं, हे मी जाणून होतो. तो त्याच्या पद्धतीनं फलनिष्पत्ती घडवणार होता. त्या वेळी मी स्वत:च्याच मनाशी ठरवलं की, जर एखाद्या माणसाची आपल्या कामावर लक्ष एकवटून फलनिष्पत्ती घडवून दाखवण्याची क्षमता असेल, तर मी त्याच्या मार्गात येणं हा मूर्खपणा ठरेल. आदर करणं ही अध्यक्षाची मुख्य जबाबदारी असते.''

त्यानंतर ते म्हणाले, ''मला माणसं आवडतात, हे विसरू नका.''

जेआरडींच्या अनुकंपेचा परीघ विस्तृत होता. त्यांनी आजूबाजूचं दारिद्र्य कधीच

स्वीकारलं नाही. त्यांना भारत आणि या देशातील लोकांसाठी सर्वोत्तम तेच हवं होतं. ते जवळजवळ १०० कंपन्यांच्या समूहाचं नेतृत्व करत असले, तरी ते स्वतंत्र व्यक्तींचीही तळमळीनं काळजी करत असत.

'नॅशनल सेंटर फॉर द परफॉर्मिंग आर्टस'च्या विशाल मैदानावरची एक सायंकाळ उपस्थितांसाठी अत्यंत संस्मरणीय होती.

१९९२ साली जेआरडींना 'भारतरत्न' किताब मिळाला. त्याप्रीत्यर्थ, त्यांचा टाटा कर्मचाऱ्यांच्यावतीनं अभिनंदनपर समारंभ आयोजित करण्यात आला होता. त्या वेळी केलेल्या भाषणाच्या उत्तरार्धात हा सत्याऐंशी वर्षांचा वटवृक्ष श्रोतृवृंदाला उद्देशून म्हणाला, ''माझ्या मित्रांनो, मी म्हणायला हवं... माझ्या मुलांनो....''

सर्व उपस्थितांचे डोळे ओलावले; कारण ते शब्द मनापासूनचे, खरे होते, हे त्यांना माहीत होतं.

त्यानंतर भारताला आर्थिक सामर्थ्य बहाल करण्यात इतकं मोठं योगदान देणारे जेआरडी पुढे म्हणाले, ''एका अमेरिकी अर्थतज्ज्ञानं अंदाज वर्तवला आहे की, भारत पुढील शतकात आर्थिक महासत्ता बनेल. मला आर्थिक महासत्ता बनलेला भारत नकोय. मला भारतानं सुखी देश व्हायला हवं आहे.''

१९६० आणि १९७० या दशकांत इतर काही औद्योगिक समूहांइतकी जलद टाटांची प्रगती झाली नाही. जेआरडींनी १९६०नंतर भारत सरकारपुढे सादर केलेल्या सर्व महत्त्वाच्या योजना – त्यामध्ये कार निर्मिती आणि मिठापूरमध्ये सुयोग्य खत प्रकल्प उभारणीचा समावेश होता – अडकून पडल्या होत्या; मात्र त्याच वेळी इतर औद्योगिक समूहांना विकासासाठी परवाने मिळाले होते.

१९७९ साली मी त्यांना म्हणालो, ''गेल्या काही वर्षांत टाटांपेक्षा इतर औद्योगिक समूहांची वेगवान प्रगती झाली आहे, असं म्हणावं लागेल.''

त्यावर जेआरडींची मनापासून आणि ठाम प्रतिक्रिया होती, ''मी बरेचदा याचा विचार केला आहे. आपण इतर कंपन्यांनी जे मार्ग वापरले, तसले मार्ग वापरले का? तसं केलं असतं, तर आज आपण आहोत त्याच्यापेक्षा दुप्पट मोठे झालो असतो. पण मी तसा कुठला मार्ग अवलंबणार नाही.''

जेआरडी आपली तत्त्वं आणि मतं आचरणात आणत असत. हे त्यांचं सामर्थ्य होतं.

जेआरडी अनेक उच्च सन्मानांनी विभूषित झालेले भारतीय होते, तरीही त्यांच्या अखेरपर्यंत त्यांना आपल्याला कॉलेजमध्ये जाता आलं नाही, या गोष्टीचा सल होता. त्यांच्या निधनापूर्वी एकदा, त्यांच्यासोबत गाडीतून विमानतळावर जाताना मी त्यांना विचारलं होतं, ''सर, तुम्ही अत्यंत नम्र आणि विनयशील आहात. पण समजा, तुम्हाला केंब्रिजमध्ये पाठवलं असतं, तर तुम्ही आजच्याइतके नम्र आणि

विनयशील राहिला असता का?''

त्यावर त्यांनी क्षणभर विचार करून उत्तर दिलं, ''मला वाटतं, मी अधिक नम्र बनलो असतो, कारण केंब्रिजमधून 'डॉक्टर ऑफ इंजिनिअरिंग' पूर्ण केल्यानंतर, मला आपल्याला इतर विषयांचं ज्ञान किती अल्प आहे, ते माझ्या लक्षात आलं असतं.''

जेआरडी अभ्यासासाठी खूप वेळ देत असत. त्यांच्याकडे आख्खं शेल्फ भरून विमानोड्डाण या विषयावरील पुस्तके होती. तसंच लष्करी मोहिमा आणि युद्धं या विषयावरील पुस्तकांचं आणखी एक शेल्फ होतं आणि स्पोर्ट्स कार, मोटर रेसिंगवरील पुस्तकांचंही. त्यांना गुन्हेगारी वाङ्मय, डेव्हिड निवेनच्या 'ब्रिंग ऑन द हॉर्सेस'सारखी हलकी-फुलकी पुस्तकं आणि लुईस लामॉरची पुस्तके आवडत असत. जेआरडी फक्त ग्रंथसंग्राहक नव्हते, तर ते अधाशी आणि उत्साही वाचक होते. त्यांच्या घरातून पहिल्या मुलाखतीनंतर, मी तिथून बाहेर पडलो, ते त्यांची तीन आवडती पुस्तकं सोबत घेऊन. त्यामध्ये अलेक्झांडर वूलकॉट यांचं एक पुस्तक होतं. ते पुस्तक मी वाचावं, याबाबत जेआरडी आग्रही होते. (त्यांनी वाचन न केलेला किंवा फारसं चिंतन न केलेला विषय होता – धर्म! ही गोष्ट ते कबूल करत. आमच्या अखेरच्या भेटींत आम्ही 'देव' या विषयावर सविस्तर विचारमंथन केलं होतं.)

त्यांच्या चरित्रलेखनाच्या निमित्तानं आमच्या मुलाखतींसाठी भेटी होत असत. मी ती खोली त्यांची अभ्यासिका होती असं समजत होतो, पण तीन वर्षांनी मला शोध लागला की, ही त्यांची फक्त अभ्यासिकाच नाही, तर हीच त्यांची बेडरूमही होती!

मग मी धाडस करून म्हणालो, ''सर, तुमच्या स्थानावरील कुणीही व्यक्ती इतक्या छोट्या खोलीत राहणार नाही.''

त्यावर ते म्हणाले, ''का? ही मला पुरेशी आहे.''

त्यांना मुलांची खूप आवड असूनही, त्यांना अपत्यप्राप्ती झाली नाही. ऐंशी वर्षांचा उंबरठा पार केल्यानंतरही ते उशिरापर्यंत ऑफिसमध्ये काम करत असत.

जेआरडी म्हणत, ''मी घरी जाऊन काय करू?''

घरी परतल्यावर त्यांच्या स्वागताला ना मुलं होती ना नातवंडं. घरात फक्त चाकाच्या खुर्चीवरील त्यांची पत्नी आणि पाळीव कुत्रा होते. एका अर्थानं, त्यांच्याजवळ सगळं काही होतं आणि एकीकडे पाहिलं तर, पूर्ण रिक्त होते. ते आयुष्यातल्या काही अगदी लहान-लहान आनंदांना ते मुकले होते, पण त्याचा त्यांच्या रसरसत्या चैतन्यावर कधीही झाकोळ आला नाही.

आयुष्याच्या अखेरीस ते परमेश्वराप्रती दृढ श्रद्धा बाळगून होते.

# २
# ४० हजार पत्रांतून निवडलेली ३०० पत्रे

भारतीय कारखानदारांपैकी सर्वाधिक पत्रे लिहिणारी व्यक्ती जे.आर.डी. टाटा यांना मान मिळू शकेल. ते नेहमी म्हणत असत की, 'मला भाषणं देण्याची तीव्र नावड आहे,' पण त्यांना पत्रलेखन फार आवडत असे.

पुण्याच्या 'टाटा सेंट्रल आर्काइव्हझ' (TCA) म्हणजे दफ्तरखान्यामध्ये जेआरडींनी लिहिलेली चाळीस हजारांवर पत्रे आहेत. या पत्रांचे याप्रमाणे वर्गीकरण करण्यात आलेले आहे :

* कौटुंबिक पत्रव्यवहार (फॅमिली करस्पॉन्डन्स)
* मुख्य फाइल्स (मास्टर फाइल्स)
* आद्याक्षरांनुसार फाइल्स (अल्फाबेटिकल फाइल्स)
* प्रकल्प फाइल्स (प्रोजेक्ट फाइल्स)
* संकीर्ण पत्रव्यवहार (मिसलेनियस करस्पॉन्डन्स)

जेआरडींच्या कौटुंबिक पत्रव्यवहाराचा कालावधी १९१३ ते १९२६ या दरम्यानचा आहे. १९२५ साली टाटा कंपनीत प्रवेश केल्यानंतर त्यांनी व्यावसायिक पत्रव्यवहार सांभाळायला सुरुवात केली. १९३८ साली टाटा समूहाचे अध्यक्ष बनल्यानंतर त्यांचा पत्रव्यवहार प्रचंड वाढला. सन १९५० ते १९७०च्या दशकाच्या मध्यापर्यंत, या त्यांच्या करिअरच्या सर्वांत उत्तुंग कालखंडातील पत्रे बहुसंख्य आहेत.

आपले कुटुंबीय, टाटामधील सहकारी, व्यावसायिक सांगाती, मंत्री, सरकारी उच्चपदस्थ, भारतातील आणि परदेशातील मित्र; तसेच यांना परिचित नसणाऱ्या व्यक्तीयांना– लिहिलेल्या पत्रातून त्यांच्या आस्थेचे विषय, त्यांना रस असणाऱ्या गोष्टी प्रकट झाल्या आहेत. 'अपरिचित' व्यक्तींच्या पत्रांना उत्तरे देण्याचा शिष्टाचारही ते आवर्जून पाळत असत. अर्थातच त्यांना महत्त्वाच्या प्रश्नांबाबत त्यांचे विचार जाणून घेण्याची त्या व्यक्तींची तळमळीची इच्छा आहे, असं वाटलं तर.

**जेआरडींच्या पत्रव्यवहारातून त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचे विविध पैलू, त्यांचे निरनिराळ्या लोकांशी असणारे भावबंध, त्यांचा आत्मीय सहभाग असलेले प्रकल्प, त्यांची विविध मुद्यांविषयीची मते, त्यांची सहृदयता, स्पष्टवक्तेपणा, विनोदबुद्धी, त्यांची जीवनविषयक वृत्ती, नागरिक म्हणून त्यांच्या आस्थेचे विषय, त्यांची जीवनमूल्ये आणि त्यांचे व्यक्तिगत 'इंटरेस्ट्स' प्रकट होतात.**

श्री. टाटा यांचे चिरस्थायी मैत्रीबंध त्यांच्या व्यावसायिक संपर्कातून निर्माण झाले, त्यांपैकी काही स्वातंत्र्यपूर्व काळात जुळले. हे मैत्रीबंध कसे दृढ होत गेले,

हे पाहणं मोठं आनंददायी आहे. त्यांच्या पत्राच्या मायन्यांतून व्यक्तीव्यक्तींमधील परस्परसंपर्काचा 'टिपिकल' नमुना पाहायला मिळतो.

प्रारंभी, पत्रात ज्याला पत्र लिहायचे, त्याच्या आडनावाने त्यांनी मायना लिहिला आहे. त्यानंतर त्यांनी मायन्यात नाव लिहिले आहे आणि त्यानंतर काही जणांचा टोपणनावाने उल्लेख केला आहे. उदाहरणादाखल सांगायचं तर, डिनोज (डॉ. डॉक्सीडेस), मुन्ने (डॉ. जहीर हुसेन), डग (डॉ. डग्लस एन्समिंगर) , गोकु (डॉ. एम.जी.के. मेनन), नन्जा (बी.के.एन. राव), निक्का (एम.आय. कादिर), बचू (डी.एम. घिया), किनी (सो. एला मिलर्ट), भूथी (डॉ. एस. भूथलिंगम). त्याचप्रमाणे, 'चिन्न' म्हणजे चिन्नप्पा आणि 'सिन्नी' म्हणजे सी. सुंदरम.

अगदी सुरुवातीला त्यांनी डॉ. रॉबर्ट मॅकनामारा यांना लिहिलेल्या पत्रात 'प्रिय मिस्टर मॅकनामारा' असा मायना लिहिला आहे, त्यानंतर तोच मायना 'प्रिय रॉबर्ट' आणि अखेर 'प्रिय बॉब' असा झाला आहे; हा प्रवास बघणं मोठं रंजक आहे. श्री. टाटा आपल्याला मित्रांना, 'जेह' असं सबोधावं, असं आग्रहानं सांगताना दिसतात (त्यांनी पत्रात लिहिलं आहे – 'मी तुमच्यासाठी जेह आहे, श्री. टाटा नाही.') आणि कुणी 'जय' किंवा 'जे' लिहिलं, तर ते दुरुस्त करून सांगतानाही दिसतात.

जेआरडींच्या पत्रांमध्ये वाचकाला सर्वांत भावणारी गोष्ट कोणती असेल, तर ती म्हणजे संवाद साधण्यातला त्यांचा 'थेट'पणा. आपले म्हणणे मांडण्यासाठी ते शब्दांच्या निवडीबाबत अतिशय चोखंदळ होते. ते सुयोग्य शब्द निवडण्यासाठी ब्रिटिश आणि अमेरिकी असे दोन्ही शब्दकोश वापरत असत. १९७५ सालापासून त्यांचे पत्रलेखन मंदावले. तोवर त्यांचे बरेचसे मित्र आणि सहकारी पटावरून अदृश्य झाले होते. शिवाय वय हा मुद्दाही कारणीभूत असावा.

सर्वसामान्यपणे, जेआरडींनी गंभीर पत्रांमध्ये एक विशिष्ट पथ्य पाळलेले दिसते. एखाद्या माणसाला लिहायचे ठरवल्यानंतर, संबंधित विषयाचा साधकबाधक विचार करून त्यानंतर काढलेला निष्कर्ष पत्रात दिला आहे. मुद्यावरील सहमती अथवा असहमती सुस्पष्ट शब्दांत मांडली आहे. आपल्या मतांपाठीमागची विचारधारा स्पष्ट केली आहे. त्यामुळेच, या पत्रांमधून श्री. टाटा यांचे विचार, त्यांच्या भावना, त्यांचे निर्णय ते या निष्कर्षाप्रत कसे आले, हेही समजू शकते. तुम्हाला जवळपास त्यांचा आवाजच ऐकता येतो.

या निवडक पत्रामधील प्रत्येक विभागातून विशेष ज्ञानप्राप्ती घडतेच, पण त्यातसुद्धा श्री. टाटा यांचा हवाई क्षेत्राशी संबंधित पत्रव्यवहार विशेष महत्त्वाचा आहे. भारतात हवाईसेवा प्रथम सुरू करण्याचा मान त्यांचा असल्यामुळे त्याला यथोचित महत्त्व दिलेले आहे. या विभागामधील त्यांची काही सर्वोत्कृष्ट पत्रे १९५० ते

१९७० या कालावधीतली आहेत. या काळात 'एअर-इंडिया'शी संबंधित महत्त्वपूर्ण धोरणात्मक निर्णय आणि त्यांची अंमलबजावणी या कामात मोठी गोवणूक होती. या पत्रव्यवहारामध्ये त्यांनी विमान उत्पादक, परदेशी हवाई सेवा कंपन्यांचे अध्यक्ष, हवाई मंत्री (त्यांच्याशी टाटांची महत्त्वाच्या मुद्यांबाबत नेहमी असहमती असे.) आणि एअर-इंडियाचे कार्यकारी अधिकारी यांना लिहिलेल्या पत्रांचा समावेश आहे.

या संग्रहातील पत्रांची निवड करताना हे सर्व मुद्दे विचारात घेतले आहेत. वाचकाला एखाद्या विषयाची पार्श्वभूमी समजावी, यासाठी या संग्रहात काही पत्रोत्तरांचा समावेश केला आहे. 'बियाँड द लास्ट ब्ल्यू माउंटन' या श्री. आर. एम. लाला यांनी लिहिलेल्या जेआरडींच्या चरित्रातील काही महत्त्वाच्या पत्रांचा समावेशही या संग्रहात आहे.

जेआरडी अद्वितीय होते. या पत्रांतून ते माणूस आणि विलक्षण व्यक्तिमत्त्व अशा दोन्ही रूपांत वाचकांसमोर प्रकट होतील, अशी मला आशा आहे.

**– अरविंद माम्ब्रो**

# ३

# पत्रांतून खुलणारे विलोभनीय, प्रांजल व्यक्तिमत्त्व

*(टाटांचे चरित्रकार आर. एम. लाला यांच्या प्रस्तावनेतील काही भाग)*

'पत्रलेखन' ही अभिजात कला झपाट्यानं लोप पावत आहे आणि वेगवान 'ई-मेल्स', 'सेल फोन्स' आणि जागतिक संपर्काची तत्पर माध्यमं प्रसारात आली आहेत. कोणे एके काळी पत्रांतून आब, मोहकता, सखोलता, अगदी आपुलकीसुद्धा व्यक्त होत असे; पण आज त्याची जागा आपल्या संपर्कमाध्यमांतल्या प्रचंड धावपळीनं घेतली आहे. त्याचबरोबर, भावी इतिहास अभ्यासकांच्या दृष्टीनं या पत्रांची उणीव हा मोठा अडथळा ठरणार आहे. त्यांना आपल्या काळाचं आणि अशा काळातील कार्यमग्न व्यक्तिमत्त्वांचं अधिक परिपूर्ण चित्र पाहता येणार नाही.

पत्रं हा कायमस्वरूपी माहितीस्रोत असतो आणि कुणाही चरित्रकाराच्या दृष्टीनं सर्वांत महत्त्वाचा स्रोत. विचारपूर्वक लिहिलेल्या अगर दुसऱ्याला मजकूर सांगून लिहून घेतलेल्या पत्रांतून माणसाला विचार करायला वेळ मिळतो, मन आणि आत्म्याचा उद्‌गार खुलेपणाने व्यक्त करता येतो – प्रेमीजनांच्या बाबतीत, त्यांना आपलं हृदय दुसऱ्या व्यक्तीपुढं उघड करता येतं. या पत्रांतून केवळ माणसाचे विचारच प्रकट होतात असं नव्हे; तर त्यातून त्याच्या आवडीनिवडी, तो ज्या काळात जगतो, त्याचं प्रतिबिंबही उमटत असतं. पत्रांतून एखाद्या व्यक्तीची माणसांविषयीची

आणि विविध बाबींविषयीची मतं व्यक्त होत असतात. लॉर्ड चेस्टरफिल्ड यांनी त्यांच्या सुपुत्रास लिहिलेली पत्रं प्रसिद्ध आहेत. नेहरूंनी तुरुंगात असताना त्यांच्या कन्येला – इंदिरा यांना शिकवण देण्याच्या हेतूनं लिहिलेली पत्रं, त्यांच्याच 'ग्लिम्प्सेस ऑफ वर्ल्ड हिस्टरी' या ग्रंथाचा स्रोत बनली.

जेआरडींनी आपल्या वडिलांना लिहिलेली पत्रं मनमोकळी आहेत. जेआरडी अशा युगात होते की, त्या वेळी पत्राचं महत्त्व मानलं जात असे. आणि याचं अंशत: श्रेय त्यांच्या पित्याला आहे. ते त्या वेळी भारतात होते. ते जेआरडींना पत्रातून त्यांची आणि भावंडांची सविस्तर ख्यालीखुशाली लिहिण्यास बजावत असत. जेआरडी त्या वेळी फ्रान्समध्ये होते. या पत्रलेखनामुळे त्यांची भाषेवर हुकमत तर निर्माण झालीच, शिवाय त्यांना प्रदीर्घ पत्रलेखनाची सवय लागली. कधीकधी ते पत्रात त्यांच्या निर्णयाची कारणंसुद्धा सविस्तर लिहिताना दिसतात.

जे.आर.डी. टाटा यांचं चरित्र लिहीत असताना, त्यांचा पत्रव्यवहार पाहायला मिळावा, अशी मी विनंती केली होती. त्या वेळी मला 'बॉम्बे हाउस'च्या तळघरात ही संपदा पाहायला मिळाली. तिथं एका लोखंडी कपाटात ही पत्रं खचाखच भरलेली होती. २० ते २५ हजार पत्रं तरी असतील, असं वाटलं होतं (पण, ती ४०,००० होती.). टाटा फौंडेशन या संस्थेच्या संचालकपदाची पूर्ण वेळ जबाबदारी सांभाळताना, यातलं प्रत्येक पत्र बारकाईनं वाचणं अशक्य होतं, पण ते आवश्यक होतं. त्यामुळे मी श्री. अरविंद माम्ब्रो यांना सांगितले की सर्वप्रथम जेआरडींचा महत्त्वाच्या व्यक्तींशी झालेला किंवा त्यांच्या आयुष्यातील महत्त्वपूर्ण घटनांशी निगडीत अथवा ते सांभाळत असलेल्या कंपन्यांशी संबंधित सर्व पत्रव्यवहार वेगळा काढावा. दुसरी गोष्ट म्हणजे, विनोदबुद्धी आणि मानवतेचं दर्शन घडेल, अशी पत्रं बाजूला काढावीत, असे ही सुचवले.

ते मला प्रत्येक फाइलमधली काही निवडलेली पत्रं दाखवायचे. अशा चाळणीद्वारे सुमारे ९०० पत्रं निवडली. जेआरडी यांची मतं आणि त्यांचं कार्य दर्शविणाऱ्या पत्रांपैकी पाच ते दहा टक्के पत्रेच मी उद्धृत केली असली, तरी चरित्रकार म्हणून या पत्रांनी मला जे ज्ञान दिलं, ते 'बियाँड द लास्ट ब्ल्यू माउंटन'च्या लेखनामध्ये अनमोल ठरलं. या पुस्तकाच्या प्रारंभी जेआरडींच्या बालपणीची पत्रं दिली आहेत, ती पत्रं मला त्या वेळी मिळाली नव्हती. ही पत्रं जेआरडींच्या निधनानंतर काही काळानं, त्यांच्या घरी एका छोट्या सुटकेसमध्ये सापडली. ती 'लेखकाच्या' विस्मरणात गेली होती. तोवर 'बियाँड द लास्ट ब्ल्यू माउंटन' प्रसिद्ध झालं होतं.

जेआरडीनी जवळपास अर्धशतकात दिलेल्या भाषणांचं संपादन करताना आम्ही त्यांच्या व्याख्यानांचं कालक्रमानुसार वर्गीकरण न करता, ते विषयानुसार केलं. वाचकांना त्यांचे एखाद्या विशिष्ट विषयावरील विचार व्यवस्थित समजावेत, हा

त्यामागचा उद्देश होता. श्री. माम्ब्रो यांना पत्रांचं सादरीकरण करताना हीच पद्धत अनुसरण्याची सूचना केली, त्यामुळे 'कीनोट' या जेआरडींच्या व्याख्यानांच्या संग्रहाशी या पत्रसंग्रहाचा उत्तम मेळ राहील. 'कीनोट'मध्ये प्रत्येक विभागाच्या प्रारंभी, त्या त्या विभागामध्ये काय समाविष्ट केलं आहे, त्यातील ठळक मुद्दे संक्षिप्त स्वरूपात दिले आहेत.

जेआरडी प्रत्येक पत्राची आणि प्रत्येक ऑफिस मेमोची गंभीर दखल घेत असत.

१९७४ सालची गोष्ट आहे. त्या वेळी सुधा नारायण मूर्ती 'इन्डियन इन्स्टिट्यूट ऑफ सायन्स'मध्ये शिकत होत्या. त्या वेळी त्यांनी 'टेल्को'मध्ये इंजिनिअर पाहिजे, अशी जाहिरात पाहिली. त्या जाहिरातीच्या तळाशी ओळ होती : 'महिला उमेदवारांनी अर्ज करू नये.'

त्यावर त्यांनी जेआरडींना एका पोस्टकार्डावर पत्र लिहिलं. त्यामध्ये त्यांनी म्हटलं होतं की, 'टाटा नेहमीच अनेक गोष्टींचे अग्रणी राहिले आहेत आणि अशा कंपनीत तुम्ही स्त्री-पुरुष असा भेदभाव करू शकता, हे पाहून मला आश्‍चर्य वाटलं.'

त्यांनी रागाच्या भरात हे पत्र पाठवलं.

''मला दहा दिवसांत तार आली, त्यामध्ये पुण्याच्या टेल्को कंपनीत त्यांच्या खर्चाने मला मुलाखतीला उपस्थित राहण्यास सांगितलं होतं.'' सुधा मूर्ती आठवण सांगतात. आणि त्यांना ती नोकरी मिळाली. टेल्कोनं 'शॉप फ्लोअर'वर प्रथमच एका महिलेची नेमणूक करण्यातल्या अडचणी सांगितल्या, पण तरी त्यांची नेमणूक केली गेली.

सुधा मूर्ती लिहितात, 'मला जेआरडी महान वाटतात, कारण कामामध्ये प्रचंड गर्क असूनही, त्यांनी न्याय मागणाऱ्या आणि त्यांना प्रश्‍न करणाऱ्या एका तरुणीच्या पोस्टकार्डाची कदर केली. त्यांना दररोज हजारो पत्रं येत असतील. ते माझं पत्र केराच्या टोपलीत टाकू शकले असते, पण त्यांनी तसं केलं नाही. त्यांनी एका सामान्य मुलीच्या – जिच्यापाशी ना कसलं वजन होतं, ना पैसा होता – उद्देशाचा मान राखला आणि तिला आपल्या कंपनीत काम करण्याची संधी दिली. त्यांनी केवळ मला नोकरीच दिली नाही, तर माझं जीवन आणि मनोभूमिका कायमची बदलून टाकली.'

जेआरडींपाशी आपल्या स्वत:च्या माणसांजवळ आपल्या चुकांची कबुली देण्याइतका मनाचा मोठेपणा होता.

'टेल्को'ला उत्तुंग उंची देणाऱ्या सुमंत मुळगावकर यांना स्वहस्ते लिहिलेल्या पत्रात जेआरडी म्हणतात :

'मी एकदम संतापलो, त्याबद्दल दिलगीर आहे. माझ्यावर घरी आणि जमशेदपूर भेटीत प्रचंड दडपण होतं आणि भरीस भर म्हणून, मला थोडा निद्रानाशाचाही त्रास

होत आहे. त्यामुळे मी जरा जास्तच हळवा झालो आणि तुमच्या टीकेमुळे दुखावलो गेलो. तुमची टीका अर्थपूर्ण आहे, हे मला माहीत आहे. माझी तुमच्याविषयीची आत्मीयता आणि मला तुमच्याविषयी वाटणारं कौतुक कधीही बदलणार नाही.'

मी दशकभर, फौंडेशनचा संचालक या नात्यानं त्यांच्या निकट काम केलं आहे. कुठलंही पत्र अथवा मेमो शुक्रवारी दुपारी त्यांच्याकडं गेला की, तो सोमवारी सकाळी माझ्या टेबलवर प्रतिक्रियांसह यायचा. त्यांच्या उत्तरामध्ये कधीही अंतर्विरोधी भावना नसत. त्यांचा निर्णय अगदी स्पष्ट, स्वच्छ असे. काही महत्त्वाच्या पत्रांवर त्यांच्या सहीच्या आद्याक्षरांसह 'थँक यू' असे. पत्राचं टंकलिखित उत्तर पाठवण्याचं असेल, तर एक-दोन दिवस लागत असत. जे लोक त्यांना पत्रं लिहीत असत, त्यांचा आत्मसन्मान राखला जाई. ते भारतातील सर्वांत मोठ्या औद्योगिक समूहाचे अध्यक्ष होते. १९३२ सालापासून 'टाटा एअरलाइन्स'चे आणि पुढे १९७८ सालापर्यंत 'एअर-इंडिया इन्टरनॅशनल'चे प्रमुख होते. 'टाटा स्टील' कंपनीचे अध्यक्ष होते, भारतातील संबंधित सर्वांत मोठ्या कंपन्यांशी संबंधित होते. त्यांच्या पत्रलेखनाचा विचार करता, या गोष्टी त्यांची कार्यक्षमता आणि विचारसंपन्नता दर्शवतात. सहकारी निवृत्त झाल्यानंतरसुद्धा ते अधून-मधून पत्रातून त्यांच्या इन्टरेस्टच्या बाबींविषयी लिहित कारण त्यांना फक्त सहकारी नव्हे तर ते मित्रही मानत. या मित्रांना ते कधीही विसरू शकत नव्हते. त्यांच्या अधिकारपदावरून लिहिलेल्या पत्राच्या संदर्भात, त्यांच्यापाशी एका कंपनीतून दुसऱ्या कंपनीकडे किंवा एका विषयावरून दुसऱ्या विषयाकडे चटकन वळून, त्या विषयावर लक्ष केंद्रित करण्याची विलक्षण क्षमता होती. लिहीत असलेल्या पत्रावर अगर हातात घेतलेल्या कामावर संपूर्ण लक्ष एकवटलेलं असे. ते पत्रांच्या मजकुरातील आणि व्याख्यानातील शब्दांची निवड करण्याबाबत परिपूर्णतावादी असत.

एकदा कोलकत्याच्या एका अनोळखी शिक्षकानं त्यांना त्यांच्या आयुष्याची मार्गदर्शक तत्त्वं कोणती, असं विचारल. त्यांनी त्याला ठाम शब्दांत त्याविषयी कळवलं. अशा प्रत्येक व्यक्तीसाठी वेळ देता यावा, अशातला भाग नव्हता; पण त्यांनी वेळ काढला, कारण त्यांच्या लेखी प्रत्येक व्यक्ती महत्त्वाची होती. ते अत्यंत महत्त्वाच्या गोष्टींच्या दडपणांपलीकडे जाऊन लोकांच्या मनामनांत पोहोचले, त्यामुळेच आज त्यांना आपल्यातून जाऊन एका दशकाहून अधिक काळ लोटल्यानंतरसुद्धा त्यांचं इतकं आत्मीय स्मरण होतं.

त्यांच्या मृत्यूनंतर त्यांच्याच एका कंपनीनं – एअर-इंडियानं होर्डिंग तयार केलं होतं :

*त्यांनी आभाळाला स्पर्श केला आणि त्याच्या गालावर स्मित फुलले*
*त्यांनी दोन्ही बाहू पसरले आणि त्यात अवघे विश्व सामावले*
*माणूस आणि संस्था यांतून जे भव्य-दिव्य घडलं,*
*ते त्यांच्या दूरदृष्टीमुळे....*

आणखी एका होर्डिंगवर म्हटलं होतं : 'जेआरडी नामक चैतन्य टिकून आहे'.

जेआरडींचं चैतन्य त्यांच्या पत्रांमधूनही जिवंत आहे आणि त्यामुळंच श्री. माम्ब्रो यांनी परिश्रमपूर्वक निवडलेला हा संग्रह अनमोल आहे. या पत्रांमध्ये विषयांचा विस्तृत पट खुला होतो. जेआरडींनी स्वत:चं एक तत्त्व अनुसरलं, ते म्हणजे : 'टू थिंक थिंग्ज आउट फॉर वनसेल्फ.'

त्यांचा एक लोभस स्वभावविशेष होता.

एकदा त्यांनी मला सांगितलं होतं, ''मी स्वत:ला कधीच फार गांभीर्यानं घेत नाही.'' ते मजेत जगणारे आनंदयात्री होते. मिश्कील, खट्याळसुद्धा!

त्यांच्या तीक्ष्ण नजरेतून कोणतीही गोष्ट सुटत नसे.

आपल्यापैकी बहुतेक जण आपल्या सभोवतीच्या अकार्यक्षम परिस्थितीशी जुळवून घेतात. एकदा त्यांच्यासोबत गाडीतून जात असताना त्यांनी रस्त्यांची अवस्था आणि इमारतींची स्थिती यावर भाष्य केलं होतं. आणखी एका प्रसंगात, अंगावर दरिद्री कपडे असणाऱ्या, माथ्यावर भार वाहून नेणाऱ्या माणसाला पाहून ते भावविवश झाले, ''त्याच्याजवळ बहुतेक फक्त एवढंच असावं.''

ते कंपनीच्या मर्सिडीसमधून फिरत, तरी आलिशान आरामदायी परिघात कधीच राहत नसत. त्यांनी मुंबई दूरसंचार विभागाचे महाप्रबंधक पी. एम. अगेरवाला यांना लिहिलेलं पत्र ('शहर, राष्ट्र आणि त्यापलीकडे : नागरिकांच्या आस्थेचे विषय'मधून) हे याचं उत्कृष्ट उदाहरण आहे. या पत्रात त्यांनी म्हटलं आहे, 'रस्ता दुरुस्तीचं काम पूर्ण झालं की, तुमची माणसं पुन्हा त्याच ठिकाणी झडप घालून तिथं खणून ठेवतात.' त्यांनी पुढं म्हटलं आहे, 'अर्थातच, त्यांचं या गोष्टीवर बारीक लक्ष असतं.'

त्यानंतर त्यांनी अशा प्रकारच्या कार्यपद्धतीवर उपाय सुचवला आहे.

ते राष्ट्रीय अथवा स्थानिक स्तरावरच्या सर्व गोष्टींचा विचार करत असत.

ते द्रष्टे होते. १९५०च्या दशकामध्ये कम्युनिझम उत्तुंग शिखरावर होता. या मतप्रवाहाच्या भौतिक सामर्थ्यावरील आणि त्याहून महत्त्वाचं म्हणजे याच्या मूलभूत सिद्धान्ताबाबतच्या विश्वासामुळे त्यानं औद्धत्याचाही कळस गाठला होता.

याच दशकात निकिता क्रुश्चेव यांनी पाश्चात्यांना सांगितलं होतं की, 'आम्ही तुम्हाला गाडून टाकू.'

जानेवारी १९५५मध्ये जेआरडींनी जयप्रकाश नारायणना एक पत्र लिहिलं. जयप्रकाश त्या वेळी कट्टर मार्क्सवादी होते.

'भांडवलशाही पद्धत आणि तिचं इतिहासातील स्थान यांबाबतच्या तुमच्या विचारांशी मी सहमत नाही, हे कबूल करायलाच हवं. भांडवलवादी पद्धतीकडे, ती अनेक वर्षांपूर्वी जशी होती, त्याच नजरेतून पाहणं ही तुम्ही चूक करत आहात, हे मी आदरपूर्वक नमूद करू इच्छितो. ही पद्धत आज जशी आहे किंवा संपूर्ण जगभर ती ज्या स्वरूपात विकसित होत आहे, त्याकडे आपण कानाडोळा करत आहात, असं मला वाटतं... माझ्या मते जगभरातील अनेक भागांत मुक्त व्यवस्थेमुळे नवचैतन्य निर्माण होईल आणि कटू वास्तव बदलून परिवर्तन घडेल....'

हा प्रसंग बर्लिनची भिंत पाडण्याआधी आणि सोव्हिएट साम्राज्यातील कम्युनिस्ट पद्धती लयाला जाण्याआधी पस्तीस वर्षं घडला आहे. एका दशकानंतर अगदी परंपरानिष्ठ आणि ताठर चीनसुद्धा 'मार्केट इकॉनॉमी'साठी दारे खुली करू लागला होता.

त्यांनी जयप्रकाश नारायणना लिहिलेलं हे पत्र मी मार्च १९९१ मध्ये जेआरडींना दाखवलं, तेव्हा त्यांनी ते बारकाईनं अभ्यासलं आणि ते म्हणाले, ''नॉट टू बॅड.''

त्यांचे शब्द काळाच्या कसोटीवर खरे ठरले, याचं त्यांनी यत्किंचितही श्रेय घेतलं नाही.

एकदा ते 'पुनर्जन्म' या संकल्पनेबद्दल बोलत होते.

त्यांचं प्रकट चिंतन सुरू होतं : ''आता, मला कुठं पुनर्जन्म घ्यायला आवडेल बरं? पश्चिमेत?''

त्यांनी हा पर्याय नाकारला.

''तिथं आता फार थोडी आव्हानं उरली आहे. रशिया इन्टरेस्टिंग असेल, पण ते आजच्यासारखं असणार नाही. सोव्हिएट संघ आज जसा आहे, तशाच अवस्थेत तो टिकून राहण्याच्या दृष्टीनं फारच विशाल आहे.''

पुन्हा एकदा त्यांचे विचार बरोबर ठरले.

**त्यांचे नेहरूंशी कडू-गोड भावबंध होते. नेहरूंनी त्यांच्याशी आर्थिक प्रश्नांबाबत कधीही सल्लामसलत केली नाही, त्यामुळे त्यांच्या मनात कटुता होती. पण त्यांनी नेहरूंविषयी वाटणाऱ्या व्यक्तिगत आपुलकीवर त्याचा कधीही परिणाम होऊ दिला नाही.**

ते या दोन गोष्टी वेगवेगळ्या ठेवू शकत असत. त्यांचा १९२४ सालापासून नेहरूंशी परिचय होता, स्वातंत्र्यपूर्व काळात त्यांची चांगली मैत्री होती. या संग्रहामध्ये जवाहरलाल यांनी त्यांच्या मुलीच्या लग्नाचं खास आमंत्रण देण्यासाठी जेआरडींना स्वत: लिहिलेल्या पत्राचा समावेश आहे. नेहरूंच्या निधनानंतर कितीतरी वर्षांनी जेआरडींनी मला सांगितलं : ''मला ते फार प्रिय होते.''

त्यांना महात्मा गांधींविषयी अशी जवळीक कधीही वाटली नाही.

युद्धाच्या अखेरीनंतर जेआरडी औद्योगिक शिष्टमंडळाचं नेतृत्व करत होते,

त्या सायंकाळी महात्मा गांधींनी वृत्तप्रतिनिधींना सांगितलं, ''त्यांना नेत्यांची मुक्तता होईपर्यंत थांबायला सांगा. मोठ्या उद्योगांनी इंडो-ब्रिटिश लुटीतून तुकडे गोळा करणं थांबवल्यानंतरच स्वातंत्र्य मिळेल.''

तो १९४५ सालचा मे महिना होता. विचित्र बाब म्हणजे, त्या शिष्टमंडळात गांधीजींचे लाडके मानस सुपुत्र – जी. डी. बिर्लासुद्धा होते. त्या वेळी जेआरडींनी एक निवेदन प्रसिद्ध केलं, त्यामध्ये गांधीजींनी आपल्याकडून कसलही स्पष्टीकरण मागण्याची तसदी घेतली नाही याचा खेद झाल्याचं म्हटलं होतं. त्यांनी गांधीजींना दुखावल्या मनानं एक पत्र लिहिलं होतं, त्याला गांधीजींनी परस्परविरोधी भावनायुक्त उत्तर दिलं होतं. ('स्वातंत्र्याच्या दिशेने आणि नंतर : औद्योगिक मोहीम, १९४५ मधून). त्यानंतर हा विषय इथेच संपला.

मात्र त्यांना सर्वांत दुखावणारी व्यक्ती म्हणून मोरारजी देसाई यांचे नाव घ्यावे लागेल. २५ जानेवारी, १९७८ रोजी मोरारजी देसाईंनी जेआरडींचं स्वागत केलं, त्या वेळी त्यांनी १ फेब्रुवारीला एअर इंडियाच्या संचालकमंडळाची पुनर्रचना करण्यात येणार असून, त्यामध्ये जेआरडींचा समावेश नाही, या गोष्टीचा पत्ता लागू दिला नाही. सरकारनं जेआरडींना कळवण्याचं सौजन्य दाखवलं नाही आणि जेआरडींचे कर्मचारी एअर मार्शल पी. सी. लाल (ते त्या वेळी जमशेदपूरमध्ये कंपनीप्रमुख होते.) यांना एअर-इंडियाच्या अध्यक्षपदाची धुरा स्वीकारण्यास मोरारजींनी सांगितलं. लाल यांनी खाजगीत जेआरडींना सांगितलेली बातमी नऊच्या बातम्यांत अधिकृतपणे जाहीर झाली. जेआरडींना अध्यक्षपदावरून बाजूला करून पी. सी. लाल यांची नेमणूक झाली होती. याबाबत सर्वत्र गदारोळ माजला, तेव्हा मोरारजी देसाईंनी एक पत्र लिहून सारवासारव करण्याचा प्रयत्न केला. या मूळ पत्रावर जेआरडींनी पेन्सिलनं प्रश्नचिन्हं केली आहेत. या घटनेत जखमेवर अपमानाचं मीठ चोळलं गेलं. ('स्वातंत्र्याच्या दिशेने आणि नंतर : औद्योगिक मोहीम, १९४५मधून).

जेआरडी अत्यंत सौजन्यशील होते. ते मनातले विचार नेहमी निर्भयपणे व्यक्त करत असत. या पुस्तकाची पानं चाळताना, जेआरडींचा बुगाट्टी रेसिंग कार मिळाल्यानंतरचा लहान मुलासारखा आनंद पाहून आपण सुखावतो. त्यांच्या वडिलांनाही त्याबद्दल औत्सुक्य असलं आणि त्यांनी या गाडीसाठी पैसे दिले असले तरी मडगार्डसुद्धा नसलेली रेसिंग बुगाट्टी पाहून ते विस्मयचकित झाले होते. या पुस्तकाच्या पानापानांत आपल्याला या व्यक्तिमत्त्वाचा आनंद, दुःख, जाणिवा, विनोदबुद्धी, आस्था, मानवता दिसून येते. या पुस्तकातून जेआरडी या व्यक्तिमत्त्वाविषयी स्वत: कल्पनाचित्र बनवेल आणि ही त्याच्या वा तिच्या दृष्टीनं एक प्रकारे शोधयात्रा असेल.

**– आर. एम. लाला**

◈ ◈ ◈

## पुस्तक परिचय

# मुक्त विहंग
## चीनच्या तीन कन्या

### अनन्वित अत्याचाराच्या व अमानुष राजवटीच्या पार्श्वभूमीवरची चीनमधील तीन पिढ्यांची कहाणी




मूळ लेखिका : **युंग चँग**

अनुवाद : **डॉ. विजया बापट**

पृष्ठे **६५२**। ६००रु. पोस्टेज ३०रु./ सभासदांना सवलतीत

# बंदिस्त चीनमधील जनजीवनाचे अस्सल स्वरूप कसे होते?

## पुस्तकाच्या २००३ च्या आवृत्तीमधील लेखिकेची प्रस्तावना

१९९१ मध्ये चाळिसाव्या वर्षी माझे 'वाइल्ड स्वान्स' प्रथम प्रसिद्ध झाले अन् माझे सारे आयुष्यच बदलून गेले. लेखिका बनण्याचे स्वप्न प्रत्यक्षात आले. चीनमध्ये राहत असताना स्वत: काही लिहिणे, ते प्रसिद्ध करणे ही कल्पनाच अशक्य कोटीतील होती. सांस्कृतिक क्रांतीच्या त्या काळात चीन, माओच्या जुलूमशाही पोलादी पकडीत जखडलेला होता. बहुतेक लेखकांना तेव्हा छळ सोसावा लागला. छळ छावण्यात डांबण्यात आले. कितीतरी लेखकांना आत्महत्या कराव्या लागल्या. १९६६ ते १९६७ मध्ये सुरू केलेल्या शुद्धीकरणास, 'सांस्कृतिक क्रांती' असे गोंडस नाव देण्यात आले होते. घराघरातील बहुतेक पुस्तके जाळण्यात आली. कम्युनिस्ट अधिकारी असलेले माझे वडीलदेखील या छळास बळी पडले होते. आपला आवडता पुस्तकसंग्रह जाळण्यास त्यांना भाग पाडले गेले. लिहिणे हेदेखील त्या काळी भयंकर जोखमीचे काम होते. मी लिहिलेली पहिलीवहिली कविता फाडून फेकून द्यावी लागली. त्या दिवशी वडिलांचा छळ करणाऱ्या लोकांनी आमच्या घरावर छापा घातला होता. तो दिवस होता २५ मार्च १९६८; माझा सोळावा वाढदिवस.

तरीसुद्धा लिहिण्याची खुमखुमी मला स्वस्थ बसू देईना. पुढील काही वर्षे मी शेतकरी व इलेक्ट्रिशियन म्हणून काम केले. शेतात शेणखत पसरताना, विजेच्या खांबांवर चढून विजेच्या प्रवाहाची पाहणी करीत असताना मी मनातल्या मनात लांबलांब उतारे आणि लहान-लहान कविता रचून त्या पाठ करीत असे.

सप्टेंबर १९७८ मध्ये मी ब्रिटनला आले.

१९७६ मध्ये माओचा मृत्यू झाला होता. माओने लादलेल्या जुलमी, गुदमरून टाकणाऱ्या एकांतवासातून चीन बाहेर पडला. चोहीकडून भूप्रदेशाने वेढलेल्या सेशुआन प्रांतातील नऊ कोटी वस्ती असलेल्या भागातून १९४९ नंतर पाश्चिमात्य जगात शिक्षणासाठी जाण्याची संधी मिळालेली मी पहिली विद्यार्थिनी ठरले. या अविश्वसनीय भाग्याबरोबरच मला हवे तसे लेखनस्वातंत्र्यही मिळाले.

पण त्याचवेळी माझी लिहिण्याची ऊर्मी मावळली, पार थिजली. आता मला लिहावेसे मुळी वाटेना. लिहिणे म्हणजे पुन्हा अंतर्मुख होणे, विसरू पाहणाऱ्या जीवनातील दु:खद आठवणींना फिरून उजाळा देणे होते. मी चीनला पूर्णपणे विसरू पाहत होते.

लंडनमधील सारेच आनंददायक, उल्हासवर्धक होते. आईला लिहिलेले माझे

पहिले पत्र, '४२ माईडा व्हेल'कडे जाणाऱ्या रस्त्यावरील घरांच्या खिडक्यांसमोरील बहरलेल्या पुष्पकुंडाच्या अन् घराघरासमोरील बागीच्यांच्या वर्णनांनी ओतप्रोत भरले होते. चिनी दूतावासाच्या मालकीच्या त्या जागेवर माझी राहण्याची सोय केली गेली होती. चीनमधील घरांना सजविणाऱ्या फुलांचा पुनर्जन्म होण्यापूर्वीचा – बहरण्यापूर्वीचा काळ होता तो. माओने, 'सरंजामशाहीची अन् सुखवस्तू मध्यमवर्गाची निशाणी' हे नाव देऊन फुलबागा व गवताच्या लागवडीस १९६४ साली प्रतिबंध केला होता. 'साऱ्या फुलबागांचा नाश करा' ही त्याची आज्ञा होती. ते सारे पाहताना मला अतीव दु:ख झाले होते. स्वत:च्या भावना लपविण्याचा पराकाष्ठेचा प्रयत्न मी केला होता. कारण माओच्या आदेशाविरुद्ध मत वा विचार बाळगणे, म्हणजे गुन्हा असे समीकरण त्यावेळी पूर्णतया बिंबवले गेले होते.

लंडनमध्ये असताना, मला जेव्हा आमच्या वस्तीबाहेर जाण्याची परवानगी मिळाली तेव्हा साहजिकच मी प्रथम हाइड पार्कमध्ये लांबलचक फेरफटका मारला. मन अवर्णनीय आनंदाने भरून आले.

रटाळ वाटणाऱ्या राज्यशास्त्राच्या वर्गातील उपस्थिती, त्या वेळच्या आमच्या लंडनच्या वास्तव्यातसुद्धा सक्तीची होती. आम्ही लंडनमध्येदेखील तुरुंगात असल्यासारखे बंधनातच होतो. परवानगीशिवाय कुठेही एकटे जाण्याची मनाई होती. आज्ञेचे उल्लंघन करणे म्हणजे बेअब्रूसह चीनला परत जाणे. सरतेशेवटी १९७८ साली माओचे विचारधोरण धुडकावून लाव्यात आले. पुढील वर्षी मी नियमांच्या मर्यादा थोड्या अधिक ताणू शकले.

**चीनच्या मुख्य भूप्रदेशात आणि परदेशात एकट्याने फिरणारी कदाचित मी पहिली विद्यार्थिनी असेन. विदेशी माणसांत मिसळताना बरोबर कुणीतरी असायलाच हवे या आमच्या कायद्याची कुणाहीसमोर वाच्यता करायची नाही असाही एक दंडक होता. अशा वेळी दुसरे काहीतरी कारण पुढे करा म्हणून आम्हाला सांगण्यात आले होते. मला खोटे बोलायचे नव्हते. दूतावासातील सहायकाची मनधरणी केली. त्या सहायकाने परवानगी दिली, पण सावध राहा असा इशारादेखील दिला.**

चिनी बंधने शिथिल होत गेली तसतसे माझे एकट्याने बाहेर जाणे, भटकणे वाढत गेले. लवकरच वेगवेगळी पार्श्वभूमी असलेल्या व्यक्तींबरोबर माझी मैत्री होऊ लागली. बहुतेकांना मी माझी ओळख चिनी म्हणून करून न देता दक्षिण कोरियन म्हणून करून देऊ लागले.

मला इतरांचे लक्ष चीनकडे वेधून घ्यायचे नव्हते.

ब्रिटन हा वर्गवार पद्धत नसलेला छान देश आहे याचा माझ्या मनावर खोल ठसा उमटला. माओच्या कम्युनिझममधील वजनदार गटात माझा जन्म झाला होता.

माओचा चीन, वर्गवारीत किती विभागला होता आणि उच्च-नीच श्रेणीबंधात किती खोल रुतलेला होता ते मी पाहिले होते. तेथे प्रत्येक व्यक्तीस, आपल्या चौकटीत काटेकोरपणे बसविले जात असे. प्रत्येक अर्जावर, फॉर्मवर, जन्मतारीख व लिंग यांशेजारी 'कौटुंबिक दर्जा' नावाचा स्तंभ असायचा. त्याना हीनदर्जाची वागणूक मिळे. स्तंभातील माहितीवर आधारित प्रत्येकाचे कार्य, आयुष्य व नातेसंबंधदेखील ठरविले जात. 'वरच्या वर्गा'तील अनेक जण शिष्टपणे वागत. ज्यांचा जन्म, 'हलक्या कुळात' झाला आहे त्यांचा आयुष्याचा नाश जवळजवळ निश्चित असे.

वेगवेगळे स्तर व पारंपरिक फरक असूनदेखील ब्रिटनमधील प्रत्येकास स्वत:ची अशी प्रतिष्ठा असते. समान वागणुकीवर ब्रिटिश समाजात भर दिला जातो त्याची बरोबरी आजचा चीनदेखील करू शकत नाही. म्हणूनच भावनिक आणि वैचारिक दोन्ही दृष्टींनी मी ब्रिटनच्या प्रेमात पडले. येथील माझे पहिले वर्ष झंझावाती व भावनांनी ओथंबलेले असे गेले. नकाशावर दाखविलेली अनेक संग्रहालये आणि कलादालने मी पालथी घातली. विद्यार्थ्यांना नगण्य दरात उपलब्ध असलेली अनेक नाटके व गाण्याचे कार्यक्रम मी पाहिले. भाडे वाचविण्यासाठी तासन्तास लंडनमध्ये पायी फिरण्याचा मनसोक्त आनंद घेतला.

भाषा विषयात डॉक्टरेटची पदवी घेण्यासाठी मला यॉर्क महाविद्यालयाकडून शिष्यवृत्ती देण्यात आली होती. १९८२ साली मला डॉक्टरेटची पदवी मिळाली त्या वेळी एका ब्रिटिश महाविद्यालयातून डॉक्टरेट मिळविणारी, कम्युनिस्ट चीनमधील मी पहिली व्यक्ती होते.

जे मी आता विसरून गेले आहे त्या भाषिक सिद्धान्ताहून कितीतरी अधिक मोलाचे असे बरेच काही मला तेथे शिकायला मिळाले. स्वत:च्या भावनाशील व्यक्तिमत्त्वामुळे माझ्यात सतत वास करत असलेली चिंता आणि घाबरटपणा घालवायला ज्याने मला मदत केली तो माझा पर्यवेक्षक प्राध्यापक – ल पेज मला आठवतोय. माझ्या प्रबंधाचा आराखडा ठरवायला मी त्याच्याकडे गेले होते.

भाषिक सिद्धान्ताबाबतचे माझे विचार मी मांडू लागले. त्याने शांतपणे सारे ऐकून घेतले. ''तू आपला प्रबंध मला दाखवतेस का?''

''पण मी अजून प्रबंधास सुरुवात देखील केली नाहीये.''मी म्हटले.

''पण तुझ्याकडे सारी उत्तरे तर आधीच तयार आहेत!''

तो एकच शेरा, माझ्या डोक्यातील अधिकेंद्रित राज्यसत्तेच्या शिकवणुकीने बांधून ठेवलेली गाठ उकलायला कामी आला.

चीनमध्ये आम्हाला वास्तव पारखून निष्कर्ष काढायला शिकविले नव्हते. आम्हाला शिकवण होती ती मार्क्सवादी सिद्धान्त व माओच्या विचारांपासून सुरुवात करून, राजकीय पक्षाच्या विचारांचा मार्ग अनुसरून, मुकाट्याने वाटचाल करायची.

त्यात न बसणाऱ्या वास्तवाकडे दुर्लक्ष करून प्रसंगी ते नाकारायला व धिक्कारायलासुद्धा आम्हाला शिकविले होते.

यॉर्क महाविद्यालयात असताना एका रात्री माझ्या मागील आयुष्यावर पुस्तक लिहायचा विचार मनात डोकावला. तेथील एक प्राध्यापक नुकतेच चीनला जाऊन आले होते. त्यांनी मला त्यांच्या व्याख्यानाला आमंत्रित केलं. ज्या शाळेस त्यांनी भेट दिली होती तेथील फोटो दाखवले तसेच चित्रफीतही दाखवली.

त्यांचे भाषण व फोटो दाखविणे संपल्यानंतर चहापानाचा कार्यक्रम होता. माझ्याशी काय बोलावे या संभ्रमात असलेल्या एका स्त्रीने मला विचारले, ''तुला येथे आमच्या देशात फार उकडत असेल नाही का?''

निरागसपणे विचारलेला त्या साध्याशा प्रश्नाने मला एवढे हेलावून सोडले. तो प्रश्न मला अपमानित करणारा वाटला नव्हता. माझ्या मातृभूमीतील लोकांविषयी वाटणारे अतीव दुःख माझ्या डोळ्यांवाटे सांडत होते. आमचे स्वतःचे सरकार आम्हाला माणूस म्हणून वागवत नव्हते; परिणामी बाहेरच्या जगातील काही लोकांनादेखील आम्ही त्यांच्यासारखीच माणसे आहोत हे कळत नव्हते. चिनी माणसाच्या जिवाला मोल नव्हते.

**चीनमधील माझे जीवन मला आठवले. माझे कुटुंबीय, माझ्या ओळखीची माणसे... सारे सारे आठवले. त्या क्षणी जगाला आपली कहाणी, आपल्या खऱ्याखुऱ्या भावना सारे सांगण्यासाठी माझा जीव तळमळू लागला. लिहिण्याच्या ऊर्मीने फिरून माझ्या जीवनात प्रवेश केला.**

तरीदेखील 'वाइल्ड स्वान्स' हे पुस्तक लिहून पूर्ण होण्यास वीस वर्षे लागली.

माझे अंतर्मन माझ्या लिहिण्याच्या इच्छेविरुद्ध बंड करीत होते. क्लेशकारक स्मृतींच्या भरत आलेल्या जखमांच्या खपल्या काढायचे धाडस मला होत नव्हते. सांस्कृतिक क्रांतीच्या हिंसक काळात (१९६६-१९७६) माझ्या कुटुंबीयांनी भोगलेले अत्याचार व दुःख अतीव होते. माझे वडील व माझी आजी यांचा दुःखद मृत्यू झाला. मला माझ्या आजीचे उपचार न केलेले दुखणे, माझ्या वडिलांची कैद, माझ्या आईचे फुटक्या काचेच्या तुकड्यांवर वाकून टेकलेले गुडघे या साऱ्या आठवणींची पुन्हा उजळणी करायची नव्हती.

१९८८ साली माझी आई लंडनला माझ्याकडे राहायला आली. तिचा चीन बाहेरच्या जगातील हा पहिलाच प्रवास होता. त्याचा मनसोक्त आनंद तिने उपभोगावा असे मला वाटत होते. तिला त्यापासून आनंद होत नसल्याचे मला दिसून आले. ती अस्वस्थ होती. तिच्या मनात काहीतरी घोळत होते. एक दिवस तिने बाजार करण्यासाठी बाहेर जायला नकार दिला आणि म्हटले, ''मला सर्वांत जास्त एकच गोष्ट करायची आहे आणि ती म्हणजे तुझ्याशी मनसोक्त गप्पा.''

त्यानंतर दररोज ती बोलत होती. आयुष्यात प्रथमच तिने मला स्वत:बद्दल, माझ्या आजीबद्दल सांगितले.

माझी आजी एका स्थानिक सैन्यातील अधिकाऱ्याची ठेवलेली बायको (कानकुबाईन) होती. माझ्या आईने वयाच्या पंधराव्या वर्षी कम्युनिस्ट गुप्त चळवळीत भाग घेतल्याचे मला कळले. त्या दोघींची आयुष्ये वेगवेगळ्या घटनांनी ओतप्रोत भरलेली होती. त्यात युद्धे, परकीय आक्रमणे, क्रांती आणि नंतर जुलूमशाही अशा खळबळीत क्लेशकारक प्रेम प्रकरणेही होती. माझ्या वडिलांवर निस्सीम प्रेम होते तरी त्यांच्याबरोबर आईला प्रचंड संघर्ष करावा लागला.

मी कामावर असताना ती घरी बसून टेपरेकॉर्डरवर बोलत राही. ब्रिटन सोडेपर्यंत तिने साठ तासांचे बोलणे टेप करून ठेवले होते. येथे, चीनमध्ये आयुष्यभर कधीही न करू शकलेली गोष्ट तिने केली. तिने आपले मन, आपले हृदय, आपली बुद्धी यांची कवाडे प्रथमच उघडली.

तिची माझ्याशी बोलायची तीव्र इच्छा मला जाणवली. तिच्यासाठी, माझे तिला जाणून घेणे महत्त्वाचे होते. मी लिहावे म्हणून उत्तेजन देत होती. गोष्टींचा साठा पुरवून, भूतकाळास सामोरे कसे जायचे ते तिने मला कृतीने दाखवून दिले. आयुष्यात अनेक दु:खे भोगून देखील ती उदास नव्हती. उलट त्यामागे मनाला उभारी देणारा सकस धागा होता.

विसाव्या शतकातील झंझावाती चीनमधील माझ्या आजीची, आईची अन् माझी कहाणी लिहिण्यास तिने मला स्फूर्ती दिली.

हे लेखन चालू असताना मी अनेकदा अश्रू ढाळले, रात्रीच्या रात्री तळमळत काढल्या. त्या वेळी मला माझ्या आयुष्यातील प्रेमस्थान गवसले नसते तर कदाचित मी चिकाटीने तग धरून राहू शकले नसते. जॉन हॅलीडेने मला आधार दिला. त्याचे मनोसामर्थ्य अन् हळुवार हृदय; ब्रिटनमधून, माझ्या दत्तक देशाकडून मला मिळालेला हा एक अनमोल खजिना आहे.

इंग्रजी भाषेत पुस्तक लिहिण्यासाठी, जॉनच्या मदतीची गरज होती. पुस्तक चांगले व्हावे अशी माझी इच्छा होती. जॉन स्वत: लेखक व इतिहासकार होता. त्याची मदत अनमोल होती. निर्णय घेण्याची त्याची क्षमता, त्याची अचूक दृष्टी, लिहिताना मी त्याच्याकडून काय अन् किती शिकले हे कितीही सांगितले तरी कमीच आहे.

'वाइल्ड स्वान्स' लिहिताना, माझी आई आणि माझा नवरा जॉन यांच्या आधाराचे वरदान मला मिळाले. पुस्तक प्रसिद्ध व्हायच्या आधी आईने लिहिले, 'कदाचित पुस्तकाचा खप होणार नाही, लोक त्याकडे लक्ष देणार नाहीत. पण तू त्यामुळे कष्टी होऊ नकोस. या पुस्तकाने आपल्या दोघींमधील भावबंध अधिकच दृढ

संरक्षणासाठी होते हे मला समजले. तिच्या शब्दांनी माझे मन भरून आले.

काहीही दबाव न आणता मला समजून घेणाऱ्या माझ्या आईच्या शब्दांनी, पुस्तकाच्या यशाविषयी वाटणारी माझी काळजी कमी केली.

हे पुस्तक यशस्वी ठरले. गेल्या बारा वर्षांत, अनेक लोकांनी प्रत्यक्ष भेटीत, पत्राने पुस्तकाची प्रशंसा केली. चेंगदूमध्ये वास्तव्य करणाऱ्या माझ्या आईला भेटायला विविध देशातील राजकारणी, प्रवासी, व्यापारी, यात्रेकरू सारे येतात. ब्रिटन, हॉलंड, थायलंड, हंगेरी व ब्राझील अशा अनेक देशांकडून तिला निमंत्रणे आली. जपानमध्ये उंच इमारतीखाली अन् चेरी ब्लॉसमच्या घोळक्यात बायका तिला थांबवून, प्रेमाने तिच्याशी बोलतात.


या साऱ्या आनंदाला एकच गालबोट लागले आहे. चीनमध्ये हे पुस्तक प्रसिद्ध करण्यास परवानगी नाही. कारण हे पुस्तक कम्युनिस्ट सत्तेला धोका पोचवणारे आहे असे त्यांचे मत आहे. वाइल्ड स्वान्स ही एक वैयक्तिक कथा आहे. परंतु ती विसाव्या शतकातील चीनमधील वस्तुस्थिती तिच्यात सांगते. दिसणारे कम्युनिस्ट पार्टीचे प्रतिबिंब उज्ज्वल नाही. आपल्या सत्तेचे समर्थन करण्यासाठी पार्टीने एकांगी इतिहास लिहिला आहे. 'वाइल्ड स्वान्स' म्हणजे माओचे आपल्याच लोकांवर जुलूमशाहीने सत्ता गाजविणारा अधिकारी हे त्याचे अस्सल रूप. आजदेखील माओचे मोठे तैलचित्र, चीनच्या राजधानीत, शहराच्या मध्यवर्ती तियानमन चौकात दिमाखाने लटकत असलेले आढळते. पूज्य म्हणून त्याचा गौरव करण्यासाठी चौकातील सिमेंटच्या भव्य अंगणापल्याड त्याचे शरीर जपून ठेवले आहे. सध्याची राजवट अजूनही माओचे मिथक शिरावर घेत आहे. कारण ते स्वत:ला माओचे वारसदार समजतात व परिणामी आपल्या अधिकारावर हक्क सांगत त्या राजवटीचे समर्थन करतात. आणि म्हणून वाइल्ड स्वान्सच्या प्रकाशनाला चीनमध्ये बंदी आहे. या पुस्तकाचे किंवा माझे नाव घेण्यास चिनी माध्यमांस मनाई आहे.

आजच्या चीनमधील जीवन बहुतेक लोकांच्या स्मृतीतील जीवनापेक्षा खूपच जास्त सुसह्य आहे. आज बरेच वैयक्तिक स्वातंत्र्य असले तरीदेखील देश संपूर्णपणे स्वतंत्र आहे असे म्हणता येणार नाही. माझ्या पुस्तकावर बंदी यायच्या आधी (१९९४ साली) एका चिनी प्रकाशकाने, माओ संबंधित लिहिलेले माझे काही शब्द खोडून हे पुस्तक सेन्सॉर बोर्डपुढे परवानगीसाठी ठेवले होते. कापलेले शब्द थोडेच होते म्हणून मी काही अटींवर त्याला मान्यता दिली होती. शेवटी कापाकापीसकट, वाइल्ड स्वान्सची प्रत चोरूनमारून चीनच्या बाजारात आणली गेली. परंतु अवैध नक्कल विकणाऱ्या चाच्यांनादेखील अजून संपूर्ण लिखाण प्रकाशित करायचे धैर्य झालेले नाही.

संपूर्ण लिखाण असलेली 'चोरलेली' एक प्रत बाजारात फिरवली गेलेली

दिसते असे मला सांगण्यात आले आहे. ही बहुधा तैवान आणि हाँगकाँगमध्ये प्रकाशित झालेल्या पुस्तकाची झेरॉक्स प्रत असावी. एकोणीसशे सत्त्याण्णव साली हाँगकाँगचे चीनमध्ये विलीनीकरण झाले. त्याचा परिणाम हाँगकाँगच्या प्रकाशकांवर झालेला नाही.

माझ्या पुस्तकावर चीनमध्ये बंदी घातली गेली असली तरी ते वाचल्याबद्दल




आगामी

# गेटिंग थिंग्ज डन

लेखक : **डेव्हिड ॲलन**
अनुवाद : **प्रशांत तळणीकर**

संपर्क आणि जबाबदाऱ्या वाढलेल्या आजच्या जगात आपल्यासमोरील परिस्थितीवर नियंत्रण मिळवण्यासाठी गतकालातील जुन्या सवयींचा उपयोग होत नाही. मग अशा वेळी काय करावे, कार्यतत्परता कशी साधावी आणि उत्पादकता व सर्जनशीलता कशी वाढवावी यांसाठी या पुस्तकात विविध क्लृप्त्या दिल्या आहेत. यातली सर्वांत कळीची आणि आजच्या काळातली अत्यावश्यक गोष्ट म्हणजे तणावमुक्ती!

या पुस्तकातले गृहीतक अगदी साधे आहे – उत्पादकता आणि ताणापासून मुक्त राहण्याची क्षमता, यांच्यामध्ये थेट संबंध असतो.

आपले मन मोकळे असेल आणि विचार सुसंघटित असतील, तरच आपण तणावमुक्त उत्पादकता साध्य करू शकतो आणि आपल्या सर्जनशील क्षमतांचा मुक्तपणे अविष्कार करू देऊ शकतो.

या पुस्तकातल्या साध्यासोप्या पद्धती वापरून पाहा, आणि कार्यस्थळी; तसेच वैयक्तिक जीवनातही नीटनेटकेपणा आणा; कार्यक्षमता आणि सर्जनशीलता वाढवा!

किंवा खासगीत त्याविषयी चर्चा केल्याबद्दल कुणावर खटला भरला गेला नाही. मला राजकीय टेहळणीखाली न ठेवता चीनमध्ये मोकळेपणाने प्रवास करण्यास मुभा आहे. पुस्तक राजकीय सत्तेस घातक ठरविले गेले असले तरी वैयक्तिकरीत्या माझ्यावर तसा शिक्का बसलेला नाही. कारण मी तशी भाषणे देत नाही, मीटिंग्ज घेत नाही की गुप्त संघटनेचे काम करीत नाही. माझ्यावर प्रसारमाध्यमाबरोबर काम करायची बंदी आहे. त्यामुळे मी केवळ सार्वजनिक आवाज नसलेली एक व्यक्ती आहे. हे पुस्तक लिहिल्याने चीनविषयीच्या माझ्या भावना अधिक खोल झाल्या. एकदा भूतकाळाशी





३ री आवृत्ती

# बारबाला

लेखिका : **वैशाली हळदणकर**

**किंमत : २२०/-रु.। पोस्टेज : ३०/-रु.**

मी स्वत:ला वेश्या समजत नव्हते. माझ्या मनाच्या कोपऱ्यात मी स्वत:ची एक प्रतिमा हळुवार जपली होती. बाहेरून मला कोणीही ओरबाडलं, रक्तबंबाळ केलं तरी त्या प्रतिमेला मी प्राणपणाने जपणार होते. ती प्रतिमा एका कलाकाराची होती. मनस्वी कलाकाराची. पण मला हे जमणार होतं का? पुरुषांना जणू माझा वास यायचा, की ही अशी बाई आहे, जिला आपण चिरडू शकतो, वापरू शकतो.

माझ्याबाबत घडूनघडून काय घडणार होतं?
काय घडायचं राहिलं होतं? जे काय घडायचं
ते घडो; पण मला दोन वेळच्या जेवणाची भ्रांत नको होती. मुलांच्या आयुष्याची नासाडी नको होती. अपेक्षा खूप मोठ्या नव्हत्या पण जे आयुष्य होतं तसंच सुरू राहिलं असतं तर मी किती काळ जिवंत राहू शकले असते?

कशा अवस्थेत जिवंत राहू शकले असते?

सामना केल्यानंतर मला सारे काही विसरून जायची गरज राहिली नाही. उलट आता चीनपासून फार दिवस दूर राहिले तर मला अस्वस्थ झाल्यासारखे वाटते. याचे कारण जॉन आणि मी दोघे मिळून माओचे चरित्र लिहीत आहोत . त्याच्याशी निगडित संशोधन करण्यासाठी मी चीनला जाते. दहा वर्षे आम्ही हा उद्योग करीत आहोत. लवकरच ते पुस्तक प्रकाशित होईल.

**माओचे चरित्र लिहिण्याचा निर्णय मी घेतला कारण ज्याने माझ्या आयुष्यावर एवढे वर्चस्व गाजवले, जगातील एकचतुर्थांश लोकसंख्या असलेल्या देशातील माझ्या अनेक देशबांधवांच्या आयुष्याचा नाश केला त्या व्यक्तीबद्दल मला कुतूहल आहे.**

स्टॅलिन व हिटलर यांच्यासारखाच आणि त्यांच्याइतकाच तोदेखील दुष्ट व क्रूर होता. त्यांच्याइतकेच माओने मानवजातीला दुखावले. तिचा घात केला. तरीसुद्धा जगाला माओची विशेष माहिती नाही. हिटलर व स्टॅलिन या दोन युरोपियन नेत्यांची जगभर नालस्ती झाली.

**माओच्या मृत्यूनंतर तीन दशकांच्या वर वर्षे लोटली. तरीसुद्धा त्याने केलेल्या पापाच्या प्रमाणात, त्याच्या नावास लागलेला कलंक अगदी पुसटसा आहे. हे अविश्वनीय साध्य तो कसे साधू शकला? जॉन व मी, आम्हा दोघांना माओच्या भोवताली असलेल्या चक्रव्यूहाची गुंतागुंत उकलायचे आव्हान साद देत घालत आहे.**

'वाइल्ड स्वान्स'ने माझा मार्ग सुकर केला. माझ्याशी बोलणाऱ्या बऱ्याच लोकांनी ते पुस्तक वाचले होते किंवा त्याविषयी ऐकले होते. पुस्तकाच्या प्रामाणिकतेबद्दल त्यांना शंका नव्हती. माओचे चरित्रदेखील तसेच सचोटीने लिहिले जाईल असा त्यांना विश्वास वाटतो. वाइल्ड स्वान्सने माझ्यासाठी अनेक आंतरराष्ट्रीय नेत्यांची दारे खुली करण्याचे काम केले आहे. जॉनसारखा सहलेखक लाभणे हे केवढे मोठे भाग्य आहे ! त्याचे अनेक भाषांवर प्रभुत्व तर आहेच, शिवाय तो म्हणजे आंतरराष्ट्रीय राजकारणाचा चालता-बोलता ज्ञानकोशच आहे. माओचे राजकारण हा त्याच्या अभ्यासाचा एक भाग होता. गेली दहा वर्षे माओबद्दलच्या माहितीचा पाठलाग करीत आम्ही जगाच्या अनेक कोपऱ्यांत भटकलो. कुठलाही सोपा मार्ग न चोखाळता, ज्यायोगे आम्हाला स्वत:च्या कामाबद्दल अभिमान वाटेल असे पुस्तक व्हावे हीच भावना त्यामागे आहे.

**— युंग चँग**

**लंडन, २००३**


◈◈◈




# परमेश्वर

## : एक सांकेतिक नाव

*होय. परमेश्वर आहे. सर्व जागरुक मने त्याच्याच ठायी एकवटलेली असतात. त्याच्याकडून काहीतरी सुसंगत व्यवस्था राबवली जाते. त्याचेच सांकेतिक नाव म्हणजे परमेश्वर*




मूळ लेखक : **मणी भौमिक**

अनुवाद : **अशोक पाध्ये**

पृष्ठे **२४८।** २५० रु. पोस्टेज २५ रु./ सभासदांना सवलतीत

# परमेश्वर म्हणजे परिपूर्ण प्रगत मानव वा प्राणी नव्हे; परमेश्वर म्हणजे एक विश्वव्यवस्थापनाची प्रक्रिया

'खरंच देव आहे का?' हा प्रश्न प्रत्येक माणसाला पडतो तसा तो या पुस्तकाचे लेखक मणी भौमिक यांना देखील लहानपणापासून पडला होता. बालपणी त्यांनी अफाट दारिद्र्य भोगले. अत्यंत हालअपेष्टांमध्ये ते जगले व अनेक अडचणींवर मात करीत ते शिक्षण घेत राहिले. पश्चिम बंगालमधील मिदनापूर येथील तामलुक खेड्यातील एका झोपडीत त्यांचा जन्म झाला. चक्रीवादळे, महापूर, दुष्काळ व गरिबी आदी समस्यांना तोंड देत त्यांचे बालपण गेले. त्यांचे वडील गुणाधार भौमिक व आई लोलिता दोघंही साधीसुदी, धर्मशील माणसं होती. वयाच्या दहाव्या वर्षीच त्यांनी वडिलांना प्रश्न विचारला, ''बाबा, आपण देव म्हणतो तो हाच आहे का?'' काय उत्तर द्यावे हे त्यांना सुचले नाही. शेवटी ते मुलाला म्हणाले, ''जाऊ दे, हा तुझा प्रांत नाही.'' त्यांच्या या टालेवाटोलवीच्या उत्तराने मणीचे समाधान झाले नाही. लेखकाने लिहिलंय, ''या वेळेपासून मी नंतर मला पडणाऱ्या प्रत्येक प्रश्नाचा विचार करीत आलो. जे जे वैज्ञानिक आविष्कार मला दिसत गेले, त्यावर विविध प्रकारे मी विचार करत गेलो. मी विज्ञान व अध्यात्म यांच्या प्रांतात घुसून एक हवीहवीशी वाटणारी दृष्टी अनुभवली.''

मणी भौमिक जेव्हा कॉलेजमधील शिक्षण घेऊ लागले तेव्हा त्यांनी ध्यान करण्याची प्राचीन विद्या शिकून घेतली. त्यांचे आईवडीलही रोज ध्यान करायचे. आई तर दिवसातून दोनदा ध्यानधारणा करायची. मणी आपल्या आईबद्दल म्हणतात, ''तिला रोजच्या कष्टमय व धकाधकीच्या जीवनामधून चार आनंदाचे क्षण मिळायचे. त्यामुळे तिला जीवनातले कष्ट सहन करणे जमून जाई. जी अमेरिकन माणसं उतावीळ आहेत, ज्यांच्या मनावर सतत ज्यादा ताण येतात, त्यांनी आजही अशी ध्यानधारणेची सवय केली तर नक्की त्यांना फायदा होईल.'' (पृ. २८)

मणी भौमिक आयुष्यात अनेक धडे शिकले. त्यासाठी ते त्यांची आजी शारदा, महात्मा गांधी व मातंगिणी हाजरा नावाच्या एका असामान्य स्त्रीचेही ऋण मानतात. या स्त्रीबद्दल ते लिहितात, ''मातंगिणीने सर्वांत महत्त्वाची एक गोष्ट माझ्या बाबतीत केली. ती म्हणजे तिने मला चिकाटीचा, जिद्दीचा गुण शिकविला. ती नेहमी म्हणायची, 'कधीही प्रयत्न थांबवू नकोस.' मी तिचे हे वाक्य एखाद्या मंत्रासारखे आठवायचो व म्हणायचो. ''मातंगिणीची गांधीजींवर अपार भक्ती होती, निष्ठा होती. त्यांच्या खेड्यात तिला 'गांधी बुरी' (गांधी बुड्डी) म्हणत. तिच्या मदतीनेच मणी भौमिक गांधीजींना भेटू शकले.

मणी भौमिक यांनी शिष्यवृत्तीच्या साहाय्याने आपले शिक्षण पूर्ण करत पदार्थ

विज्ञानात खरगपूर, आय.आय.टी. येथून पीएच. डी.ची पदवी मिळविली. त्यानंतर १९५९ मध्ये ते ‘स्लोन’ शिष्यवृत्ती मिळवून अमेरिकेतील कॅलिफोर्निया विद्यापीठात संशोधन करण्यासाठी गेले. जाताना पैशाची अडचण होती. पण त्यांच्या गावातील प्रत्येकाने मदत केली. त्यामुळेच त्यांच्या प्रवासभाड्याची रक्कम जमा झाली. अमेरिकेतले त्यांचे काम पाहून १९६८ मध्ये ‘नॉरथ्रॉप कॉर्पोरेट रिसर्च लॅबोरेटरी’ या जगप्रसिद्ध संस्थेने त्यांना आपल्याकडे काम करण्यासाठी बोलावले. तिथे भौमिक यांनी संशोधनातून जगातील अत्यंत कार्यक्षम असे पाहिले ‘एक्सायमर लेसर किरण’ तयार करण्याचे यंत्र निर्माण केले. डोळ्याचा चश्मा घालवण्याची शस्त्रक्रिया शोधून काढली. अशा या शास्त्रज्ञाने परमेश्वराचे अस्तित्व विज्ञानाच्या आधारे शोधण्याचा प्रयत्न केला. हे पुस्तक म्हणजे त्याचीच थरारक कहाणी आहे.

चारशे वर्षांपूर्वी विज्ञानाची प्रगती होऊ लागली. तोपर्यंत दैवी शक्तीचा प्रभाव जगावर सर्वत्र होता. नंतर हळूहळू माणसाचा देवावरचा विश्वास ढळू लागला. भारतात पुराणकथांमधला देवच अभिप्रेत असतो. मग तो हिंदू, ख्रिश्चन अथवा मुस्लीम असो. परमेश्वर म्हणजे काय? त्याने विश्व कसे निर्माण केले असावे? ऐहिक जगाशी त्याचा कोणता संबंध असेल? अशी परमेश्वराबद्दल चर्चा करण्याचे जे शास्त्र पश्चिमी जगात निर्माण झाले त्याला ‘थिऑलॉजी’ नाव मिळाले. पण जेव्हा आपण पुराणकथा, इतिहास, प्रचलित समजुती, धर्मविधी इत्यादीपासून परमेश्वराला दूर ठेवून; सर्व धर्म हे कसे एकच आहेत हे दाखवू लागतो, तेव्हा ते थिऑलॉजीच्या उपासकांना आवडत नाही. जर सर्वांचा देव, परमेश्वर एकच आहे तर त्यांचा विरोध का असावा?

मग भौमिकांनी जगातील काही महत्त्वाच्या धर्मांकडे आपले लक्ष वळवले.

बौद्ध धर्म, चिनी तत्त्वज्ञान, तिबेटी धर्म, झेन तत्त्वे, पाश्चात्य परंपरा, ज्यू व ख्रिश्चन, मुस्लीम धर्म आदी धर्मांची मते मांडून हे दाखवले की परमेश्वर एकच आहे. पुढे त्यांनी असेही नमूद केले आहे की, ‘‘विज्ञान व अध्यात्म यात एक अडथळा नेहमी जाणवतो. तो म्हणजे परमेश्वराला दिलेले मानवी रूप (Personification of God) पृथ्वीवरील सर्व धर्मातील प्रेषित, संत व धर्मगुरू यांनी परमेश्वराचे जे चित्र सर्वसामान्य जनतेसमोर उभे करीत आणलेले आहे तेच नेहमी ग्राह्य धरले जाते.’’ (पृ.१२९)

भौमिकांची शोधायात्रा पुढील काळातही चालू राहिली. ‘भवसागरापलिकडचे जग’ या प्रकरणात ते म्हणतात, ‘‘कॉस्मॉलॉजी हे विश्वनिर्मिती कशी झाली या प्रश्नाचे उत्तर शोधणारे शास्त्र आहे. हे जे भौतिक जग आहे, ते कसे पद्धतशीरपणे रचले गेले, याचे उत्तर यातून मिळते.’’

विसाव्या शतकाच्या मध्यानंतर विश्वाच्या या वैशिष्ट्याचे कोडे शास्त्रज्ञांनी

उलगडले. त्यांच्या म्हणण्यानुसार विश्वात जी विविध क्वांटम क्षेत्रे पसरलेली आहेत, त्यातून मूलभूत कणांची म्हणजे इलेक्ट्रॉन, प्रोटॉन, न्यूट्रॉन अशा उपअणूंची निर्मिती होते. या शोधातून पदार्थविज्ञानाची एक नवीन 'क्वांटम फिल्ड थिअरी' नावाची शाखा निर्माण झाली. त्यातून 'सर्व निर्मितीमागचा एकच उगम' हे तत्त्व जाणवले. वैज्ञानिकांचे संशोधन पुढे देखील चालू राहिले. त्यातूनच आपल्याला पदार्थ कण, रेणू, अणू, उपअणू, मूलकण ही साखळी समजली. पदार्थाचा शेवटचा मूलकण म्हणजे क्वार्क व इलेक्ट्रॉन. त्याची निर्मिती ऊर्जेपासून प्रभावक्षेत्रात होते. ही प्रभावक्षेत्रे सबंध अवकाशाला व्यापून राहिली आहेत. ही प्रभावक्षेत्रे विद्युतचुंबकीय, गुरुत्वाकर्षण अशा प्रेरणांची आहेत. त्यामुळे ऊर्जा व नैसर्गिक प्रेरणा यातूनच निर्मितीला सुरुवात होते. आपल्याला एवढे जरी समजले, तरी पुरेसे आहे असे लेखक म्हणतो.

१९६० च्या शेवटी स्टीव्हन वेईनबर्ग, अब्दुल सलाम आणि शेल्डॉन ग्लशो यांनी यापुढे जाऊन क्षीण अणुप्रेरणा व विद्युतचुंबकीय प्रेरणा यांच्यात काहीही फरक नाही हे सैद्धांतिकदृष्ट्या दाखवून दिले. या महत्त्वाच्या शोधाबद्दल तिन्ही शास्त्रज्ञांना नोबेल पुरस्कार देण्यात आला.

**'विज्ञानाचा गाभा' या प्रकरणात पुस्तकाचे सार आले आहे. ईश्वराचे ज्ञान होऊच शकणार नाही, असे मानणाऱ्या आधुनिक अज्ञेयवाद्यांच्या मते हे विश्व मुद्दाम कोणी निर्माण केले नसून ते आपोआप निर्माण झालेले आहे. त्यामुळे त्याची मोजमापाची पट्टीही आपोआपच निर्माण झाली आहे. या नैसर्गिक मोजपट्टीच्या आवाक्याचा अंदाज येण्यासाठी मानवी पेशीचे उदाहरण घ्या. आपल्या शरीराचा हा सूक्ष्म भाग; पण ही पेशी ही पेशी त्या विश्वाच्या भव्यतेत एक सूक्ष्म अणू ठरते. म्हणूनच लेखक म्हणतो की, ''आता फक्त विश्वनिर्मिती कशी झाली हे समजले की परमेश्वराच्या अस्तित्वावर काहीतरी प्रकाश पडेल अशी आशा आपण बाळगू या.''**

या पुस्तकात विज्ञानाच्या सहाय्याने विश्वाच्या जन्माची निर्मितीची प्रक्रिया मांडली आहे. अतिसूक्ष्म अशा मोहरीएवढ्या जागेतून (स्पेस) आजचे हे विश्व निर्माण झाले आहे. या भव्य विश्वाचे वय हे १३ अब्ज ७० कोटी वर्षे एवढे आहे.

एर्विन श्रेडिंजरने भारतीय वेदांचा अभ्यास केला होता. त्यातील आध्यात्मिक कल्पनांचा प्रभाव श्रेडिंजरवर असल्यामुळे त्यातूनच त्याला आपले वैज्ञानिक सिद्धांत मांडता आले. त्याने दहा वर्षे संशोधन केले. उपनिषदांमधून त्याला याबद्दलचे गूढ ज्ञान अत्यंत साध्या व सोप्या भाषेत लिहिलेले सापडले. तत् त्वम् असि म्हणजे 'तो तूच आहेस' 'सर्व विचारी जीव हे एकाच वैश्विक गोष्टीपासून निर्माण झालेले आहेत' यावर त्याचा विश्वास होता.

सध्या विश्वाचा अभ्यास करणाऱ्या शास्त्रज्ञांच्या मते, विश्वाचे वय हे सुमारे १४

अब्ज वर्षाचे आहे. एवढा अफाट कालखंड म्हणजे परमेश्वराच्या दृष्टीने एक दिवस असू शकतो. (पृ. २०२)

विश्वाचा रचनाकार कोण? या प्रश्नाचे उत्तर जसे अध्यात्मवादी शोधत असतात तसेच शास्त्रज्ञही बारकाईने शोधत असतात. परमेश्वराचा शोध घेणारी सारी तत्त्वज्ञाने अंदाज व परिमाणे यांच्या पलिकडे जाऊन मानवी मनाने विश्वाचा निर्माता परमेश्वर आहे यावर श्रद्धा ठेवली आहे. गेली हजारो युगे मानवप्राणी उपसना करीत आला आहे आणि तोच निर्माता आपला तारणहार आहे असे मानत आला आहे.

**मणी भौमिक स्वतः असे मानतात, ''परमेश्वर ही एक अमूर्त अशी शक्ती संपूर्ण विश्वात चराचरात भरलेली आहे. आपल्या सर्वांची मने त्या अमूर्त शक्तीशी बद्ध झाली आहेत. तिच्याशी सतत निगडित आहेत आणि ही सुद्धा एक चांगली गोष्ट आहे.''**

सध्या जगभरात ध्यानधारणा ही धर्माशी पक्की जोडलेली आहे. ती धर्मापासून वेगळी करता येत नाही. कारण धर्म म्हणजे नुसते काही सिद्धांत नव्हते. धर्म हा अनुभवाने जाणून घेण्याचा प्रकार आहे. त्यातील ध्यानधारणा हा अनुभव तर धर्माचा गाभा आहे. जगातील सर्व पंथातील बुजुर्ग मंडळींनी ध्यानधारणा करताना अवकाश व काळ यात काहीतरी उलथापालथ होते, हे अनुभवले आहे.

माणसाच्या मनावर व मेंदूवर ध्यानामुळे निश्चितच परिणाम होतो ही गोष्ट ॲलरिक अरेनान्डर व रॉजर थॉम्पसन या दोघा तज्ज्ञांनी सांगितली आहे. थॉम्पसन तर म्हणतो, ''ध्यानधारणेमध्ये व्यक्तीला जे जाणवते ते त्याचे स्वतःचे नसतेच. ते सर्वस्वी व्यक्तिनिरपेक्ष असते.''

दलाई लामा म्हणतात, ''आपण नेहमी अशी आध्यात्मिक दृष्टी धारण केली पाहिजे की त्या दृष्टीला विज्ञानातील सत्ये मान्य असतील.'' थोडक्यात विज्ञान व अध्यात्म या दोन्ही गोष्टी एकमेकांना संमती देणाऱ्या आहेत असे लेखक म्हणतो.

ध्यानधारणेसाठी आवश्यक ती मनाची स्थिती, विशिष्ट आहार, विशिष्ट वेळ याबद्दलही माहिती दिलेली आहे. मानसशास्त्रज्ञ डॉ. जेफ्री आणि पदार्थ वैज्ञानिक हेन्री टॉप यांनी ध्यानधारणा करताना मेंदूत काय काय घडते, यावर खूप संशोधन केले आहे. ध्यानधारणा करण्यात जसजसे तुम्ही प्रवीण व्हाल, तसे तुम्हाला मेंदूच्या डाव्या व उजव्या भागात काय चालले आहे ते नेमके समजू शकेल.


शेवटी भौमिक यांनी परमेश्वराच्या अस्तित्वाबद्दल म्हटले आहे, ''विश्वामध्ये एक विशाल असे जागरूक मन पसरलेले आहे. जेव्हा आपण आपल्या मनाची क्षमता ध्यानातून आजमावून पाहत असतो, तेव्हा या विशाल मनाशी अनुकूल असे स्पंदन आपले मन करू लागते असे माझे मत आहे किंवा माझा तसा दावा आहे. सर्व अस्तित्वामागे असलेले जे सामर्थ्य आहे ते गूढ रीतीने सर्व विश्वात अंतराळाच्या पायात भरून राहिलेले आहे. आपण ध्यानातून त्या सामर्थ्याशी संपर्क साधत असतो.

हे सामर्थ्य त्या एकमेव स्त्रोतामध्ये आहे. तो जो काही गूढ असा मूलस्त्रोत आहे, त्याचेच ते सामर्थ्य आहे. त्याच्याकडून काहीतरी सुसंगत व्यवस्था राबविली जाते. त्या व्यवस्थेत अन्य साऱ्या व्यवस्था समाविष्ट आहेत. त्यातच सारी प्रेरणाबले एकत्र येतात. सर्व जागरूक मने एकवटतात आणि मी असे मानतो की तो जो मूलस्त्रोत आहे, त्याचेच सांकेतिक नाव 'परमेश्वर' असे आहे.''

अशा रीतीने या पुस्तकात सर्व प्रकारच्या तत्त्वज्ञानांचा ऊहापोह करून भौमिक हे परमेश्वराचे अस्तित्व सिद्ध करतात. 'कोड नेम गॉड' हे पुस्तक अमेरिकेत भरपूर गाजते आहे. मणीलाल भौमिक यांनी विज्ञान व अध्यात्म यांना एकत्र आणून आपली आध्यात्मिक शोधयात्रा पूर्ण केली आहे.

**- डॉ. निर्मला सारडा, पुणे**
मो. ९५०३६०८४४५

◈ ◈ ◈


**६ वी आवृत्ती**

**भुताचा जन्म**

**द. मा. मिरासदार**

**किंमत : १३०/-रु.। पोस्टेज : २५/-रु.**

...ही भुते कुठेही असू शकतात. साधारणपणे सांगायचे म्हणजे ती कुठल्याही पडक्या वाड्यात, विहिरीत, मसणवटीत असतातच. विशेषत: विहिरीत हडळ असते आणि ती सुंदर बाईचे रूप घेऊन इकडे-तिकडे हिंडत असते. पिंपळावर तर मुंजा हटकून असतो आणि वड, पिंपरणी, लिंब असल्या झाडांवरही भुते माकडासारखी गर्दी करून बसलेली असतात.
दिवसा ती काही करीत नसली, तरी रात्रीच्या वेळी त्यांना उजाडते. त्या वेळी मात्र ती कुठेही आणि कुणाच्याही वेषात भेटतात. त्यांचे पाय उलटे असतात असे म्हणतात; पण तसे काही त्यांच्यावर बंधनच आहे असे नाही. अमावस्येच्या रात्री तर ती हमखास फिरायला निघालेली असतात. अशा वेळी त्यांच्यासंबंधी काहीही बोलणे अगर त्यांच्या दृष्टीस पडणे, हे धोक्याचे असते.

English Book



**Rei Kimura**

is a lawyer with a passion for writing about unique events & personalities. She has adopted an interesting style of creating stories around true event & the lives of real people in a number of her books, believing that is the best way of making hidden historical events & people come alive for 21st century readers.

# Book Review




## Japanese Orchid

**Rei Kimura**

**OF FAMILY AND SORDID SECRETS...**

'The invincible shall fall'... This famous phrase sounds death-knell for the armada-esque behemoths who spend their lives building up their empires. And then there are some who want to take a shortcut to success by exploiting this very weakness of the behemoths, who in turn succumb to absurd ploys to protect their empires from crumbling. Tetsuyo Akinicho would have done just the same; had it not been for some able help and a strange quirk of fate that intervened in time to buffer his fall.

Tetsuyo Akinicho is a DNA mogul, the Founder-Chairman of 'Genometrics Inc' and the deeply-anguished protagonist of Rei Kimura's novel titled 'Japanese Orchid'. A highly successful Japanese entrepreneur who goes onto conquer the world with his knowledge, Akinicho is ultra-keen on keeping his name and image spotless clean. Having built his empire from a scratch and sans foul-play, Akinicho is understandably paranoid about any scandal threatening to rock his bed of roses. Unfortunately, his worst fears come true when an unnamed blackmailer

decides to dig up a fragment of Akinicho's sordid family history and threatens to taint his image around the world. In an ironical twist of fate, the global giant of genes is threatened to be tainted to some scandal linked to his own genealogy! The scandal pertains to the identity of Akinicho's real mother. While he grows up thinking that Midori is his real mother, Akinicho's father reveals to him in his last days that the boy's real mother was actually a prostitute serving during the war in Singapore. Akinicho's father tells him that while he was deeply in love with the prostitute (who is referred to as the "Japanese Orchid' in keeping with local protocol), he couldn't bring her back to Japan due to the constraints of war. However, he was allowed to bring back the son she bore him – for he was considered of Japanese descent - and thus it was that Tetsuyo grew up with his father, unbeknownst of his real mother.

Unfortunately, this deep dark family secret falls in the hands of a conniving blackmailer who gets greedy for fast money by trying to exploit this nugget of precious information. After spending some initial days in despair over how did this transpire, Akinicho garners his resources to fight away this scavenger of his past. On the behest of his trusted lawyer Akira Tanaka, he hires a private investigator Paul Griffin who travels to Japan to get to the root of this problem. There, Griffin ties up with Mayumi Onodera, a historian-cum-genealogy expert, to supplement his search. Initial research leads the duo to Singapore from where the origins of Tetsuyo's birth stem. They are soon joined by Akinicho and Akira; and thereon begin a series of fascinating brainstorming sessions leading to a layer-by-layer unravelling of startling secrets and revelations that have the protagonist, as well as, us readers in thrall!


# New Books





The Women Before Me




Mr Two Bomb




The Art Of Ageing




The Sky Is Changing

Yet again, Rei Kimura combines her deep study of history and skill of legalese to weave a plot that keeps the reader entranced till he/she uncovers the nail-biting suspense. Very few thrillers manage to stay mum on the plot till the end. 'Japanese Orchid' is one such book that gives nothing away till the climax and rather engages the reader in a battle of wits as the story flows from USA to Japan to Singapore. While the plot does seem to go a bit sluggish in the interim with repetitive references to Griffin and Mayumi's gameplan; one tends to gloss over this inadequacy due to the brilliance of plot itself. Rei Kimura's well-segregated descriptions of the three countries, as well as her clear vision about the war-time conditions in Singapore, deserve special mention for lending the right terrain(s) for this story. In keeping with her sensitive aptitude for portraying human relations, Rei also manages to touch upon the delicate subtexts in the friendship between Akinicho and Akira; or the seemingly budding closeness between Griffin and Mayumi. But to her credit, she refrains from dragging this historically-oriented story into the portals of romance; thus creating a good balance between emotions and practicality.


While any further hints about who is the mastermind behind this blackmail and how the team busts his/her gameplan would tantamount to giving away the suspense, the 'Japanese Orchid' is indeed a must-read for being yet another of Rei Kimura's authoritative works adeptly weaving the history and the present.

- Reshma S. Kulkarni

# Backlist




The Gift




Travelling To Infinity: My Life With Stephen




Untouchable




Awa Maru




# अनुवादक
# विजय देवधर

विजय देवधर सर, तुमची मूर्ती अजूनही समोर उभी आहे. तुमचे स्मरण दाटून आले आहे.

सडसडीत बांधा, उंच उभी देहयष्टी, ज्ञानतेजाने चमकणारे टपोरे डोळे, उभट चेहरा, धारदार सरळ नाक, चेहऱ्यावरल्या मिष्कील छटा, काळेभोर दाट केस, टापटीप नीटनेटके कपडे आणि हातात शाईचे मोठा पेन... त्यातून झरझर उतरणाऱ्या अक्षरमोत्यांच्या माळा... तुमचं ते धबधब्यासारखं भरभरून बोलणं, निर्झरासारखं खळाळून हसणं नि दाद देताना, ''क्या बात हैं'' असं म्हणणं अजून कानात गुंजतंय...

विल्यम फोरसिथ, हिचकॉक, सिडने शेल्डन हे सर्व मराठी साहित्य प्रांगणात विहार करण्यासाठी तुमच्या आपुलकीच्या पंखांची साथ घेत होते...

बेल्जियम कट असलेला सुंदर हिरा नि शुद्ध बसेरा मोती तुमच्या आवडीचा!

संगीत म्हणजे तुमचा जीव की प्राण. जुनी गाणी, त्यांचं पिक्चराझेशन, त्या गाण्यातले शब्द, गायक-गायकीची आवाज, त्यात वाजणाऱ्या निरनिराळ्या वाद्यांचे तुकडे... किती रसपूर्ण पद्धतीनं तुम्ही आस्वाद घ्यायचा नि इतरांनाही द्यायचा... सी. रामचंद्रना प्रत्यक्ष भेटून गप्पा मारल्याशिवाय तुम्हाला चैन पडत नसे.

सूक्ष्म निरीक्षण, प्रत्येक बारकाव्यानिशी, तपशीलवार अचूक अशी माहिती नि साध्यासुध्या गोष्टीतूनही खुलवून सांगण्याची तुमची हातोटी... शांत, धीरगंभीर तरीही गोष्टीवेल्हाळ... एखादी कल्पना डोक्यात यायचा अवकाश की ती मूर्त स्वरूपात आणण्यासाठीचा तुमचा उत्साह - सगळ्यांना कार्यप्रवृत्त करायचा...

तुम्हांला आवडणाऱ्या दुर्मीळ इंग्रजी-हिंदी सिनेमांच्या डीव्हीडीज गाण्यांच्या रेकॉर्डस् आवर्जून पाठवून देणारा मुंबईचा तरुण चाहता हराळे...

तुमच्यावर निस्सीम प्रेम करणारे कोकणातले प्रेमळ आजोबा. तुमच्या अनुवादित पुस्तकांचे प्रवासात हमखास वाचन करणारे बाबूजी- सुधीर फडके, तुमचे कौतुक करणारे पु. भा. भावे, कितीकिती तरी अनमोल माणसं तुम्ही आपल्या गुणांनी जमा

केलीत... मस्त कलंदर शायर मदहोश यांच्याबरोबरची तुमची सजलेली ती मैफल... प्रमोद मांडेनी तुमच्याशी माझी घालून दिलेली रेशीम-गाठभेट. पायावर डोकं ठेवण्याआधीच तुम्ही उचलून घेऊन स्नेहभराने मारलेली मिठी.

विद्यार्थीदशेत जंगलात भटकण्याचा लागलेला छंद तुमचा बेडरपणा दाखवितो... फोटोग्राफीची आवड, पर्यटन. प्रत्येक गोष्टीत रस घेण्याची रसिक वृत्ती तुमच्यात होती.

सुकन्या वर्षाकडे अमेरिकेतलं तुमचं सहा महिन्याचं वास्तव्य नि तिथल्या सांगितलेल्या आठवणी अजूनही ताज्या आहेत... जावईबापूंचा सार्थ अभिमान नि नातवाचं कौतुक तुमच्याकडूनच ऐकण्यात मजा... वहिनींबद्दलचं तुमचं प्रेम, मखमली हृदयपेटीत जपलेलं...

तुमचा सगळ्यात वीक पाईट, हळवा कोपरा म्हणजे लाडकी रिमा... तिच्या प्रत्येक गोष्टीसाठी तुम्ही केलेली धडपड, तिच्या प्रत्येक गोष्टीचं केलेलं कौतुक, तिला दिलेलं प्रोत्साहन म्हणजे प्रेमळ पित्याचं काळीजच!!

अपार मेहनतीने, मोठ्या जिद्दीने, कणखरपणाने, एका तत्त्वनिष्ठ आचरणाने तुम्ही आयुष्य घडवलेत, एन.सी.एल. सारख्या मोठ्या सरकारी नोकरीत नियमबद्धपणाने सेवा करीत मराठी साहित्यविश्वही खुलवलेत...

आपल्या सहवासात येणाऱ्या प्रत्येकाला तुम्ही प्रेरणा दिलीत. वेळोवेळी पाठीवर कौतुकाची थाप मारून प्रोत्साहित केलंत... योग्य मार्गदर्शनासाठी तत्पर राहिलात... सगळ्यात महत्त्वाचं म्हणजे तुम्ही अगदी- ‘मुलामाणसांत माझा विठ्ठल साजिरा’ असे होऊन राहिलात!! सगळ्यांना आनंद वाटला नि आनंदच घेतला, खऱ्या अर्थाने आनंदयात्री ठरलात... आपल्या सुखदु:खाचे अवडंबर न माजवता, यत्किंचितही त्रास न देता सहज म्हणून निघून गेलात... चूटपूट लावून, हुरहुर ठेवून... सत्यात उतरणाऱ्या स्वप्नासारखे...

पण सर! जरा घाईच केली तुम्ही!! कितीतरी गोष्टी आम्हां सगळ्यांबरोबर तुम्ही सजवणार होतात... ‘चलो ये भी सही’ या तुमच्याच शब्दांचा आधार घेत मोठ्या आशेने, तुम्ही आमच्याबरोबर सतत आहातच या विश्वासानं आम्ही चालत राहू... सर!

तुम्ही ही सीमा ओलांडून अलगद गेलात खरे... पण आमच्या मनाच्या गाभाऱ्यात कायम आहात...

झोकदार सही करणारे नावाप्रमाणेच प्रत्येक गोष्टीत विजय मिळविणारे तुम्ही या धरेवरचे आमचे आदर्शच होता! विजय देवधर सर.

शतश: नमस्कार .

**- विनोद पावशे**

◈ ◈ ◈




### नायजेरियन लेखक चिनू अचबी यांचे निधन



आंतरराष्ट्रीय ख्यातीचे नायजेरियाचे लेखक, कवी आणि समीक्षक चिनू अचबी यांचे दीर्घ आजाराने निधन झाले. ते ८२ वर्षांचे होते.

अचबी यांनी अफ्रिकेच्या आधुनिक साहित्यात 'थिंग्ज फॉल अपार्ट' च्या रूपाने ठसा उमटवला. या पुस्तकाचा ५० भाषांत अनुवाद झाला असून, एक कोटी २० लाखापेक्षाही अधिक प्रति विकल्या गेल्या आहेत. 'अचबी यांनी आफ्रिकेला उर्वरित सर्व जगाच्या समोर आणले.' अशा शब्दात नेल्सन मंडेला यांनी त्यांचा गौरव केला होता. २००७चे बुकर पारितोषिक त्यांना मिळाले होते. 'ए मॅन ऑफ द पीपल' ही त्यांची पहिलीच कादंबरी यशस्वी ठरली होती.

### प्रख्यात सिनेसमीक्षक रॉजर एबर्ट



चित्रपट समीक्षणाला वेगळे परिमाण प्राप्त करून देणारे,'थम्स अप, थम्स डाऊन' या संकल्पना रूढ करणारे आणि हॉलीवूड चित्रपटांचा गेल्या पाच दशकांहून अधिक काळअव्याहत लिहिणारे, पुलित्झर पारितोषिक विजेते चित्रसमीक्षक, रॉजर एबर्ट (७०) यांचे प्रदीर्घ आजाराने निधन झाले. 'शिकागो सन टाइम्स' या वृत्तपत्रामध्ये गेली ४५ वर्ष समीक्षण करीत असलेले रॉजर एबर्ट यांनी सलग तीन दशके जेन सिस्कल यांच्यासोबत


चित्रसमीक्षणाचा टीव्हीवर राबविलेला कार्यक्रम प्रदीर्घ काळ लोकप्रिय असलेला सिनेसमीक्षणाचा शो म्हणून ओळखला जातो. जगभरातील टीव्ही शोच्या देशीय आवृत्या करून 'एबर्ट' यांच्या 'सामान्य माणसाच्या नजरेतून' चित्रपट का व कसा पाहावा, या संकल्पनेला विस्तारत नेले. गेली काही वर्ष विविध आजारांनी त्यांना ग्रासले होते व विविध शस्त्रक्रियांनी जर्जर केले होते. घशाच्या विकारामुळे त्यांचा आवाजही गेल्या काही वर्षात मूक झाला होता, मात्र तसेही त्यांची समीक्षणे थांबलेली नव्हती. मृत्यूच्या दोन दिवसांपूर्वीच त्यांनी त्यांचा ब्लॉग नव्या समीक्षणासह 'अपडेट' केला होता.

एबर्ट यांच्या मृत्यूने अमेरिकेसह जगभरातील टीव्ही वाहिन्या आणि रेडिओ सेवा, ऑनलाइन वृत्त संकेतस्थळे यांनी त्यांना श्रद्धांजली वाहिली. गेल्या पन्नास वर्षातील हॉलीवूड चित्रपटांचा चालता बोलता कोश म्हणून त्यांचा ब्लॉग ओळखला जात असल्याने एबर्ट यांचा मोठा वाहता वर्ग आहे. त्यांच्या मृत्यूबाबात अमेरिकी अध्यक्ष बराक ओबामा यांनी शोक व्यक्त केला. अमेरिका व शिकागोमधील लोकांच्या अनेक पिढ्यांसाठी रॉजर एबर्ट म्हणजेच 'चित्रपट' असल्याचे त्यांनी म्हटले. हॉलीवूड, तेथील सेलिब्रेटी, अमेरिकी मासिके, साप्ताहिके, टीव्ही वाहिन्या आदी सर्वांनी त्यांना श्रद्धांजली वहिली.

संपूर्ण आयुष्यभर चित्रपट समीक्षा केलेल्या एबर्ट यांनी चित्रपट समीक्षणाचा इतिहास घडविला. सिनेसमीक्षण, विश्लेषणाची १७ पुस्तके, स्पेशल नेटवर्किंग साइट्सवर त्यांचे लेखन सातत्याने झळकत राहिले, जुन्यासोबत नव्या पिढीची मानसिकता जपणारा समीक्षक म्हणून त्यांची ओळख होती. त्यांच्या ब्लॉगला राष्ट्रीय पुरस्कार मिळाला असून, जगभरातील जुन्या नव्या हॉलीवूड अभ्यासकांसाठी त्यांचा ब्लॉग संदर्भ सेवेचे काम करीत आहे. शिकागो विद्यापीठामध्ये ते चित्रपट विषय शिकवीत होते. १९४२ साली जन्मलेल्या एबर्ट यांनी मुक्त पत्रकारितेपासून लिखाणाला सुरवात केली. इंग्रजी विषयात डॉक्टरेट मिळाल्यानंतर त्यांनी शिकवण्या बरोबर 'सन टाइम्स' मध्ये सिनेसमीक्षण लिहिण्यास आरंभ केला. विद्वत्ताप्रचुर भाषा न वापरता, विविधांगी माहितीपूरक समीक्षणांमुळे त्यांची चित्रसमीक्षणे लोकप्रिय झाली, चित्रपट लिखाणासाठी पुलित्झर पारितोषिक मिळविणारे ते पहिले सिनेसमीक्षक ठरले.

### ❧ ज्येष्ठ इतिहास संशोधक प्र. रा. अहिरराव


पिंपरी चिंचवड इतिहास संशोधन केंद्राचे संस्थापक व ज्येष्ठ इतिहास संशोधक प्र. रा. तथा प्रतापराव रामराव अहिरराव (वय ७४) यांचे काळेवाडी येथे राहत्या घरी निधन झाले. त्यांच्या मागे पत्नी, तीन मुलगे, सुना व नातवंडे असा परिवार आहे. पिंपरी-चिंचवड महापालिका शिक्षण मंडळाचे माजी उपाध्यक्ष माणिकराव अहिरराव



हे त्यांचे बंधू व डॉ. श्याम अहिरराव व शेखर अहिरराव हे त्यांचे पुत्र होत.

पुण्याच्या भांडारकर प्राच्यविद्या संशोधन संस्थेच्या संचालक मंडळावर ते दोनदा निवडून आले होते. औद्योगिकनगरीच्या इतिहासाचे जतन होण्याच्या उद्देशाने त्यांनी पिंपरी-चिंचवड इतिहास संशोधन केंद्र स्थापन केले होते. कासारवाडी येथे संदर्भ ग्रंथालय उभे करण्यात त्यांचा मोलाचा वाटा होता. आपला संग्रह त्यांनी संदर्भ ग्रंथालयासाठी दिला होता. त्यांनी सुमारे दहा हजार गणेश मूर्ती तसेच पूजेच्या साहित्याचा संग्रह केला होता.

### ꣸ गायक, संगीतकार नाना रानडे




संगीतकार आणि गायक त्र्यंबक नरसिंह ऊर्फ नाना रानडे (वय ९७) यांचे निधन झाले. नवव्या वर्षापासूनच त्यांनी गाण्याचे कार्यक्रम केले. 'किती हंसाल' या वसंत जोगळेकर दिग्दर्शित चित्रपटातील दोन गाणी त्यांनी गायली होती. बालगंधर्व आणि मा. कृष्णराव यांच्या गायकीचा पगडा त्यांच्यावर होता. नानांनी चाली दिलेल्या 'आनंदब्रह्म' आणि 'हरि नाम वेली' (गायक : शौनक अभिषेकी) या दोन सीडी प्रकाशित झाल्या आहेत. त्यांच्या पश्चात मुलगा (मोहन रानडे), मुलगी (प्रतिभा भिडे), सून, जावई, नातवंडे असा परिवार आहे.

### ꣸ श्यामला घारपुरे



'चिकन सूप' या मालिकेतील २ पुस्तकांचा अनुवाद करणाऱ्या श्रीमती श्यामला घारपुरे (वय ७९) यांचे २२ एप्रिल रोजी निधन झाले. त्यांचा जन्म आर्वी, जि. वर्धा येथे ३१ ऑगस्टला झाला. बी.ए. ; बी. एड ; मॉंटेसरी ट्रेंड होऊन त्यांनी शिशुविहार, मुंबई येथे बालवाडीचे काम केले. नंतर स्वतःचे मॉंटेसरी स्कूल व पाळणाघर काढले. त्यांनी 'तीळ, तांदूळ मागले दार पुढचे दार' या सदरातून त्यांनी ललित लेखन केले. त्यांना प्रवासाची आवड होती. 'चिकन सूप'ने त्यांच्या लेखनावर समाधानाचा कळस चढवला.

## ६० प्रभाकर पुराणिक



ज्येष्ठ बालसाहित्यिक व पत्रकार प्रभाकर पुराणिक यांचे मार्च मध्ये निधन झाले. त्यांचा जन्म नागपुरात ६ ऑगस्ट १९३५ रोजी झाला. त्यांनी सुरवातीला नागपुरातील सोमलवार हायस्कूलमध्ये शिक्षक म्हणून काम केले. नंतर ते पत्रकारितेत आले. वार्ताहर ते मुख्य संपादक असा त्यांचा प्रवास झाला. ४३ वर्षे ते पत्रकारितेच्या क्षेत्रात होते. पत्रकारिता उपयोजित पाहिजे, ही त्यांची भूमिका असल्याने त्यांनी पश्चिम विदर्भातील खारपाणपट्ट्यावर लाँग मार्च काढला. पत्रकारितेतून लोकसंपर्क जपताना लेखनही झाले. 'रानफुल' हे त्यांचे पहिले नाटक. त्यानंतर सोन्याचा रथ, ऊस डोंगा परी, ऐका हो ऐका, संगे गोपाळांचा मेळा, अडकित जाऊ खिडकीत जाऊ ही बालनाट्ये त्यांनी लिहिली 'फोकालोजी' हा बालकथासंग्रह लिहिला. या साऱ्यांना राज्य सरकारचा वाङ्‌मय पुरस्कार मिळाला.

मधुवाणी, नचिकेता, म्हशीला चावलं कुत्रं, इंदा बाजाची गोष्ट, एक होता मुका अशी गंभीर आणि विनोदी ४५ पुस्तके त्यांनी लिहिली. पळस, सागरपान, निशापक्षी या त्यांच्या मोठ्यांसाठीच्या कादंबऱ्या. नागपूर आकाशवाणीसाठी त्यांनी श्रुतिकाही लिहिल्या. लिहिता लिहिता ते दिग्दर्शकही झाले. प्रभाकर सिरास, प्रभाकर धोटे व प्रभाकर पुराणिक या तीन प्रभाकरांनी १९६८ मध्ये नागपुरात 'लिटिल थिएटर' ची स्थापना केली, या संस्थेने 'राजा करतो शिकार वाघाची, 'लिटिलपुरचा टिंगटाँग राजा' ही नाटके बसविली. त्यांचे दिग्दर्शन पुराणिकांनी केले.

ज्येष्ठ नाटककार महेश एलकुंचवार यांचे पहिले नाटक 'रुद्रवर्षा' हे दिग्दर्शित करून रंगमंचावर आणले. २० नाटकांचे त्यांनी दिग्दर्शन केले. १९७८ मध्ये प्राचार्य राम शेवाळकर यांच्या पुढाकाराने त्यांनी स्त्रीलेखिका चळवळीसाठी 'अभिव्यक्ती' या संस्थेची स्थापना केली. 'बालरंजन' या संस्थेला जागा मिळवून दिली. विदर्भ साहित्य संघाच्या चौथ्या बालसाहित्य संमेलनाचे अध्यक्षपद त्यांनी भूषविले. १९९८ मध्ये झालेल्या अखिल भारतीय बाल– कुमार साहित्य संमेलनाचे ते अध्यक्ष होते. 'बालकांमधील संवेदनशक्ती अधिकाधिक स्पंदनशील करीत राहणे हे बालसाहित्य निर्मितीचे मूलभूत सामर्थ्य आहे. मनातल्या अर्थाचा अणि भावभावनांचा सारथेंब म्हणजे शब्द, परंतु अलीकडे शब्दांचा बोलण्यात व लिहिण्यात अतिशय हलगर्जीपणाने वापर होताना दिसतो. मराठीतील चांगले विविधार्थी शब्द बालकानांवर पडू द्या, असे ते नेहमी म्हणत.

◈ ◈ ◈

# बालनगरी

## ★ खेळणी जागी होतात तेव्हा ★

### हॅन्स अँडरसनची एक मजेदार कथा

मुलांच्या खोलीत खेळण्यांची ही झिम्मड उडाली होती. कपाटाच्या वर ठेवलेली होती बचत-पेटी; ती होती मातीची बनविलेली; आणि तिचा आकार होता डुकरासारखा. डुकराच्या पाठीवर होती एक खांच; आणि ती खांच होती चाकूने वाढविलेली, त्यामुळे लहानसहान नाणीच नव्हे तर नोटासुद्धा डुकराच्या पोकळ पोटात टाकता येत असत. आधीच पैसे, पावल्या अन् अधेल्या यांनी डुकराचे पोट भरलेले होते. तशांतच आणखी दोन नोटा सारण्यात आल्या होत्या. त्यामुळे आता ती डुकराच्या आकाराची बचतपेटी अगदी पूर्ण भरून गेली होती; हलवली तरी अजिबात खुळखुळत नव्हती. यापरते मोठे बचत-पेटीचे दुसरे भाग्य ते काय असणार? त्यामुळे ती मोठ्या दिमाखाने, ऐटीने कपाटाच्या अगदी वर उभी राहून, खोलींतल्या इतर सगळ्या खेळण्यांकडे तुच्छतेने पाहात होती. ''मी तुम्हां सगळ्या खेळण्यांना विकत घेऊ शकेन, आहे माहीत?'' मनातल्या मनात ती म्हणत होती, ''बघा, पैशांनी कसे माझे पोट पूर्ण भरलेय ते.''

पण इतर खेळण्यांनाही स्वत:बद्दल असाच दिमाख वाटत होता; मग त्यांनी तो बोलून दाखवला काय अन् न दाखवला काय–सारखेच. कपाटाचा दरवाजा उघडा होता; आणि आतून डोकावून बघत होती ती एक मोठी थोरली बाहुली. जरा म्हातारीच दिसत होती ती; पण तिची मान मात्र अगदी ताठ होती. ती म्हणत होती, ''काय रे, आपण माणसांप्रमाणे खेळू या का?... किती मज्जा येईल, नाही?''

ही तिची सूचना ऐकताच सगळ्या खेळण्यांत एकच गडबड सुरू झाली. अगदी भिंतीवर टांगलेल्या तसबिरींनी देखील आपले तोंड वळवले. त्यांना माहीत होते की आपल्याला सुद्धा पाठीमागचा भाग आहे. हो, बाबागाडीला देखील त्यातून वगळण्यात आले नाही. ती सगळ्यांपेक्षा मोठी असली आणि करमणुकीपेक्षा इतर कामांसाठीच जास्त उपयुक्त असली म्हणून काय झाल?

''प्रत्येक वस्तू ही आपापल्या परीने चांगलीच असते,'' ती बाबागाडी अगदी

आजीबाईंच्या थाटांत बोलत होती, ''आपण सगळे एकसारखे कसे असणार? सर्वांनीच केवळ करमणूक करून कसे चालेल? कामे करणारेही हवेतच ना!''

पण त्या बचत-पेटीला मात्र तेवढा चिठ्ठीद्वारे निरोप देण्यात आला. ती इतकी उंचावर उभी होती की तिला आपले बोलणे एकू जाईलच अशी खोलीतल्या इतर खेळण्यांना खात्री वाटत नव्हती. पण तिने काही त्या चिठ्ठीचे उत्तर पाठवले नाही; एवढेच नव्हे तर ती खालीदेखील गेली नाही. वरून सगळे काही दिसतच होते की तिला!

कळसूत्री बाहुल्यांची पिटुकली नाटकमंडळी मग आपल्या कार्यक्रमाला सुरुवात करायला निघली; त्या बचत-पेटीला माहीत होते की ही मंडळी आता आधी बैठक घेऊन भाषणे ठोकतील; आणि मग कळसूत्री बाहुल्या विनोदी नाटक करून सर्वांना पोट भरून हसवतील. त्यानंतर होईल चहापानाचा कार्यक्रम आणि नेमके तसेच झाले.

लुटपुट्या घोड्याने रेसच्या घोड्यांना कसे शिकवून तयार करतात याची माहिती रंगवून सांगितली.

बाबागाडीने आगगाडीचे रूळ आणि वाफेचे एंजिन या विषयावर व्याख्यान दिले.

प्रत्येकजण आपापल्या माहितीच्या विषयावर बोलत होता; त्यामुळे त्याला आधिकारवाणीने सर्व माहिती देता येत असे.

घड्याळाने राजकारणावर भाषण ठोकले– टिक्‌टिक. आपल्याला दिवसाची नेमकी वेळ कळते असे ते म्हणाले. पण इतरांचे मत पडले की नाटक पाहणाऱ्यांचे हसून हसून पोट दुखविणारे विनोदी नाटक हवे.

सगळ्या प्रेक्षकांना विनंती करण्यात आली की त्यांनी टाळ्या वाजवाव्या, खुळखुळावे वा करकरावे. आपली करमणूक होत आहे हे दाखविण्यासाठी काहीतरी करावे. तेव्हा चाबूक म्हणाला, ''मी म्हाताऱ्या कोताऱ्यांसाठी कधी सप्प सप्प वाजत नाही; केवळ तरुण, अविवाहितांसाठीच वाजतो.'' तर बंदूक म्हणाली, ''मी मात्र सर्वांसाठी खटका दाबून खटखट करते.''

ते नाटक चांगल्या रीतीने पार पडले. आता सर्व नटांचे रंगविलेले चेहरे प्रेक्षकांकडे होते. त्या बाहुलीची ताठ मान तर हसून हसून पार वाकडी झाली; आणि कपाटावरच्या त्या बचतपेटीलाही वाटले की आपणही काहीतरी करून दाखवून या सर्वांना थक्क केले पाहिजे.

ती ते नाटक पाहताना इतकी गुंग झाली होती की हळूहळू पुढे पुढे सरकत होती.

तो सगळा कार्यक्रम इतका व्यवस्थित पार पडला की चहापानाची कोणाला आठवणही झाली नाही; आणि जरी ती खेळणी माणसांचे अनुकरण करायला निघाली

होती तरी त्यात कोठे स्पर्धा वा ढकलाढकल नव्हती; कारण ते सगळे खेळातच चाललेले होते. प्रत्येकजण आपल्याच विचारांत दंग होता.

बचतपेटीही आपल्या त्या कल्पनेचाच विचार करीत होती. काहीतरी करून दाखविण्याला हीच वेळ योग्य आहे असे तिला वाटले, आणि—

... खळ्ळ्ळ्खळ् ... खन्न्खन्

ती खाली जमिनीवर पडली होती– तुकडे तुकडे होऊन, आणि तिच्यांतली सगळी नाणी इकडे तिकडे पसरली होती. ती खणखणत होती– छन्न्छन् करीत होती. खूप दिवस बचतपेटीच्या त्या अंधार कोठडीत– डुकराच्या पोटात राहून त्यांना अगदी कंटाळा आला होता; बाहेरच्या मोकळ्या जगात पुन्हा फिरायला मिळणार म्हणून त्यांना आनंद झाला होता.

कचऱ्याच्या पेटीत त्या मातीच्या डुकराचे तुकडे टाकण्यात आले.

पण दुसऱ्या दिवशीच त्या कपाटावर एक नवीनच बचतपेटी पुन्हा ठेवली गेली. तीही आधीच्याच सारखी होती; पण तिच्यात अजून एक नवा पैसादेखील नव्हता. त्यामुळे ती आधीच्या पेटीप्रमाणे अजिबात खळखळत नव्हती.

पण म्हणून काय झाले? तिची तर केवळ सुरुवात होती; आणि म्हणून तिथेच आपण ह्या गोष्टीचा शेवट करावा, नाही का?

**- अनुवाद - शंकर सारडा**

◈◈◈


नवे कोरे


# फ्रँकलिनची नवीन पुस्तके





फ्रँकलिन आणि हॅरिएट




फ्रँकलिनचा गुप्त क्लब




फ्रँकलिनची ख्रिसमस भेट




आगामी

# ‘ची’ रनिंग

मूळ लेखक :
**डॅनी ड्रेयर आणि कॅथरिन ड्रेयर**
अनुवाद : **डॉ. मीना शेटे-संभू**

**धावपटूंच्या दुनियेत खळबळ माजवणारे रोमहर्षक आणि क्रांतिकारक पुस्तक.**

–टोडी टान्सर, ‘ट्रेन हार्ड, विन ईझी’ या पुस्तकाचे लेखक


सध्या हजारो धावपटू दुखापतरहित आणि वेदनारहित धावण्याचे ‘ची रनिंग’ हे तंत्र स्वीकारत आहेत. या पुस्तकात कित्येक नवे दृष्टिकोन आणि प्रशिक्षण तंत्रे दिली आहेत.

डॅनी ड्रेयर हे क्रीडा क्षेत्रातील एक आघाडीचे नाव असून वेदनांना कसा प्रतिबंध करावा आणि आधीच्या वेदनांपासून कशी मुक्ती मिळवावी, याविषयी त्यांनी या पुस्तकात माहिती दिली आहे. तुमची क्षमता कितीही कमी-जास्त असली तरीही कमी श्रमात, अधिक गतीने, अधिक अंतर कसे पार करावे याविषयीही त्यांनी मार्गदर्शन केले आहे.

या पुस्तकाच्या दीड लाखांहून अधिक प्रतींचा खप झाला असून या प्रकारच्या धावण्याच्या पद्धतीमुळे आता धावणे सुरक्षित बनले आहे. नवोदित आणि अनुभवी धावपटूंसाठी तो एक आनंददायी क्रीडाप्रकार बनला आहे. शिवाय ज्यांना स्पर्धांत भाग घ्यायचा आहे, त्यांना प्रशिक्षणही दिले जाते.

ची रनिंगमध्ये शरीराच्या मध्यभागातील स्नायूंच्या सामूहिक शक्तीद्वारे धावण्यास शिकवले जाते.

**आगामी**




# शब्दवेध

लेखक

**प्रा. डॉ. चंद्रकांत सहस्रबुद्धे**

मुळाक्षरे ही भाषा, समाज, संस्कृती यांची आधारस्तंभ असतात. काही अपवाद सोडल्यास एकेकटी अक्षरे तशी अर्थहीनच! दोन वा अधिक अक्षरांचा अर्थवाही संच म्हणजे 'शब्द'.


दोन वा अधिक अक्षरांचे अर्थहीन संचदेखील अगणित असतात. त्यामुळे शब्द कसे तयार झाले असतील, कोणी बनवले असतील, याचे कुतूहल आपल्याला असतेच.

काही निरर्थक अक्षरसंचांना अर्थ मिळतो व नवे शब्द तयार होतात. एका भाषेतला अर्थहीन अक्षरसंच दुसऱ्या भाषेत शब्द असू शकतो. काही-काही शब्द वा अक्षरसंच वाचल्यावर कुतूहल चाळवले जाते, जसे 'मरुला', 'टाटुराना', 'योक्टो', 'अँटार्क्टिक स्टेअर' वगैरे.

शब्दांचा अर्थ कळला, त्यातले विज्ञान कळले की, गंमत वाटते; मनोरंजन होते व शब्दांची भुरळही पडते.

अशाच काही शब्दांचा हा मनोरंजक शब्दवेध...

# ओळखा पाहू



**तेलुगू भाषेतील ज्ञानपीठ**
**पुरस्काराचे तिसरे मानकरी**

विजेत्यास कोणत्याही पुस्तकाच्या खरेदीवर ४०% सवलत देण्यात येईल. ही सवलत फक्त एका खरेदीसाठी राहील.

आपली उत्तरे दिनांक १५ जून २०१३ पर्यंत आम्हाला मिळायला हवीत.
बरोबर उत्तरे देणाऱ्यांपैकी एकाची ड्रॉ पद्धतीने निवड करण्यात येईल.
निकाल जुलै १३ च्या अंकात जाहीर होईल.

## 'मार्च' अंकातील 'ओळखा पाहू'चे उत्तर

मराठीताल बेस्टसेलर,वादग्रस्त कन्नड कादंबरीकार -डॉ. एस. एल. भैरप्पा

ओळखा पाहू स्पर्धेचे विजेते - **ऋचा धीरज शेठ-**
१०७८, जुनी पेठ, एम. जी. रोड, महाड. जि. रायगड

निर्मला जाधव, भीमराव गुंडे,सोलापूर. सुहास जाधव, कराड. रमेश थेटे, चिंचवड

## 'मार्च' अंकातील 'चित्रकोडे'चे उत्तर

१) इंदिरा २) धीरूभाईझम ३) जे. आर.डी. एक चतुरस्र माणूस ४) अमृत पंथाचा यात्री ५) अमरगीत: बाबा आमटे यांच जावनचरित्र ६) आधुनिक भारताचे प्रेषित स्वामी विवेकानंद ७) इमॅर्जिनिंग इंडिया ८) वाइज ॲण्ड अदरवाईज ९) आय डेअर

चित्रकोडे स्पर्धेचे विजेते **-दिलीप मारुती साठे-**
c/o पांडुरंग गावडे, गुरव चाळ, सर्वे नं. ४३, प्रशाला हायस्कुल. बोपोडी-२०

**उत्तरे पाठविण्याचा पत्ता :**
**मेहता पब्लिशिंग हाऊस,** मेहता मराठी ग्रंथजगत विभाग, १९४१ सदाशिव पेठ, माडीवाले कॉलनी, बाजीराव रोड, पुणे टेलिफोन भवनसमोर, पुणे-४११ ०३०.

नवनवीन पुस्तकांच्या अद्ययावत माहितीसाठी आजच वर्गणीदार व्हा.

# मेहता मराठी ग्रंथजगत

आमच्या पुस्तकांवर वर्गणीदारांसाठी सवलत

| एक वर्षाला | तीन वर्षांना | पाच वर्षांना |
|---|---|---|
| २०% | २५% | ३०% |


**१ वर्षाची वर्गणी रु १५०/-**

**३ वर्षांची वर्गणी रु ३५०/-**

**५ वर्षांची वर्गणी रु ५००/-**

**३ व ५ वर्षांसाठी वर्गणीदार झाल्यास पुस्तके भेट!**

**वर्गणी मनीऑर्डर अथवा डिमांड ड्राफ्टद्वारा खालील पत्त्यावर पाठवावी.**








३ वर्षांची वर्गणी पाठवल्यास **'ड्रॅगनचं घर आणि मजेदार गोष्टी'** - मंजूषा आमडेकर आणि **'लैलाचा दिवा आणि गोष्टी देशोदेशीच्या'** - चारुता पुराणिक
ही प्रत्येकी ३० रुपयांची पुस्तके भेट! पोस्टेज रुपये २०/-




भेट पुस्तके उपलब्ध असेपर्यंतच!

५ वर्षांची वर्गणी पाठवल्यास **'चला जाणून घेऊ या मंत्रसामर्थ्य'** - गायत्री सेवक व **'चला जाणून घेऊ या चक्रं आणि नाडी'** - सुभाष जोशी
ही प्रत्येकी ४० रुपयांची पुस्तके भेट! पोस्टेज रुपये २०/-

**मेहता मराठी ग्रंथजगत,** द्वारा मेहता पब्लिशिंग हाऊस,
१९४१ सदाशिव पेठ, माडीवाले कॉलनी, बाजीराव रोड,
टेलिफोन भवन समोर, पुणे ४११ ०३०. फोन - (०२०) २४४७६९२४

RNI NO-MAHMAR/2000/2739
Regd.No.:PNCW / M-184 / 2012 - 2014 / Posted at Marketyard Pso, Pune
Posting Date 11 May 2013

## चित्रकोडे

**खालील चित्रांवरून पुस्तक ओळखा व मिळवा आकर्षक भेट!**

**उत्तरे पाठवताना चित्रांवरील नंबर व मोबाईल नंबर आवश्यक आहे.**




















**सदर स्पर्धा तुम्ही फेसबुकवरही उपलब्ध आहे.**

BOOK POST
Printed Matter

**मेहता पब्लिशिंग हाऊस**
१९४१, सदाशिव पेठ, माडीवाले कॉलनी, बाजीराव रोड,
टेलिफोन भवन समोर, पुणे-३०. फोन-०२० २४४७६९२४

प्रति,
____________________

संपादक, मुद्रक, प्रकाशक : सुनील अनिल मेहता यांनी हे मासिक १९४१, सदाशिव पेठ, माडीवाले कॉलनी, पुणे ४११ ०३० येथून प्रसिद्ध केले. मुद्रण स्थळ : जय गणेश ऑफसेट, ३५६, अ गणेश पेठ, पुणे २.